
साप्ताहिक
# माणूस

शनिवार । २७ मार्च १९७६ । एक रुपया



## यापुढे जुन्या चाकोरीतल्या संसदीय राजकारणाला वाव उरला आहे काय ?

—मुलाखती

आपली लोकशाही

आगामी दहा वर्षे

पृष्ठ....१२

## साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : बेचाळीसावा (४३)

२७ मार्च १९७६

मूल्य : एक रुपया



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन..अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# सप्रेम नमस्कार

¤ 'फ्रीडम अॅट मिडनाईट' मध्ये लिहिलेल्या मजकुराबद्दल आम्हांसारख्या सामान्य वाचकालासुद्धा नवल वाटते, ते अशासाठी की, ही परदेशी लेखक मंडळी काही थोड्या सत्य गोष्टींच्या आधारे, सत्याचा मुखवटा असणाऱ्या धादांत खोट्या गोष्टी विस्ताराने लिहितात आणि आपण ते सहन करतो. यावर खरोखर काहीच उपाय नाही काय ? चारित्र्यहनन, देशाची बदनामी, नाहीतर किमान 'त्या' विषयाचे चुकीचे मूल्यमापन एवढे तरी अशा पुस्तकांकडून होतच असते. भारताविषयी देशोदेशी पसरलेल्या गैरसमजुतींना अशा पुस्तकामुळे हातभार लागत असतो.

आता श्री. गोपाळ गोडसे यांचे 'त्या' मजकुराला आव्हान देणारे लिखाण प्रसिद्ध होत आहे; त्यामुळे जास्तीत जास्त एतद्देशीयांच्या मनातले काहूर शमेल. पण त्या पुस्तकाने (फ्रीडम अॅट मिडनाईटने) जी जगभर प्रसिद्धी मिळवली आहे त्यावद्दल काय करणार ? करणे शक्य आहे काय ?— विशेषत: इंग्रजीमध्ये आव्हानात्मक मजकुराचे पुस्तक किंवा पुस्तिका छापून ती तेवढ्याच मोठ्या प्रमाणात फ्रान्स किंवा इंग्लंड अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध केली पाहिजे. (प्रसिद्धीचे तंत्र राबवून) 'गांधीहत्या व मी' अशासारखी पुस्तके भाषांतरित होऊन ती परदेशी वाचकांच्या हातात पडली पाहिजेत. (भारताविषयी काहीही वाचण्यास जग उत्सुक आहे असे दिसते म्हणून असे शक्य आहे, असे वाटते) असे झाले तरच प्रत्येक गोष्टीतील नीरक्षीरविवेक या 'अभारतीयांना' कळेल. एरव्ही फ्रीडम अॅट मिडनाईटसारखा सत्याचा विपर्यास नेहमीच होत राहाणार. अशी सवंग प्रथा रूढ झाल्यास त्यापासून भारताचे आणि भारतीयांचे मोठे नुकसान होईल.

**सौ. कृष्णा बी. देशमुख**
अंधेरी (मुंबई)

¤ आताच 'माणूस' चा अंक वाचावयास मिळाला. सध्या स्पष्ट, विचारप्रवर्तक नि सडेतोड विचार वाचावयास मिळणे कठीण झाले आहे. अशाही परिस्थितीत 'माणूस' मध्ये बरेच काही वाचनीय व चिंतनीय असते. तेवढेच समाधान !

चालू माणूसमधील 'मुख्यमंत्र्यांनी शुद्धीकरणाची मोहिम हाती का घेतली ?' या लेखात काँग्रेसच्या अंतर्गत सत्तास्पर्धेच्या प्रवाहांचे परखड विवेचन आहे. अनुशासनपर्वात हे घडते कसे ? तसेच अनिल बर्वे यांचा 'तेलिया राजा' मार्मिक आहे. तर 'आपली लोकशाही – आगामी दहा वर्षे' यामधील मुलाखती अत्यंत विचारप्रवर्तक, चिंतनशील असून अंतर्मुख करणाऱ्या आहेत. या संबंधात आम्ही अधिक जागरूक–डोळस–होण्याची आवश्यकता भासते.

असो एकंदरीत अंक उत्तम आहे ! धन्यवाद ! कळावे.

**सुधाकर पोटे**
घोडनदी

# सारं कसं शांत शांत हवं हो !

आदित्यदास

डब्ल्यू.-आर.-इ.-एस.-टी. : रेस्ट म्हणजे हिसकणे. दुसऱ्याच्या हातातील, गळ्यातील अथवा पृष्ठभागाखालील वस्तू शारीरिक बळावर काढून घेणे ! अत्यंत हिंसक असा हा इंग्रजी शब्द आहे. यापासूनच 'रेसलर' म्हणजे 'कुस्तीगीर.' अथवा 'पैलवान' हा शब्द निर्माण झाला आहे. तेव्हा कुस्ती ही दंगलीला कारणीभूत होते यात मुळीच आश्चर्य नाही.

गेल्या पंधरवड्यात कोल्हापूर येथे 'भारत–केसरी' पैलवान विजयकुमार व 'महाराष्ट्र–केसरी' पैलवान युवराज पाटील यांच्यात जी कुस्ती झाली, त्याचे पर्यवसान दगडफेकीत, खुर्च्याफेकीत व मारामारीत होऊन अनेकजण जखमी झाले. कुस्ती निकाली झाली नाही, तेव्हा ती पुन्हा लावावी अशी मागणी करणाऱ्या गटाने दंगलीला सुरुवात केली. 'महाराष्ट्र–केसरी' पडला हे मुळी कोल्हापूरच्या लोकांना सहन होईना. सध्याच्या परिस्थितीत 'भारत-केसरी' हे 'महाराष्ट्र–केसरी'ना सतत पाडत आहेत व मराठी जनता शांतपणे हे सर्व पाहत आहे. अशी इतर क्षेत्रात स्थिती असताना, 'महाराष्ट्र–केसरी' पडला हे कुस्तीशौकिनांनी मान्य करून शांतपणे घरोघर जायला हवे होते. मंत्रिपदाच्या दंगलीत 'सांगली–केसरी' पडले. परंतु जमलेले लोक शांतपणे घरी गेले. हा आदर्श कोल्हापूरकरांनी का बरे पाळू नये ?

परंतु देशात गेले काही दिवस जे 'रेसलींग' चे वातावरण निर्माण करण्यात आले आहे, त्याचे कोल्हापूरला झालेली दंगल हे अटळ पर्यवसान होय. हे सांगायला फार थोर संपादकांच्या अग्रलेखांची मुळीच गरज नव्हती. पाऊण लाख लोक बेळगावला जमतात आणि सतपाल–चंबाची कुस्ती पाहतात ! दिल्लीचा सतपाल हा कोल्हापूरच्या चंबा मुत्नाळच्या छातीवर बसतो आणि काही लोक टाळ्या वाजवतात ! दिल्लीच्या मल्लापुढे, कोल्हापूर, सांगली, कऱ्हाड, सातारा, पुणे या ठिकाणचा कोणीही मल्ल टिकू शकणार नाही, असे उघड लोक बोलतात आणि तरी मराठी माणसे शांत राहतील अशी अपेक्षा किती दिवस बाळगावी ? जानेवारीच्या अखेरीस ही बेळगावची विराट–दंगल होते न होते तो पुण्याला घिस्सा डावावर पांढरी चड्डी घालणाऱ्या पैलवान हिरामण बनकरने भगवी चड्डी घालणाऱ्या दामोदर मंडलेला ३२ मिनिटांच्या ढकलाढकलीनंतर चीत केले. इथेही पंचांत मतभेद झाले. आपण पडलो हे भगव्या चड्डीतील पैलवानाला मान्य नव्हते. पांढऱ्या चड्डीतला पैलवान जिंकल्याच्या उन्मादानं नाचत होता. परंतु प्राप्त परिस्थितीत भगव्या चड्डीतील, पहिलवानाच्या पाठीराख्यांनी दंगल केली नाही. म्हणून अनवस्था प्रसंग टळला. अर्थात जेव्हा जेव्हा दंगल होते, तेव्हा तो लोकांचा आततायीपणा असतो आणि टळते तेव्हा पोलिसांची 'चतुराई' असते. तेव्हा दंगल टळली याचे श्रेय पोलिसांनाच द्यायला हवे. परंतु पुण्याला टळले ते अखेर कोल्हापूरला घडलेच !

यावर उपाय काय? चौफेर स्मशान-शांततेला लाजवील अशी शांतता असताना, कुस्त्या लावून शांततेचा भंग करणाऱ्यां-विरुद्ध कडक कारवाई नको काय ? गरिबी जवळजवळ हटत आली असताना, एकाच माणसाने रोज दोन कोंबड्या, चार शेर बदाम, दहा शेर अटीव दूध, वगैरे खाणे हे योग्य आहे काय ? दिवसाला शंभर रुपयांचा खुराक खाणारी ही पैलवान मंडळी एवढा पैसा आणतात कुठून ? भारतात दंगली घडवून, येथील लोकशाही धोक्यात आणणाऱ्या परकीय शक्तींचा यामागे हात असण्याची शक्यताही दृष्टीआड करून चालणार नाही. शारीरिक बळाच्या या 'उघड्या-नागड्या' प्रदर्शनामागे काही फॅसिस्ट प्रवृत्ती नाहीतना, याचाही शोध घ्यायला हवा. 'अँटी फॅसिस्ट परिषदा' भरवूनही जर या शक्ती अजून शाबूत असतील, तर तो खासच चिंतेचा विषय होय. यासाठी 'फॅसिस्ट विरोधी परिषदांची' आणखी एक फेरी आखावी लागली तर, त्याचा विचार रजनी पटेल व डांगे हे करतील, याबद्दल आता कुणाच्या मनात शंका नाही.

कुस्ती म्हटली की दोन तालमी आल्या. दोन मल्ल आले. झोंबी आली. आणि मुख्य म्हणजे कोण पडला, कोण जिंकला याचा निर्णय लाखो लोकांच्या साक्षीने करण्याचा प्रसंग आला. एखाद्या वेळी नको त्या मल्लाची अचानक पाठ लागली, तो चीत झाला, तर हजारो–लाखो लोक म्हणणार–'हा पडला !' एखाद्या वेळी एखादा पैलवान पडणे सोयीचे नसते. 'हा अजिंक्य आहे ! हा नाही, तर सगळा अंधार आहे !' अशा सोयी-स्कर समजुती पसरवणारा जालीम प्रचार झालेला असताना, नियमानुसार लाखो लोकांच्या साक्षीने जर हा मल्ल पडला, तर भलतीच आणीबाणी निर्माण होते. बरे, कुस्तीला काही नियम असल्याने नियमानुसार पडलेला पैलवान 'हा पडला' असेच सर्वजण समजतात. नियम दुरुस्त करून त्याला पुनः उठवण्याची सोय नसल्याने मोठीच आफत येते. दगडफेक होते, पंचांना खुर्चीसह फेकले जाते. अनवस्था प्रसंग येतो. कोल्हापूरच्या दंगलीत याचे प्रत्यंतर आलेच आहे.

तेव्हा काय करावे, हा प्रश्न आहे. आमचे असे स्पष्ट मत आहे की, कुस्तीवर जरी बंदी घातली नाही तरी ती होणार नाही, अशी व्यवस्था करावी. अशी व्यवस्था करणे प्राप्त परिस्थितीत अगदी सोपे आहे. सत्तारूढ पक्षाचे बरेच लोक तुरुंगात टाकले की, 'महापौर' होता येतेच की नाही ? मल्लांची कुस्ती जाहीर झाली की, दोघांनाही इंदिरा काँग्रेसमध्ये येण्याची संधी द्यावी. दोघे इंदिरा काँग्रेसमध्ये आले, तर कुस्तीची गरज नाही !! दोघे आळीपाळीने पुणे–केसरी, बेळगाव–केसरी, महाराष्ट्र–केसरी किंवा विश्व–केसरी होऊ शकतात. 'नाणे उडवून' पहिल्यांदा कोणी कोण व्हावे, हे फार तर ठरवावे. 'नाणे उडवून' मंत्रिमंडळे कोसळतात, तिथे पैलवान ढेपाळतील, यात मुळीच शंका नको. समजा, दोघांपैकी एकच इंदिरा-काँग्रेसमध्ये आला, तर दुसऱ्याला सरळ तुरुंगात टाकावा. पैलवानाला 'मिसा'खाली पकडणे बरेच खर्चाचे होईल हे मान्य करूनही, कुस्ती टाळण्यासाठी हा खर्च करायला हरकत नाही. एक पैलवान तुरुंगात टाकला की दुसरा शहाणा पैलवान आपोआप 'दिल्ली–केसरी' अथवा 'विश्व–केसरी' झालाच ! बॅ. रजनी पटेल म्हणा, संजय गांधी म्हणा, देवकांत बारूआ म्हणा, अशा कोणीतरी वंदनीय पुढाऱ्यांच्या हस्ते या पैलवानाचा प्रचंड सत्कार करावा. रेडिओवर मुलाखत. टी. व्ही. वर मुलाखत. झाला कसला तरी केसरी ! कुस्ती नको, मैदान नको, दंगल नको. सारं कसं शांत शांत !! □

# घटनादुरुस्तीची समस्या

## काही विचार । अशोक चौसाळकर

भारतीय राज्यघटनेमध्ये बदल करण्याबाबत विचार केला जात आहे. हे बदल कशा प्रकारचे असतील, याची वाच्यता अजून झालेली नाही. पण त्या दृष्टीने विचारमंथनास सुरुवात झाली आहे. घटनादुरुस्तीसंबंधी होणाऱ्या विचारांच्या आदानप्रदानास पूर्णतः मोकळीक असावी, अशी अपेक्षा आहे. कारण वर्तमानपत्रे व मुक्त विचारांचे आदानप्रदानच सत्ताधाऱ्यांच्या परिस्थितीच्या आकलनास मदत करीत असते. घटनादुरुस्तीसारखा महत्त्वाचा प्रश्न दहा-बारा वकील व संसदविद् सोडवू शकत नसतात, कारण ज्यांच्यासाठी घटनादुरुस्ती करायची आहे, त्यांच्या विचारांना अवगत करून घेणे महत्त्वाचे असते. जनतेच्या मतांना अनुमोदन करणारे फेरबदल झाले, तरच ते उपयुक्त ठरतात, नाही तर त्यांची गती फ्रान्स, बांगलादेश व पाकिस्तानच्या राज्यघटनांसारखी होते. म्हणूनच मुक्तविचारांचे आदानप्रदान आवश्यक आहे व टीका हा त्याचा स्थायीभाव आहे. तुलनात्मक आलोचना, ज्ञानाची नवी क्षितिजे उघडी करते, तेव्हा विधायक टीका नेहमीच स्वागतार्ह मानली पाहिजे.

प्रस्तुत लेखाचा उद्देश घटनादुरुस्तीबाबत चाललेल्या चर्चेवर विचार करून, घटनेच्या कोणत्या भागात दुरुस्ती आवश्यक आहे, याची चर्चा करणे, हा आहे. या चर्चेत आतापर्यंत सर्वश्री सिरवाई, मुलकराज आनंद जेठमलानी, रजनी कोठारी, वगैरे तज्ज्ञांनी भाग घेतला आहे. डॉ. आनंद यांना 'भारतीय' परिस्थितीस व संस्कृतीस अनुकूल अशी राज्यघटना हवी आहे. पण भारताचे वेगळेपण कशात आहे, हे न सांगता आपण 'भारतीय' घटना बनविली नाही, म्हणूनच असे झाले, असे प्रतिपादन ते करतात. पण ते हे विसरतात की, लोकशाहीची कल्पना आपण पाश्चात्यांकडून घेतली आहे. व्यक्तींच्या मूलभूत स्वभावात व आशाआकांक्षांत फारसा तसा फरक नसतो आणि पाश्चात्य लोकशाहीची मूल्ये महान् परंपरांवर आधारलेली आहेत. पारंपारिक भारतीय विचारांमध्ये लोकशाहीला फारसे स्थान नाही, कारण ते वर्णव्यवस्थेशी जखडलेले आहेत. जन्मनिष्ठ उच्चनीचतेवर आधारलेले कायदे, प्रतिगामी धर्मग्रंथ व मागासलेल्या चालीरीतींवर आधारलेली अनुदार धर्मकल्पना भारतीय घटनेचा आधार बनू शकत नाही. त्याचप्रमाणे खेडी हा घटक कल्पून संसदेची रचना करणे पण फारसे शहाणपणाचे होणार नाही. कारण कोणत्याही प्रगतशील राज्यघटनेचा पाया खेडी वा शहरे असू शकत नाहीत. व्यक्ती हाच तिचा पाया होय.

कोणतीही घटना लवचिक असावी, याबाबत दुमत होण्याचे कारण नाही. कारण कोणत्याही पिढीला, पुढच्या पिढीला आपल्या विचारांमध्ये बांधून टाकण्याचा अधिकार नाही. दर २५ वर्षांनी घटनेचा फेरविचार करण्यात यावा, हे मत रास्त आहे.

भारताने संसदीय पद्धतीचा स्वीकार केला आहे. येथे प्रधानमंत्री संसदेचा नेता व देशाचा प्रमुख असतो. या प्रकारच्या घटनेला 'वेस्टमिन्स्टर' मॉडेल म्हणतात. ही राज्यपद्धती लवचिक आहे, कारण प्रधानमंत्री संसदेला जबाबदार असतो व बहुमताचा पाठिंबा संपताच त्याला राजीनामा द्यावा लागतो. काही लोकांचे असे मत आहे की, भारतातपण अमेरिकन किंवा फ्रेंच पद्धतीचे कार्यकारी मंडळ असणारी घटना अंमलात आणावी. काही दिवसांपूर्वी प्रसारित केलेल्या चोपड्यांत हीच सूचना केली गेली होती. त्या चोपड्यांत राष्ट्रपतीला एखाद्या आफ्रिकन हुकुमशहासारखे अधिकार देण्यात आले होते. त्यांतील अनेक सूचना लोकशाहीद्रोही व मूर्खपणाच्या होत्या. भारतासारख्या देशात ती पद्धती अंमलात आणणे फारसे शहाणपणाचे ठरणार नाही, कारण अमेरिकेत पण तिने फारशी चांगली कामगिरी बजावली नाही. फ्रान्सची द गॉल राज्यघटना फार दिवस चालेल, असे तज्ज्ञांना वाटत नाही. कारण जोपर्यंत राष्ट्रपती व संसद एकाच पक्षाचे आहेत, तोपर्यंत संकट टाळता येईल, पण जर राष्ट्रपती, गॉलिस्ट व संसद समाजवादी, साम्यवादी पक्षांचे बहुमत असलेली असेल, तर घटनात्मक संकट उभे राहील. आता संसदेतील पन्नास टक्के सदस्य राष्ट्रपतीने नेमावेत, अशी जर सूचना असेल, तर प्रश्नच मिटला!

लवचिक अशी दरडोई एकमतावर आधारलेली संसदीय राज्यपद्धती हीच सर्व बूर्ज्वा राज्यपद्धतींत चांगली राज्यपद्धती आहे. आपण तिचा त्याग करू नये, उलट तिलाच शक्तिशाली करावे. तिचा त्याग केल्यावर बांगला देश व पाकिस्तान यांची काय दुर्गती झाली, हे आपण पाहिलेच आहे. संसदीय राज्यपद्धतीतील प्रधानमंत्री—राष्ट्रपतीपेक्षा जास्त शक्तिशाली, परिणामकारक व कार्यक्षम असतो, कारण तो प्रशासन, संसद व पक्ष यांचा नेता असतो. प्रधानमंत्र्याला विशेषाधिकारांची गरज नसते, कारण प्रभाव व शक्ती त्याला स्वतःच्या कर्तृत्वाने मिळवावी लागते.

प्रा. रजनी कोठारी यांच्या मते, प्रधानमंत्र्यासारखी जागा एका व्यक्तीने फक्त दोनदाच भूषवावी, असे एक कलम घटनेत असावे. ही सूचना भारताच्या संदर्भात फारशी बरोबर नाही. कारण त्यामुळे घटना लवचिक राहत नाही. भारतासारख्या देशात लोकप्रिय, प्रभावशाली व कुशल व्यक्तींच्या अनुभवी नेतृत्वाची गरज आहे, कारण

पृष्ठ २९ वर

# फुलगाव येथील महिला शिबिर

निर्मला पुरंदरे

भारतातील हजारो खेड्यांसारखंच एक लहानसं खेडं फुलगाव. पुणे-नगर रस्त्यावर, तुळापूरच्या अलीकडे. भीमा-भामा-इंद्रायणीच्या तुळापूर येथील संगमानं फुलगावलाही एक महत्त्व आलं आहे. आळंदीला यात्रेनिमित्त जाणाऱ्या यात्रेकरूंचा एखादा विसाव्याचा मुक्काम या फुलगावला होतो. गाव फक्त एक हजार लोकवस्तीचं. शाळा सातवीपर्यंत. बहुसंख्य स्त्रिया स्वतःच्या किंवा दुसऱ्यांच्या शेतांमध्ये काम करतात. जवळून वाहणाऱ्या इंद्रायणीचं पाणी शेतीलाच जेमतेम आठ-दहा महिने पुरतं. नंतर मात्र सर्वत्र रखरख. पावसाचं पाणी, भारतात अन्यत्र जसं पडून पडून गंगार्पण होतं, तसंच याही गावात होतं. घरोघर पाण्याचे नळ असणं, सांडपाणी-व्यवस्था होणं, वीज येणं यांसारख्या कितीतरी किमान गोष्टी फुलगावात अद्याप व्हावयाच्या आहेत.

पुण्यापासून वीसच मैल अंतरावर असलेल्या या फुलगावला गेल्या एक-दोन वर्षांपासून स्वतःच्या विकासाची स्वप्नं पडायला लागलीत. इन्व्हेस्टमेंट इन् मॅन ट्रस्टतर्फे फुलगावला गेल्या चार महिन्यांपासून स्त्रियांसाठी शिवणवर्ग सुरू करण्यात आला आहे. समाज कल्याण खात्याच्या योजनेतील सहभाग म्हणून नुकतंच एक बालसदन सुरू करण्यात आलं आहे. या ज्ञानेश बालसदनमध्ये आई-वडिलांचा वा अन्य कुणाचा आधार नसलेल्या बालकांची व्यवस्था केली जात आहे. आधुनिक माहितीचा उपयोग करून ट्रस्टनं विकत घेतलेल्या १६ एकर जमिनीवर शेती करायला सुरुवात झाली आहे.

ट्रस्टच्या सर्व विकास कल्पनांचा मूळ आधार म्हणजे फुलगावातील स्त्री. या स्त्रीनं मनावर घेतलं, तर फुलगावात सर्व योजनांना लवकर आकार येणार आहे, ही जाणीव ट्रस्टला आहे. तेव्हा त्यासाठी सर्व महिलांनी या योजनांमध्ये सहभागी होणं, हे अत्यंत महत्त्वाचं आहे. त्यांना त्यांच्या शक्तीचा प्रत्यय आणून दिल्यावर त्यांच्या घरातील मुलांचं शिक्षण, मुलांचं संगोपन यांचा जागरूक विचार सुलभ होईल.

## महिला शिबीर

वरील उद्देशानं कस्तुरबा ट्रस्ट आणि इन्व्हेस्टमेंट इन् मॅन ट्रस्ट यांच्या सहकार्यानं दि ६ ते १० मार्च १९७६ या काळात फुलगाव येथे एक महिला शिबीर आयोजित केले होते. स्त्रीजीवनाशी निगडित अशा विविध विषयांवर माहिती देणे, स्त्रियांना एकत्र आणून आरोग्य, शिक्षणांसारख्या विषयांवर चर्चा घडवून आणणे व त्याबद्दलची जाणीव जागी करणं, ह्या हेतूनं शिबीर घेतलं गेलं.

फुलगावला स्त्रियांसाठी झालेला हा पहिलाच उपक्रम. शिबिराचे पाचही दिवस स्त्री-पुरुष-मुलं मोठ्या संख्येनं उपस्थित होती. वातावरण उत्साहाचं असे.

**उद्घाटन :** ६ मार्चला शिबिराचं उद्घाटन कस्तुरबा ट्रस्टच्या विश्वस्त श्रीमती ताराबाई साठे यांच्या हस्ते झालं. अगदी साध्या, सोप्या भाषेत त्यांनी ग्रामीण भागातील स्त्री-शिक्षणाचं महत्त्व पटवून सांगितलं. दारूबंदी, प्रौढ शिक्षण या विषयांवर माहिती दिली.

फुलगावचे पोलिस-पाटील श्री. शिवराम पाटील व तेथील शाळेचे मुख्याध्यापक श्री. आप्पासाहेब धोत्रे यांनी गावात प्रथमच होत असलेल्या महिला शिबिराबद्दल आनंद व्यक्त केला व गावाकडून सर्व सहकार्य मिळेल, असं आश्वासन दिलं.

**७ मार्च :** डॉ. श्रीमती हेमलता कुलकर्णी यांनी बालसंगोपन व महिलांचं आरोग्य याबाबत माहिती दिली. श्रीमती इंदुताई टिळक यांनी आकर्षक तक्ते दाखवून काटकसरीचा, सोपा व उपलब्ध भाजीपाला-कडधान्य वापरून समतोल आहार घेण्याबाबत उद्बोधक माहिती माहिती दिली.

**दि. ८ मार्चला** फुलगावमधील बत्तीस महिला पुण्याला शेतकी महाविद्यालयात सहलीस आल्या होत्या. उत्तम बी-बियाणे, भाजीपाला, जमीनीचं मशागत तंत्र, गव्हाच्या विविध जातींवरील चालू असलेले शास्त्रशुद्ध प्रयोग, निरनिराळी खते यांसंबंधी प्रा. साबळे, प्रा. शिंदे, प्रा. मेहता यांनी माहिती दिली.

दुपारी गोबर गॅस प्लँट, शेती-सण-समारंभ, धान्याची निगा, अंध समजुती यांवर आधारित असे सुबोध लघुपट दाखवण्याची व्यवस्था श्री. पुरंदरे, श्री. लिमये यांनी केली. भोजन व्यवस्था विद्यार्थी साहाय्यक समितीतर्फे करण्यात आली होती. सर्व भगिनींनी विद्यार्थिनींच्या वसतिगृहाला भेट दिली. सायंकाळी पाच वाजता सर्वजणी फुलगावला एस्. टी. ने रवाना झाल्या.

**दि. ९ मार्चचा** कार्यक्रम अगदी नावीन्यपूर्ण असा होता. फिल्म इन्स्टिटयूट, पुणे यांच्या टेलिव्हिजन विभागातर्फे ग्रामीण जीवनावर आधारित असे लघुपट टी. व्ही. वर दाखवण्यात आले. अज्ञानामुळे सावकारीच्या पाशात पिढ्यान् पिढ्या शेतकरी कसा जखडला जातो, असमतोल आहारामुळे अंधत्वासारख्या पंगुपणानं भारतातील केवढी मोठी संख्या पीडीत आहे. या ज्वलंत विषयांवर टी. व्ही. ने तमाशासारख्या माध्यमाचा उपयोग करून घेतलेले लघुपट या शिबीरात प्रभावी वाटले. पटणारे वाटले. श्रीमती उषा बंबावाले व श्रीमती जयश्री नरगुंदकर यांनी या लघुपटांच्या आधारे स्त्रियांबरोबर चर्चा केली. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध नाटककार, साहित्यिक, चित्रपट लेखक श्री. विजय तेंडुलकर यांच्या सूचनेवरून टेलिव्हिजन विभागातर्फे हा कार्यक्रम आयोजित केला गेला. या कार्यक्रमास ते स्वतः उपस्थित होते.

लघुपटांनंतर महाराष्ट्र राज्याच्या सहकार विभागातील एक कार्यकर्त्या श्रीमती विमल भोसले यांनी ग्रामीण महिलांसाठी पंचायतीतर्फे उपलब्ध होऊ शकणाऱ्या शासनाच्या

विविध योजनांची माहिती दिली. या योजनांना गती लाभावी, योजना लवकर अमलात आणणे शक्य व्हावे यांसाठी एक महिला मंडळ स्थापन करण्याबाबत सुचवले. ग्रामपंचायतीच्या महिला पंच श्रीमती फुलाबाई यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते महिला मंडळाची स्थापना करण्यात आली. या महिला मंडळातर्फे फुलगावात बालवाडी, प्रौढ शिक्षण वर्ग, किसान शाळा, सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणण्याची योजना आहे.

**दि. १० मार्च** शिबीराच्या समारोपाचा दिवस. कस्तुरबा ट्रस्टच्या महाराष्ट्रातील कार्यवाह श्रीमती शोभना रानडे यांच्या हस्ते समारोप झाला. गावांतील पुरुषवर्ग, पुण्याहून आलेले निमंत्रित या समारोपासाठी उपस्थित होते. फुलगावांतील महिलांनी छोटासा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

पुणे आकाशवाणीवर ज्यांचे संगीताचे कार्यक्रम वारंवार प्रसारित होतात त्या, श्रीमती प्रतिभा परांजपे व श्री. कुमुदिनी पवार यांचा भजनं व लोकगीतांचा कार्यक्रम झाला.

श्रीमती धोत्रे यांनी पाच दिवसांचा अहवाल सादर केला. इन्व्हेस्टमेंट इन् मॅन ट्रस्टचे विश्वस्त फादर मॅथ्यू लेदर्ले, फुलगावातील एक अत्यंत उत्साही कार्यकर्ते श्री. तात्यासाहेब कुलकर्णी, श्री. आप्पासाहेब धोत्रे यांनी शिबीराच्या उपक्रमाबद्दल आपले विचार मांडले. शिबीराच्यानिमित्तानं गावात निर्माण झालेला गावकऱ्यांचा उत्साह वाढता राहावा, फुलगाव विकासाची कामं गावकऱ्यांकडून एकजुटीनं हाती घेतली जावीत अशी सदिच्छा सर्वांनी व्यक्त केली.

श्रीमती शोभना रानडे यांनी महाराष्ट्रात निरनिराळ्या गावांमधून घेतल्या गेलेल्या अशाच महिला शिबीरांबद्दलचे आपले अनुभव सांगितले आणि कस्तुरबा ट्रस्टतर्फे घेतल्या गेलेल्या या सातव्या आणि आन्तरराष्ट्रीय महिला वर्षातील शेवटच्या शिबीराचा समारोप केला.

या शिबीरासाठी फुलगावातील विठ्ठल मंदिराची जागा लाभली होती. ग्रामस्थांनी, पंचायत सभासदांनी शिबीर यशस्वी होण्यास सर्व प्रकारचं सहकार्य दिलं. इन्व्हेस्टमेंट इन् मॅन ट्रस्टतर्फे फुलगावमध्ये सुरू असलेल्या शिवणवर्गाच्या आणि ज्ञानेश बालसदनच्या व्यवस्थापक श्रीमती शकुंतला मार्कंडे, श्री. तात्यासाहेब कुलकर्णी यांनी तर शिबीरासाठी फारच परिश्रम घेतलेले जाणवत होते.

प्रथमच एकत्र आलेल्या महिला शिबीरातील काही उत्साही महिला यापुढे स्वस्थ बसायचं नाही या विचारानं पुढं सरसावल्या. दि. १३ मार्चपासून सुरू होत असलेल्या ग्रामसेविका अभ्यासक्रमासाठी त्या लगेचच रवाना झाल्या. कौटुंबिक परिस्थितीच्या चक्रात वर्षानुवर्षं स्वतःला हरवून बसलेल्या या हुशार स्त्रियांना फार मोठ्या काळानंतर शिक्षण, नवीन अनुभव, स्वकर्तृत्वाची एक जाणीव यांची ताजी झुळूक अनुभवायला मिळाली असावी असं म्हणावं का? □ □

---

# दहा मोतिबिंदूंवर शस्त्रक्रिया करून दहा अंधांना नजर देण्यापेक्षा एक लहान मूल आंधळे होण्यापासून वाचविणे जास्त महत्वाचे आहे...

## डॉ. वाकरे । जळगाव

---

'Foresight saves sight' हा या वर्षीचा W. H. O. चा, ७ एप्रिलच्या जागतिक आरोग्य दिनाचा विषय आहे. प्रत्येक EYE–Specialist (डोळ्यांच्या तज्ज्ञाने) आपल्या तपासण्याच्या खोलीमध्ये पेशंट तपासण्याच्या जागेवर हे वाक्य फ्रेम करून ठेवावे, म्हणजे पेशंट तपासताना डॉक्टरला सतत त्याच्या कर्तव्याची जाणीव होत राहील. What are we doing for our 5000000 incurably blind? अंध विद्यालयाचे उद्घाटन असो, अंधांकरता चालू होणाऱ्या work–shop चे उद्घाटन असो किंवा नेत्रशिबिराचे असो. मुख्य वक्त्याच्या भाषणात हे वाक्य आलेच पाहिजे. आपल्या देशात ५०,००,००० बरे न होणारे अंध आहेत. १९४४ साली २०,००,००० होते, आज ५०,००,००० आहेत. हा आंकडा व हा प्रश्न श्रोत्यांना एक आव्हान म्हणून फेकला जातो व शाळेचे उद्घाटन असले तर 'अंध विद्यालय' काढीत आहो. work–shop चे असले तर work–shop काढीत आहो, हे उत्तर असते. नेत्र शिबिराच्या उद्घाटनाच्या किंवा समारोपाच्या वेळी हा प्रश्न विचारला तर, वक्त्यालाच त्याचा अर्थ माहीत नसतो. त्याची कल्पना असते की, नेत्र शिबीर हेच उत्तर. Prevention (प्रतिबंध) व Cure (बरे करणे) या दोहोंतील फरक त्यालाच माहीत नसतो.

कोणतीही समस्या असो–आरोग्याची किंवा सामाजिक–तिचे तीन भाग पडतात. Prevention (प्रतिबंध) Cure (बरे करणे) Rehabilitation (पुनर्वसन), Prevention is better than Cure हे वाक्य आपण शाळेपासून पाठ म्हणत असतो. पण एखादी समस्या हाताळतांना Prevention ला (प्रतिबंधाला) फक्त Lip Service देतो व सर्व लक्ष व खर्च Cure (बरे करणे) व Rehabilition (पुनर्वसन) वर केंद्रित करतो. पुष्कळ वेळा या तिघांत गफलत केली जाते. अंधत्वाच्या बाबतीत या गफलतीचे उदाहरण म्हणजे वर उधृत केलेले वाक्य.

अंधविद्यालयातील ब्रेल टाइपची पुस्तके, ती धडाधड वाचणारी मुले, ब्रेल टाइपरायटर, Talking Book Studio (पुस्तके वाचून दाखविणारी लायब्ररी) अंध मुले डोळस माणसांसारखी काम करताना पाहून, तेथील त्यागी शिक्षकवर्ग बघून, 'लहान अंध मुले तीन चाकी सायकलवर खेळताना पाहून प्रेक्षक स्तिमित होतो. हा प्रेक्षक सधन वर्गी-

पृष्ठ २५ वर

# सोलकढी

## □ साक्षात्कार आणि पळवाट

मला काम करायला मुळीच आवडत नाही. होताहोईतो काम टाळण्यासाठी माझी धडपड चाललेली असते. कित्येक वेळा काम करायच्या धडपडीने जेवढे दमायला होईल, त्यापेक्षा काम टाळायच्या धडपडीने मला जास्त दमायला होते; पण काम टळत असेल तर, दमायला माझी बिलकुल हरकत नसते. काम करून दमण्यापेक्षा काम न करून दमणे, माझ्या टिन्नस प्रकृतीला अधिक मानवते, असे माझे मी एक पाहून ठेवले आहे. याचा



अर्थ असा मात्र नव्हे की, मी आळशीअळू आहे. भूक मंदावणे आणि दोन घास कमीच खाणे, यांच्यात जो फरक आहे, तोच आळस करणे आणि काम न करणे यांच्यात आहे बरे. आळस ही वृत्ती आहे; काम न करणे ही साधना आहे. आजूबाजूची करता येतील अशी कामे आळशाला दिसतच नाहीत; तर काम न करणाऱ्याला ती कामे यथास्थित दिसतात, पण ती तो जितेंद्रिय होऊन दृष्टिआड करतो. तसे तो न करील तर, कामे त्याच्या मानगुटीलाच बसतील. म्हणून त्याला विचाऱ्याला पक्के सजागसावध राहावे लागते. खरे तर, काम न करण्यासाठी त्याला अखंड काम करत राहावे लागते.

माझ्या अवतीभवतीची बहुतेक मंडळी काम आणि अधिक काम करणारी आहेत. कामाशिवाय त्यांना करमत नाही. काम नसेल त्यावेळी नवेनवे काम ती कल्पकतेने शोधून काढतात. काम असले की त्यांची प्रकृती ठणठणीत असते. म्हणजे इतरांना सहजी रंजीस आणू शकतील, अशी दुखणी-खुपणी धुमसतच असतात; पण कामापुढे त्यांच्याकडे लक्षच देता येत नाही. कामाची गती इतकी भन्नाट असते की, ही मंडळी शिंकासुद्धा साठवून ठेवून सोयीसवडीने देतात! मुख्य म्हणजे, अंगावर येणारे कोणतेही काम त्यांना टाळता येत नाही. आणि काम करताना मिटक्या मारायची सवय एकदा झाली म्हणजे, नावडते काम करतानादेखील मिटक्या आपल्या सवयीने मारल्या जातातच.

अशी स्वतःला बुचकळून कामे करणाऱ्या कामभरोसे लोकांना, कामातले विश्रांतीचे मोलमहत्त्व उमगत नाही. विश्रांती हा कामाचाच अविभाज्य भाग आहे, याचे भान त्यांना राहत नाही. ही माणसे, विश्रांती टाळून, कामामागून कामे करत राहतात. आपण विश्रांती घेत नाही, याचा भगभगता अभिमान त्यांना वाटत असतो. माझ्यासारख्या काम न करणाऱ्या माणसाकडे ते एका अभिअभिजात तुच्छतेने पाहत असतात. सूर्य-चंद्रांना चष्म्याच्या पेटीत बंद करून दिवस-रात्रीतला निसर्गभेद ते पुसून टाकतात. हे करताना, स्वतःकडे निरखून तर सोडाच, पण किलकिल्या नजरेनेसुद्धा पाहायला त्यांना सवड नसते. ते एक समजा. कोणाचे सुख इथल्यायाच्यात; कोणाचे सुख तिथल्या-त्याच्यात. आपल्याला काय, सापाचेही मोजू पाय. पण होते असे की, विश्रांतीविना केलेल्या प्रत्येक कामाला कुठेतरी मुका मार बसतो, त्याचे काय?

ही गोष्ट बहुतेक कामराज-कामेश्वरांच्या कधीच लक्षात येत नाही. क्वचित एखाद्याच्या लक्षात येते : जशी की ती अलीकडे यहुदी मेनुहिन या विश्वविख्यात वादकाच्या लक्षात आली. यहुदी मेनुहिनचे कार्यक्रम युरोप आणि अमेरिकेत सारखेच होत असतात. एका पाठोपाठ सतत होणाऱ्या कार्यक्रमांमुळे आपल्याला पुरेशी (हे महत्त्वाचे-) विश्रांती मिळत नाही आणि त्याची झळ आपल्या कार्यक्रमांनासुद्धा लागू लागली आहे, हे पं. यहुदीबुवा मेनुहिन यांच्या लक्षात आले. आता, विश्रांतीचा हिशेब करून कार्यक्रम करायचा विचार ते करू लागले आहेत.

वास्तविक यहुदी मेनुहिन हा काही मामुली व्हायोलिनवादक नव्हे. धुणी वाळत घालायच्या तारेवरून त्याने गज फिरवला, तरी स्वरमाला झिमझिमावी, अशी जादू त्याच्या बोटांत आहे. असातसाकसाही कार्यक्रम त्याने दिला, तरी लोक टाळ्याच वाजवतात. पण लोकांच्या टाळ्यांवरून कार्यक्रमाचा दर्जा ठरवायची भारतातली रीतपद्धत त्या अपौर्वात्याला ठाऊक नाही, असे दिसते.

विश्रांतीचे मोलमहत्त्व उमगलेल्या यहुदी मेनुहिनला, काम न करायच्या जीवनधर्माचे मूलतत्त्वच अवगत झाले आहे. त्याला झालेल्या या दिव्य साक्षात्काराचे आता केवढे कौतुक होईल. हा आत्मबोध त्याने इतरांना सांगितला, तर तेसुद्धा त्यापासून काही शिकायचा प्रयत्न करतील. त्याचे अनंतरावांसारखे होणार नाही. अहो, अनंतरावांना हा साक्षात्कार लहानपणापासून झालेला होता; पण लक्षात कोण घेतो? अखेर साक्षात्कार कोणाला होतो, यालासुद्धा साधनामार्गात फार्फार महत्त्व आहे, असे दिसते. इतके की, माझ्यासारख्या खचाण्या-पुचाण्याला झालेल्या साक्षात्काराला 'साक्षात्कार' नाही म्हणत.

यहुदी मेनुहिनला होतो तो 'साक्षात्कार.'
अनंतरावांना सापडते ती 'पळवाट.'

— अनंतराव

## साफल्याचं दशक




# स्थल कालावर मात


गेल्या 10 वर्षात दळणवळणाच्या सोयी सवलींत भरपूर सुधारणा झालेली असून त्यामुळे प्रवास व ज्ञानार्जन या दोहोंच्या मार्गातले अडथळे सारखेच कोसळून पडत आहेत.

### कांही उदाहरणें

रेडियो-सेट बाळगणाऱ्या कुटुंबाच्या संख्येत तिपटीहून वाढ.




चित्रवाणीद्वारा 2,400 खेड्यांची सेवा.



देशान्तर्गत हवाई वाहतूक दुप्पट.



रस्त्यावरील मोटर वाहनांच्या संख्येत दुप्पट वाढ.





टेलिफोन सुखसोयीत दुपटीने वाढ.

### आंकडेवार प्रगति

| | 1965 | 1974 |
|---|---|---|
| रेडिओ परवाने | 4 दशलक्ष | 14 दशलक्ष |
| टी.व्ही. परवाने | 200 | .16 दशलक्ष |
| देशान्तर्गत हवाई वाहतूक | 935 दशलक्ष | 1991 दशलक्ष |
| (प्रवासी-किलोमीटर) | 97,000 दशलक्ष | 1,36,000 दशलक्ष |
| रेल्वे-प्रवास | | |
| (प्रवासी किलोमीटर्स) | 1.1 दशलक्ष | 2.1 दशलक्ष |
| मोटर वाहनें | .86 दशलक्ष | 1.63 दशलक्ष |
| टेलिफोन | 25 दशलक्ष | 33 दशलक्ष |
| वृत्तपत्रांचा खप | | |

उपग्रह चित्रवाणी व आर्यभट्ट ही सर्व झाली कालची म्हणजे गेल्या वर्षातील प्रगति ! आता अधिकच वाढत्या विश्वासाने व वज्रनिर्धाराने भारताने 1976 मध्ये प्रवेश केला आहे.

davp 75/561

# विल्सन

## नेत्यांनाही निवृत्ती हवी

वा. दा. रानडे

ब्रिटिश पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांच्या राजीनाम्याने राजकीय नेतृत्वाच्या दृष्टीने काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. पहिला प्रश्न, नेत्याने केव्हा निवृत्त व्हावे? विल्सन यांच्या मते साठ वर्षांच्यापुढे माणसाची कार्यशक्ती कमी होऊ लागते, तेव्हा क्रियाशील राजकारणातून नेत्याने निवृत्त व्हावे. राजकीय कार्य अजिबात सोडावे, असे ते म्हणत नाहीत. ते स्वतः पार्लमेंटचे सभासद राहणार आहेत. एवढेच नव्हे तर मतदारांची इच्छा असल्यास निवडणुकीलाही पुनः उभे राहणार आहेत. पण आपल्या मतदारसंघाचे प्रश्न पार्लमेंटपुढे मांडणे, निरनिराळ्या प्रश्नांवर आपली मते प्रदर्शित करण्यापुरतेच यापुढे त्यांचे कार्य मर्यादित राहील. सरकारी नोकर, खाजगी नोकर वयाची ५५–६० वर्षे झाली की निवृत्त होतात, मग राजकीय नेत्यांना, मंत्र्यांना निवृत्तीची वयोमर्यादा का नसावी? विल्सन यांनी स्वतःला हा निकष लावला. साठ वर्षांच्यापुढे पंतप्रधान पदावर राहायाचे नाही असे दोन वर्षांपूर्वी पंतप्रधानपद स्वीकारतानाच त्यांनी मनाशी ठरवून टाकले. पण आपला हा बेत त्यांनी अगदी गुप्त राखला. आपल्या निकटच्या सहकाऱ्यांनासुद्धा त्याची कल्पना येऊ दिली नाही. निर्णय गुप्त ठेवण्याचा उद्देश त्यांनी सांगितला नाही, पण आपल्यामागून नेता कोणी व्हावयाचे याचे राजकारण व हालचाली बऱ्याच आधीपासून सुरू होऊन देशापुढील मुख्य प्रश्नाकडे दुर्लक्ष होऊ नये. हा उद्देश त्यामागे असावा असे दिसते व तो योग्यच होता असे म्हणावे लागेल.

बरेच वय झाले तरी, सत्ता न सोडणारी निरनिराळ्या राष्ट्रांतील नेते मंडळी पाहिली म्हणजे, त्या पार्श्वभूमीवर विल्सन यांचा निर्णय विशेष वाटतो. सत्तापद जास्तीत जास्त काळ उपभोगण्याच्या बाबतीत भांडवलशाही राष्ट्रे व कम्युनिस्ट राष्ट्रे यांत काही फरक आढळत नाही. फ्रान्सचे अध्यक्ष दगोल यांनी १९ व्या वर्षांपर्यंत नेतृत्व केले. तीच गोष्ट जनरल फ्रँकोंची. मृत्यूनेच त्यांना सत्तेवरून दूर केले. युगोस्लाव्हियाचे मार्शल टिटो व चीनचे माओत्सेतुंग वयाची ऐंशी ओलांडलेले, पण सत्ता सोडायला तयार नाहीत. माओ पंतप्रधान नसतील, पण चीनमध्ये पक्षप्रमुख हाच सर्वश्रेष्ठ असतो. रशियाचे ब्रेझनेव्ह सत्तरीच्या आसपास आले. त्यांची प्रकृती बरी नाही, तरी नेतेपद त्यांनी सोडलेले नाही. आपले भारतीय नेतेही याला अपवाद नाहीत. पंडित नेहरूंना ७५ व्या वर्षी मृत्यूने गाठेपर्यंत त्यांनी पंतप्रधानपद सोडलेले नाही. काही काळ निवृत्त होण्याचा विचार बऱ्याच वर्षांपूर्वी त्यांनी व्यक्त केला होता, पण सबंध देशातून 'तुमचे नेतृत्व आम्हाला हवे' अशी पत्रे तारा, ठराव यांचा एवढा वर्षाव त्यांच्यावर झाला की, त्यांना तो विचार सोडून द्यावा लागला. विल्सन यांनी निवृत्तीचा विचार आधी असा उघड बोलून दाखविला असता, तर त्यांच्यावर तीच पाळी आली असती. पण मनाशी ठरविलेल्या निर्धारानुसार त्यांनी कृतीही करून टाकली. निवृत्तीची भाषा बोलायची, 'तुमचे नेतृत्व आम्हाला हवे आहे' अशी मागणी देशभर होऊ द्यावयाची आणि तिला मान दिल्याचे दाखवून आपले सत्तेचे स्थान अधिक बळकट करावयाचे असा नाटकीपणा विल्सन यांच्या निर्णयात नव्हता.

साठाव्या वर्षी जबाबदारीच्या जागांवरून निवृत्त होण्याची विल्सन यांची कल्पना चांगली आहे, पण साठीच्या आसपासच ज्यांना पंतप्रधानपद मिळते त्यांनी काय करावयाचे? काही वर्षे तरी सत्ता उपभोगून आपल्या मनाप्रमाणे देशाच्या कारभाराला वळण द्यावे, असे त्यांना वाटणे स्वाभाविक आहे. विल्सन प्रथम १९४५ साली पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. एवढ्या तरुण वयात फार थोड्यांना मंत्रिपद मिळते. साठाव्या वर्षी निवृत्त व्हावयाचे तर, तरुणपणापासूनच जबाबदारीच्या जागा मिळत गेल्या पाहिजेत. राजकारणाला तसे वळण योजनापूर्वक लावायला हवे. नव्या रक्ताला अधिक वाव मिळाला पाहिजे. वयाच्या ७५–८० वर्षांपर्यंत नेते सत्तेला चिकटून राहू लागले तर, तरुणांना वाव मिळणार कसा? साठीनंतरही काहींची प्रकृती व कार्यशक्ती काही वर्षे चांगली असते हे खरे, तरीही त्यांनी निवृत्त होऊन वेळेअभावी आतापर्यंत आपल्या आवडीच्या, ज्या क्षेत्रांकडे त्यांना लक्ष देता आले नाही त्या क्षेत्रात कार्य करावे.

राजीनाम्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत विल्सन यांनी मांडलेले दोन मुद्दे महत्त्वाचे आहेत. त्यांपैकी एक मुद्दा नेत्याच्या अत्यावश्यकतेबद्दलचा. 'देशाला यांचे नेतृत्व अत्यावश्यक आहे. त्याशिवाय देशाचे चालणार नाही.' असे काही नेत्यांबद्दल म्हटले जाते. विल्सन यांना ते पटत नाही. ते म्हणाले, 'विशिष्ट नेत्याच्या अत्यावश्यकतेवर माझा विश्वास नाही. एखादी व्यक्ती अत्यावश्यक मानली जात असेल तर, त्यापासून लोकशाहीला खरा धोका आहे.'

दुसरा मुद्दा नेत्याची निवड करण्याच्या पद्धतीचा. काही महत्त्वाकांक्षी व्यक्तींना प्रत्यक्ष राजा होण्यापेक्षा, आपल्या पसंतीच्या व्यक्तीला गादीवर आणणे आणि राजा न होताही सर्व सूत्रे आपल्याकडे ठेवणे आवडते. अशा प्रकारचे राजकारण खेळण्यात ते कुशल असतात व 'किंग मेकर' म्हणून ओळखले जातात. निवृत्त झाल्यानंतर अशी 'किंग मेकर'ची भूमिका बजावण्याची विल्सन यांची इच्छा नाही. नव्या नेत्याच्या निवडीबाबत आपण कोणतेही मत किंवा सल्ला देणार नाही असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. निवृत्त नेत्याच्या सल्ल्याने नवा नेता निवडला जाणे म्हणजे, एक प्रकारे सत्तेची गाडी वंशपरंपरागत चालू ठेवण्यासारखेच आहे असे त्यांना वाटते. ते म्हणाले, 'माझ्या वारसाबाबत मी कोणतेही मत व्यक्त करणार नाही. नेता नेमला जाण्यापेक्षा निवडणुकीने निवडला जाण्यावर माझा विश्वास आहे.' निकोप लोकशाहीचा एक संकेतच विल्सन यांनी येथे सांगितला आहे. या संदर्भात आपल्याकडे निरनिराळ्या राज्यांचे, विशेषतः काँग्रेसचे बहुमत असलेल्या राज्यांचे, मुख्यमंत्री कसे निवडले जातात हे पाहण्यासारखे आहे. या निवडीत विधिमंडळ पक्षाला फारसे स्वातंत्र्य नसते. मुख्यमंत्री कोणी व्हावयाचे हे काँग्रेस श्रेष्ठी ठरवितात आणि त्यावर शिक्कामोर्तब करणे एवढेच काम विधिमंडळ पक्षापुढे राहते. ही प्रथा बदलून नेता निवडीच्या बाबतीत पक्षाला पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे. केंद्रीय नेतृत्वाचे कोणतेही दडपण येता कामा नये. आपल्याकडे यापुढे तरी ही पद्धती अवलंबली जावी. □

नेदरलंड, जपान, जर्मनी, इटली, तुर्कस्थान, स्वीडन, सौदी अरबस्थान, इराण व आणखी इतर काही देशांत खळबळ उडवून देणारे

# लॉकहीड प्रकरण

विजया जोशी

जानेवारी महिन्यात सबंध जगात खळबळ माजवणाऱ्या 'लॉकहीड प्रकरणा'चा जन्म 'वॉटरगेट'मध्येच झाला. वॉटरगेट प्रकरणाचाच तो एक लहानसा धागा होता. गेले एक वर्ष त्यावर साधकबाधक विचार होत होता, परंतु लॉकहीड एअरक्राफ्ट कॉर्पोरेशनने परदेशांतील व्यक्तींना दिलेली लांच डच राजघराण्यापर्यंत आणि जपान सरकारच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांपर्यंत पोचली असण्याची शंका जेव्हा व्यक्त करण्यात आली, तेव्हा हे प्रकरण जगभर गाजले. १०-१२ देशांची नावे त्यात गोवली आहेत.

लॉकहीड एअरक्राफ्ट कॉर्पोरेशनचीE 104 ही विमानदलाची विमाने, ट्रीस्टार हे मुलकी उतारु-वाहू विमान आणि ओरायन हे नौसेनेसाठी असलेले विमान खपवण्यासाठी त्यांनी केलेल्या कृष्णकृत्यांचा संपूर्ण तपशील अद्याप जाहीर व्हायचा असला, तरी बाहेर आलेल्या माहितीवरून कोटयवधी डॉलर्सची लाच चारून, त्यांनी आपल्या विमानांचा खप वाढवला, हे सिद्ध झाले आहे. अमेरिकन सेनेटच्या उपसमितीपुढे कॉर्पोरेशनच्या दोघा सर्वोच्च अधिकाऱ्यांनी तशी कबुली दिली आहे. कॉर्पोरेशनचे अध्यक्ष डॅनियल जे. हॉटन आणि उपाध्यक्ष ए. कार्ल कोट्चियान यांना आपल्या पदाचा त्याग करावा लागला आणि त्यांच्याजागी न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजचे माजी अध्यक्ष रॉबर्ट हॉक यांची नियुक्ती झाली आहे.

या भ्रष्टाचार प्रकरणात नेदरलंडचे प्रिन्स बर्नार्ड यांच्याविरुद्ध सर्वांत जास्त रान उठले. राणी ज्युलियाना यांचे ते पती. ६४ वर्षांचे, उमद्या स्वभावाचे, सुसंस्कृत पण रंगेल प्रिन्स बर्नार्ड लॉकहीड कॉर्पोरेशनच्या यादीवरील सर्वप्रथम मोठे गिऱ्हाईक म्हणे ! गेल्या १५ वर्षांत त्यांना कॉर्पोरेशनने ११ लाख डॉलर्सची लांच दिली. (म्हणजे सुमारे ८८ लाख रुपये) त्या बदल्यात त्यांनी लॉकहीड कॉर्पोरेशनच्या कॅलिफोर्नियातील कंपनीकडून १३८ स्टार फायटर जेटस् घेतली. प्रिन्स बर्नार्ड डच सशस्त्र दलाचे इन्स्पेक्टर जनरल आहेत. नेदरलंडचे पंतप्रधान जूप डेन उईल आणि राणी ज्युलियाना यांच्याबरोबरच्या एका बैठकीत प्रिन्सनी आपले नाव सेनेटच्या उपसमितीच्या निष्कर्षात घेतले जाते, हे मान्य केले आहे. नेदरलंडच्या पंतप्रधानांनी सदर आरोपांची चौकशी करण्यासाठी ३ उच्च अधिकाऱ्यांची समिती नेमली असून, डच राजकीय निरीक्षकांचे मत आहे की, प्रिन्स बर्नार्ड जर दोषी ठरले, तर राणी ज्युलियाना आणि ते आपल्या २८ वर्षांच्या कारकीर्दीवर पाणी सोडून राज्यत्याग करतील.

जगातल्या एका सर्वांत श्रीमंत अशा स्त्रीशी ज्यांचा विवाह झाला आहे, आणि ज्यांना स्वत:ला वार्षिक ३ लाख डॉलर्सचा तनखा आहे, अशा प्रिन्स बर्नार्डनी लढाऊ विमानांच्या खरेदीत आपला हात बरबटू कसा दिला, हे एक गूढ आहे. कदाचित प्रिन्सच्या नावाखाली तिसराच एखादा 'मध्यस्थ' 'मलिदा' चाखत असेल. दुसरा एक प्रवाद असा की, जागतिक वन्यप्राणी निधीसाठी प्रिन्स हे पैसे देत असतील दुर्मीळ होत चाललेल्या वन्यप्राण्यांच्या जतनासाठी हे पैसे वापरले जातात. प्रिन्स हे या निधीचे अध्यक्ष आहेत हे खरे, ते निधी वाढवण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतात हेही खरे, परंतु त्यांनी कधीही १० हजार डॉलर्सपेक्षा अधिक रक्कम या निधीला दिलेली नाही.

प्रिन्स बर्नार्ड यांचा रंगेल स्वभाव जाणून, राणी ज्युलियाना त्यांच्या खर्चावर लक्ष ठेवीत आहे. वास्तविक वर्षाला ३ लाख डॉलर्स ही रक्कम हातखर्चाला पुरी पडायला हवी, परंतु प्रिन्स बर्नार्ड यांच्या 'उच्च अभिरूची'साठी हे पैसे पुरत नाहीत, आणि म्हणूनच वाढत्या खर्चाला तोंड देण्यासाठी त्यांनी हा 'मार्ग' शोधला असावा असाही एक प्रवाद आहे.

नेदरलंडमध्ये या गोष्टीची फारच खळबळ माजली असून, राजघराण्याला कलंक ठरलेल्या या लांचखोरीमळे, प्रत्येक डच व्यक्ती निराश झाली आहे. प्रिन्स बर्नार्डवरील आरोप जरी दूर झाले तरी कदाचित, सशस्त्र सेनादलाचे इन्स्पेक्टर जनरल म्हणून त्यांना निवृत्त व्हावे लागेल. पुढल्या वर्षी त्यांचा ६५ वा वाढदिवस आहे हे निमित्त त्यांना पुढे करता येईल. राणी ज्युलियाना या ६६ वर्षांच्या असून निवृत्त होण्याचा त्यांचा विचार होताच. तो आता कदाचित लवकर अंमलात येईल. ही अफवा पसरल्यापासून सदा उत्साही, हंसतमुख प्रिन्स बर्नार्ड १० वर्षांनी म्हातारे झाल्यासारखे दिसू लागले आहेत असे म्हणतात. डच लोकांची लाडकी राणी ज्युलियाना, या जर निवृत्त झाल्या तर, त्यांची ३८ वर्षांची कन्या बीट्रीक्स आणि त्यांचे पती प्रिन्स क्लॉस (४९ वर्षे) राज्यावर येतील. या दोघांचाही कल सोव्हिएत युनियनकडे असून त्याचीच डच लोकांना चिंता वाटत आहे.

सेनेटर चर्च समितीच्या निष्कर्षावरून हादरलेले दुसरे राष्ट्र म्हणजे जपान. पंतप्रधान ताकीओ मिकी यांचे सरकार त्यामुळे डळमळू लागले आहे. योशियो कोडामा या उजव्या गटातील लष्करी तज्ज्ञाने F 104, L 1011 आणि C-130 हर्क्युलिस मालवाहू विमाने आणि P 38 ओरायन पाणबुडीविरोधी विमाने खरेदी करण्यास मदत म्हणून १९५८ पासून ७० लाख डॉलर्स निरनिराळ्या अधिकाऱ्यांना चारले आहेत. जपानी सरकारचे

बडे अधिकारी आणि सत्तारूढ लिबरल डेमोक्रॅटिक पक्ष यांना ते पैसे गेले असावेत. माजी पंतप्रधान काकुई तनाका हे सर्व आरोपांचे केन्द्रस्थान आहेत. १९७४ मध्ये त्यांच्या वैयक्तिक आर्थिक भानगडींपायी त्यांना पदत्याग करणे भाग पडले होते. सध्या अधिकारपदावर असलेल्या काही व्यक्ती या भ्रष्टाचार प्रकरणात गुंतलेल्या असाव्यात अशी भीती पक्षनेत्यांना भेडसावीत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानवर ओढवलेले सर्वात मोठे संकट, असे ज्याचे वर्णन केले जाते त्या या भानगडीत ७ साक्षीदारांना आणि योशियो कोडामा यांना कबूली जबाब देण्यासाठी बोलवायचे ठरले. परंतु कोडामा यांच्या डॉक्टरांनी ते अतिशय आजारी असून त्यांचे हृदय दुर्बल झाले आहे असे जाहीर करून त्यांना इस्पितळात दाखल करून टाकले. 'आपण या भानगडीत लक्ष घातले असून परराष्ट्रखाते वॉशिंग्टनकडून अधिक माहिती मागवत आहे.' असे पंतप्रधान ताकिओ मिकी यांनी जाहीर केले आहे. पंतप्रधान मिकी यांचे आणि त्यांच्या कुठल्याही निकटच्या सहकाऱ्याचे नाव भ्रष्टाचार भानगडीत गोवलेले नाही, परंतु कॅबिनेट मंत्र्यांपैकी एकाचे नाव गुप्त यादीत आहे असे बोलले जाते. माजी पंतप्रधान तनाका यांना लिबरल डेमोक्रॅटीक पक्षातून काढून टाकून पक्षाला आपला जोर वाढवता येईल. श्री. तनाका हे स्वतःच एखादा नवा पक्ष काढून लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाला आव्हान देण्याची शक्यता आहे. येत्या निवडणुकींवर या भ्रष्टाचार प्रकरणाचा परिणाम होईल हे मात्र निश्चित.

पश्चिम जर्मनीतील राजकारणातही या भ्रष्टाचार भानगडीमुळे वादळ निर्माण झाले आहे. पश्चिम जर्मनीचे माजी संरक्षण मंत्री फ्रान्झ जोसेफ स्ट्रॉय यांना लॉकहीड कॉर्पोरेशनने भरपूर 'मलिदा' चारला आहे. पुढील हिवाळ्यातील निवडणुकींसाठी त्यांच्या पक्षाने, म्हणजे ख्रिश्चन सोशल युनियनने आणि ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियनने करार केला असून, हे दोन पक्ष जर निवडणुकीत विजयी ठरले तर स्ट्रॉय यांना महत्त्वाचे पद प्राप्त होईल.

आपण किंवा आपल्या पक्षाने लांच स्वीकारली नाही, असे स्ट्रॉय छातीठोकपणे म्हणत आहेत. 'स्टर्न' या पश्चिम जर्मनीतील नामवंत मासिकाने आणि रेडिओ, टेलिव्हिजनने त्यांच्याविरुद्ध उठवलेले काहूर स्ट्रॉय यांनी बरेचसे शमवले आहे. परंतु आता या भ्रष्टाचार प्रकरणातून जो निष्कर्ष निघेल त्याने स्ट्रॉय यांच्यावरील डाग पूर्णतया धुतला जाईल असे दिसत नाही.

लॉकहीड प्रकरणात इटलीत लुईगी गुई यांचे नाव गोवले गेले आहे. पंतप्रधान आल्डो मोरो यांच्या मावळत्या काळजीवाहू सरकारातील लुईगी गुई हे गृहमंत्री असताना अमेरिकन सेनेटच्या उपसमितीने सूचित केले आहे की, १९७० मध्ये इटलीच्या दोन संरक्षण मंत्र्यांना १६ लाख डॉलर्स देण्यात आले. ६ कोटी डॉलर्स किंमतीची C–130 ही मालवाहू विमाने इटालियन सरकारने खरेदी केली. त्यासाठी ही लांच देण्यात आली होती. १९७० मध्ये काही काळ गुई हे संरक्षणमंत्री होते, म्हणूनच ख्रिश्चन डेमोक्रॅटिक सरकारमध्ये कोणचेही पद स्वीकारायला त्यांनी स्वतःच नकार दिला आहे. गुई आणि दुसरे संरक्षणमंत्री तानाकी या दोघांनीही आपण लाच स्वीकारल्याच्या आरोपाचा स्पष्ट इन्कार केला आहे. C–130 विमानांच्या खरेदी प्रकरणावर उजेड टाकण्याची विनंती त्यांनी सरकारी वकिलाला केली आहे.

तुर्कस्थान, स्वीडन, सौदी अरबस्थान, इराण हे देशही या भ्रष्टाचार वावटळीत सापडले आहेत.

लॉकहीड कॉर्पोरेशनने जपानमधील गुप्त हस्तक योशियो कोडामा यांच्याकडे ७० लाख डॉलर्सचे हप्ते कसे पोचवले हेही बघण्यासारखे आहे. येनच्या नोटांनी भरलेली खोकी कोडामा यांच्याकडे येत असत. काही पैसे बेअरर चेकच्या रूपाने येत.

इटलीत 'लिरा' भरलेली लहान लहान पाकिटे सरकारी अधिकाऱ्यांच्या टेबलावर गुपचूपपणे ठेवली जात. बेनामी खाती वगैरे इतर नेहमीचे मार्गही कॉर्पोरेशनने अनुसरलेच. सबंध जगभर गाजलेल्या या प्रकरणात आपल्या देशाचा तर काही संबंध नाहीना अशी भीती प्रत्येक देशाला विशेषतः मध्यपूर्वेतील देशांना वाटत आहे.

□ □


**पॅपिलॉन**
**पॅपिलॉन**

**लेखक : हेन्री शॅरीयर**
**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**किंमत : पंचवीस रुपये**
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# आपली लोकशाही : आगामी दहा वर्षे

## समारोप । रत्नाकर महाजन

२६ जून १९७५. भारतीय जनजीवनावर व इथल्या राजकारणावर, दूरगामी परिणाम करणारा हा ऐतिहासिक दिवस. त्या दिवशी जे काही घडले त्याची तरतूद भारताच्या घटनेमध्ये असली तरी, त्या तरतुदीचा उपयोग कोणी भावी सत्ताधारी करील, असे त्यावेळी वा त्यानंतर कोणालाही वाटले नव्हते. देशाच्या संसदीय राजकारणात हयाती घालविलेल्यांना हा एक अनपेक्षित धक्का होता. त्यामुळेच सर्वांच्या विविध प्रतिक्रिया होणे अपरिहार्य होते. राजकारणात असलेल्या वा नसलेल्या, विचार करणाऱ्या नागरिकांच्या या महत्त्वाच्या घटनेविषयीच्या प्रतिक्रिया काय आहेत हे जाणून घेण्यासाठी राजधानीतल्या काही लोकांना मी भेटलो. ( या भेटीगाठींवर आधारलेल्या चार मुलाखती यापूर्वी माणूसमधून प्रसिद्ध झाल्याच आहेत. या अंकी उरलेल्या तीन मुलाखती देऊन विषय संपवला आहे. ) ज्यांना भेटलो ते, सर्वच बोलायला तयार होते असे नाही. त्यांतले काही लोक बोलले. जे बोलले त्यांचाही सद्य:स्थितीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बराच भिन्न होता. ज्यांची मते यात नोंदली नाहीत अशा लोकांमध्ये, ही एक तात्पुरती परिस्थिती आहे, तिची काळजी करण्याचे कारण नाही, लवकरच पूर्वस्थिती आणली जाईल येथपासून ते, आता ही कायमची स्थिती आहे, २६ जून पुन्हा उगवणे शक्य नाही, इथपर्यंत मते असणारे लोक आहेत.

प्रत्यक्ष दैनंदिन राजकारणात काम करणारे व न करणारे यांच्यात अधिक दूरवरचा गंभीर विचार करण्याची चांगली प्रवृत्ती दिसून आली. आजच्या तात्कालिक संदर्भात विचार करण्याऐवजी, एका विशिष्ट ऐतिहासिक प्रक्रियेच्या परिणामी ही परिस्थिती निर्माण झाली आहे आणि पुढे येणाऱ्या बऱ्याच काळपर्यंतच्या राजकीय परिस्थितीवर तिचे दूरगामी परिणाम होणार आहेत, म्हणून तात्कालिक उपाययोजना हे त्यावरचे उत्तर नव्हे; सबंध व्यवस्थेतच दोष निर्माण झाल्याने व ती बदलल्याशिवाय ते दोष जाण्याची शक्यता नसल्याने, ही व्यवस्था बदलण्यासाठीच इथून पुढे अधिक गंभीरपणाने काम केले पाहिजे, असे बहुतेकांचे म्हणणे आहे. पंचवीस वर्षांच्या संसदीय लोकशाही परंपरा क्षणात कोसळल्यामुळे संसदीय पद्धतीविषयी अनेकांचा भ्रमनिरास झाला आहे. संसदीय राजकारण आणि क्रांतिकारी राजकारण यांतील फरक स्पष्ट होण्याची प्रक्रिया या भ्रमनिरासाने सुरू झाली तरी नसे थोडके !

भारतीय लोकशाहीच्या पुढील दहा वर्षांच्या स्थितीविषयी विचार करणारे आजच्या परिस्थितीला, इथल्या विरोधी पक्षांनाही सारखेच जबाबदार धरतात. पण या कोंडीतून वाट काढून, इथे लोकशाहीची पुनर्स्थापना करण्याची जबाबदारीही ते त्यांच्यावरच टाकतात. म्हणजे अजून विद्यमान पक्षांना कोणीही पूर्णपणे मोडीत काढलेले नाही.

आणीबाणीनंतर वातावरणात पसरलेले भय, दहशत ही कमी झाल्यासारखे दिसत असले तरी, राजकीय क्षेत्रात विशेषत: पुढच्या काळात होणाऱ्या घटनांचा अंदाज घेण्याच्या संदर्भात पूर्वी जेवढी अनिश्चितता (element of uncertainty ) होती ती अजून कायम आहे. पण आजपर्यंत घडलेल्या व आज घडत असलेल्या घटनांच्या प्रकाशात पुढील अंदाज व्यक्त करण्याचे प्रमाण वाढले आहे.

सर्वसामान्य जनतेस राजकारणापासून तोडण्याचे, त्यांचे दैनंदिन जीवन बिगर राजकीय ( depoliticise ) करण्याचे सरकारी नेतृत्वाचे प्रयत्न चाललेले आहेत. जनतेने अशा रीतीने राजकारणापासून दूर राहण्याने त्यांची सर्वाधिकारशाही अधिक बळकट्च होण्यास मदत होईल. अशा रीतीने संपूर्ण सिस्टीम डीपोलिटिसाईझ करण्याचे

सरकारी प्रयत्न कितपत यशस्वी वा अयशस्वी होतात त्यांवर लोकशाहीवादी शक्तींच्या भावी प्रयत्नांचे यश अवलंबून आहे. मला प्रा. सेठी यांनी सांगितलेला हा मुद्दा महत्त्वाचा वाटतो. दैनंदिन जीवनातून राजकारणाची ही हकालपट्टी तात्काळ रोखली पाहिजे. त्यासाठी जनतेत राजकीय जाणिवा जागृत करून त्यांवर तिचे विस्तृत राजकीय शिक्षण केले पाहिजे. याशिवाय खऱ्या अर्थाने जनसमर्थित व जनतेचा सहभाग असणारे, लोकशाहीरक्षणाचे लढे उभे राहणार नाहीत.

प्रस्थापित सत्ताधाऱ्यांना तावडतोबीचा पर्याय निर्माण करण्याचा विचार आत्मघातकी ठरेल. कारण तावडतोबीचा पर्याय निर्माण करणे हे उद्दिष्ट ठरले की, त्याप्रमाणे सर्व तात्कालिक डावपेच आखावे लागतात. या प्रयत्नांत पर्याय निर्माण करू पाहणाऱ्यांच्यापैकी काहींना आमिषे दाखवून वा किरकोळ तडजोडी करून फोडण्याचे तंत्र इथल्या सत्ताधाऱ्यांना किती उत्तम साधले आहे याला इतिहास साक्षी आहे. या मधल्या प्रकारांमुळे सबंध चळवळीत दिशाभूल होऊन मनोधैर्य खचण्याचा धोका असतो. शिवाय अशा तावडतोबीच्या पर्यायनिर्मितीने खरे प्रश्न सुटत नाहीतच. म्हणून या तात्कालिक प्रश्नात न अडकता लांबवरच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी जनतेत जाऊन काम करणे व त्यातून ' बेस ' निर्माण झाल्यावर लोकशाहीसाठी लोकशाहीवादी जनलढे संघटित करणे हे आज अस्तित्वात असलेल्या सर्व लोकशाहीवादी शक्तींनी आपले एकमेव काम मानले पाहिजे. ◻

# मुलाखती

पाच

---

## श्री. वी. जी. वर्गीस

माजी संपादक हिंदुस्थान टाइम्स : दिल्ली

सध्या ' कॉमर्स ' नियतकालिकाच्या दिल्ली कार्यालयातील संपादकीय विभागात.

---

आज सर्वांत महत्त्वाची गोष्ट कुठली असेल तर ती ही की, राष्ट्रीय पातळीवर (Reconcilation) सहमती (Consensus) निर्माण करणे. स्वातंत्र्योत्तर काळात सुरुवातीच्या काही वर्षांत अशी सहमती होती. पण १९६० नंतर, विशेषत: १९७० नंतर, देशात एक विशिष्ट प्रकारची तीव्र संघर्षाची परिस्थिती (Confrontation) निर्माण झाली. खऱ्या अर्थाने उदारमतवादी, लोकशाहीनिष्ठ अशा चौकटीत नवीन सहमती निर्माण करणे हे आता सर्वांत महत्त्वाचे काम आहे. परस्पर संवाद प्रक्रियेद्वारा सुस्पष्ट राष्ट्रीय उद्दिष्टे ठरविली पाहिजेत आणि त्याविषयी व्यापक राष्ट्रीय एकमत (Consensus) तयार केले पाहिजे. खुल्या मनाने, विचारांचे आदान–प्रदान व खुली चर्चा हाच अशा मतैक्याचा मार्ग असू शकतो.

**प्रश्न :** असे राष्ट्रीय मतैक्य कसे निर्माण करता येईल ?

**उत्तर :** प्रदीर्घ व मुक्त चर्चेच्या द्वारे. राजकीय पक्षोपपक्ष, बुद्धिवादी, विचारवंत, कामगार संघटनांचे पुढारी, विद्यार्थी, ग्रामीण जनतेचे प्रतिनिधी, या जनतेच्या सर्व स्तरांवर मुक्त खुल्या चर्चा झाल्या पाहिजेत.

आज जे काही घडत आहे त्याचा, आजच्या तात्कालिक संदर्भात वेगळा विचार करता येणार नाही. गेल्या किमान दहा वर्षांपासून व्यवस्थाविषयक पेचप्रसंग (Crisis of System) आपल्यासमोर उभा आहे. शिक्षणव्यवस्था, न्याय व कायदापद्धती, प्रशासनव्यवस्था, नियोजन, निवडणूकपद्धती, आरोग्यव्यवस्था या सर्व व्यवस्थांमध्ये अत्यंत विकट अशा परस्परावलंबी समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या कशा सोडवायच्या याचा, तात्कालिक संदर्भात विचार करून भागणार नाही. दूरवरचा विचार करून ही सबंध व्यवस्थाच, बदलायच्या वा दुरुस्त करायच्या दिशेने विचार केला पाहिजे. ही सबंध व्यवस्थाच बदलल्याशिवाय प्रत्येक क्षेत्रातले प्रश्न कायमचे सुटणार नाहीत. व्यवस्थाविषयक सम्यक् भान न ठेवता, प्रश्नांची तात्पुरती उकल करणे ही केवळ डागडुजी होईल. अशा प्रकारे व्यवस्था सुधारण्याची भाषा अनेक वेळा बोलली जाते. पण ती कशी सुधारायची हे मात्र कोणीच सांगत नाही.

जन जीवनविषयक समस्या सारख्या वाढतच आहेत. गेल्या २५ वर्षांत गरीबी, बेकारी, आरोग्यविषयक समस्या, या साऱ्या कमी होण्याऐवजी उत्तरोत्तर वाढतच आहेत. पंचवीस वर्षांत या प्रश्नांची तीव्रता आपण थोडीही कमी करू शकलो नाही, याची कारणे शोधली पाहिजेत. माझ्या मते याचे कारण दर वेळी आपण एका प्रश्नाचा वेगळा, तात्पुरता विचार करून त्यावर तात्पुरती उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण व्यवस्थेचे दोष आपण कधीच ध्यानात घेतले नाहीत म्हणून असे झाले. म्हणून संपूर्ण व्यवस्थेचा विचार केल्याशिवाय तात्कालिक प्रश्न सोडविणे व्यर्थ आहे. चलन फुगवटा, धान्यटंचाई असे तात्कालिक प्रश्न विशेष महत्त्वाचे नाहीत. त्याहीपेक्षा ज्या प्रकारची समाजव्यवस्था आपण निर्माण करू इच्छितो, त्यासाठी आवश्यक असलेल्या व्यवस्थेचा प्रश्न हा अधिक महत्त्वाचा, खोलवर रुजलेला असा आहे. एकूणच समाजव्यवस्था आणि मूल्ये यांचा हा प्रश्न आहे.

**प्रश्न :** कोणत्या प्रकारची समाजव्यवस्था आपणास अभिप्रेत आहे ?

**उत्तर :** आजच्या समाजव्यवस्थेला पर्याय गांधीजींना अभिप्रेत असलेली व्यवस्था हाच असू शकतो. १९२० वा ४२ साली गांधीजी काय म्हणाले वा त्यांनी काय केले हे महत्त्वाचे नाही. गांधींच्या त्यावेळच्या कृतींमागची तत्त्वे ध्यानात घेऊन, १९७६ सालास वा त्याही पुढच्या काळास, योग्य अशा कार्य–योजना तयार केल्या पाहिजेत. गांधीजी हे काही एखाद्या ऐतिहासिक काळालाच केवळ बांधलेले व्यक्तिमत्त्व नव्हते. त्यांना तसे मानणे म्हणजे, त्यांचे अवमूल्यन करणे होय. गांधीविचाराचा गाभा विकेंद्रीकरण हा आहे. राजकीय क्षेत्रात सत्तेचे अधिक विकेंद्रीकरण, आर्थिक क्षेत्रात उत्पादन व्यवस्थेचे–साधनांचे अधिक विकेंद्रीकरण, नियोजनाच्या क्षेत्रात सर्वांत शेवटचा गरीब माणूस हा मध्यबिंदू मानून त्याच्या हितास प्राधान्य देणारे नियोजन, आजच्या भांडवलप्रधान तंत्रविज्ञानाऐवजी श्रमप्रधान तंत्रविज्ञानाचा अवलंब करून, नियोजन व विकास या गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे. गांधीजींना अभिप्रेत असलेल्या समाजव्यवस्थेत साधी राहणी, अनावश्यक शहरीकरण थांबविणे, (Conspicuous consumption) या गोष्टींना फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचा अवलंब करावा लागेल. पश्चिमी देशांतील संपन्न शहरी–समाजाची भ्रष्ट नक्कल प्रत्येक क्षेत्रात केली जाते. या अंधानुकरणामुळे सुशिक्षित, संपन्नवर्ग सर्वसामान्य लोकांपासून वेगळा पडला आहे. राजकीय पद्धती ही संपूर्ण समाजव्यवस्थेचाच एक भाग असतो. तिचा विचार वेगळा होऊ शकत नाही.

या सर्व समस्यांचा मूलगामी विचार करण्यासाठी खुल्या, निर्भय वातावरणात मुक्त चर्चा झाल्या पाहिजेत. त्यासाठी भयहीन अशा सामंजस्यपूर्ण वातावरणाची निर्मिती आधी झाली पाहिजे.

**प्रश्न :** आपल्या घटनेत काही बदल करावे लागतील का ?

**उत्तर :** आपली घटना ही पुरेशी लवचिक, परिवर्तनशील व उदार आहे. त्यामुळे ती बदलायची फारशी गरज भासू नये. तथापी घटना बदलायच्या प्रश्नावर मी अजिबात आग्रही (Dogmatic) नाही. घटनाबदलाचा विचार करण्यापूर्वी, आपली सामाजिक व अन्य उद्दिष्टे ठरविली पाहिजेत. ही उद्दिष्टे पक्की झाल्यावर, त्यांपैकी एखाद्या उद्दिष्टाच्या पूर्तीआड घटनेचा काही भाग येत असेल तर, तो भाग बदलावा लागेल. अशा तऱ्हेने विशिष्ट प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी घटनेत दुरुस्त्या आपण यापूर्वीही केल्या आहेत. ◻

सहा

## प्रा. जे. डी. सेठी

### दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, दिल्ली

२६ जून १९७५ रोजी या देशातील लोकशाहीस एक मोठा धक्का लागला. (Set-back) या दिवसाच्या आधीही लोकशाहीविषयक अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. पण त्या दिवशी लोकशाहीचा अस्त झाला. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यातील परस्पर संघर्षाचा–तणावांचा (Conflicts) उच्चांक त्या दिवशी गाठला गेला. त्यापूर्वी इथल्या राजकीय जीवनात जे काही घडत होते, त्यांत सर्वसामान्य जनता फारशी नव्हतीच. जनतेच्या नावाने प्रत्येकजण आपले राजकारण करीत होता. गेल्या साठ-सत्तर वर्षांपासूनचे गांधीजींनी सुरू केलेले राजकारण त्या दिवशी संपले. तथापी ज्या प्रकारे हे राजकारण चालविले गेले, ते सारे मध्यमवर्गीय राजकारण होते. त्या वर्गापुरतेच ते राजकारण मर्यादित होते. त्यामुळे इथल्या लोकशाहीचा अर्थ, सर्वसामान्य जनतेचा राज्यव्यवस्थेत वा देशाच्या एकूणच जीवनात सहभाग, असा कधीच झाला नाही. राजकारणाच्या या मर्यादिततेमुळेच पेचप्रसंग निर्माण झाला. स्वातंत्र्योत्तर भारतात जे राजकारण केले जात होते, त्याचे वर्णन दोन एकवर्गीय गटांमध्ये चाललेला सत्तेसाठीचा संघर्ष असे करावे लागेल. साधनसंपन्न लोकच (Haves) दोन गटांमध्ये विभागले जाऊन सत्तेसाठी संघर्ष करीत होते. अशा तऱ्हेने एकाच वर्गाच्या दोन गटांमध्ये चाललेली ही लढाई केव्हा तरी संपणार होती. ती २६ जूनला एक गट वरचढ ठरून संपली. त्या आधीचा पेचप्रसंग हा या गटांतील आपसातला अंतर्गत संघर्ष होता. हा संघर्ष कधी तरी संपणे क्रमप्राप्त होते. तो २६ जूनला संपला. त्यामुळे त्या दिवशी जे काही झाले, त्यात अनपेक्षित असे काहीही नव्हते.

स्वातंत्र्योत्तर २५ वर्षांत लोकशाहीच्या आधार असलेल्या व लोकशाहीचे अस्तित्व दर्शविणाऱ्या लोकशाही संस्था एकेक करून नष्ट होत होत्या. २६ जूनला संसद आणि न्यायालय या शिल्लक असलेल्या संस्थाही प्रभावहीन झाल्या.

**प्रश्न :** गेलेली लोकशाही परत येण्याचा संभव आहे काय ?

**उत्तर :** मुळीच नाही. जगातल्या कोणत्याही देशात एकदा गेलेली लोकशाही आजपर्यंत परत आलेली नाही. लोकांचे काढून घेतलेले लोकशाही अधिकार व हक्क, त्यांना परत देणारे एकही सरकार अजून जगात दिसलेले नाही. त्यामुळे येथेही लोकांचे लोकशाही अधिकार परत मिळण्याची शक्यता नाही. लोकशाही आपोआप परत येणार नाही. ती आणावी लागेल. आणि ती परत आणण्यासाठी फार लांब मुदतीचा लढा द्यावा लागेल. हा संघर्ष बराच काळपर्यंत चालणारा असेल.

**प्रश्न :** हा लांबवरचा संघर्ष कसा असेल, तो कोणत्या पद्धतीने चालवावा लागेल, असे आपणास वाटते ?

**उत्तर :** याचा नक्की आराखडा सांगणे कठीण आहे. पण चळवळीत मार्क्स व गांधीजी यांच्या विचारांचा व मूल्यांचा विचार प्रमुख असावा लागेल. या दोन्ही विचारांच्या मिश्रणाने चळवळीचा वैचारिक पाया तयार करावा लागेल. त्यातही भारतीय संदर्भात, गांधीजींच्या विचारांवर अधिक भर द्यावा लागेल.

आज संपूर्ण व्यवस्था राजकारणविहीन करण्याचा प्रयत्न चालला आहे (System is being depoliticised). दैनंदिन जीवनातून राजकारणाची हकालपट्टी करण्याचा घाट घातला जात आहे. हे अत्यंत वाईट आहे. लोकांच्या दृष्टीने हे चांगले लक्षण नव्हे. सर्वसामान्य जनता राजकारणाच्या बाहेर राहिली, तर प्रत्यक्षात एकाधिकारशाही राज्यकर्त्यांना बळच मिळते. म्हणून आज सर्वप्रथम गरज कशाची असेल, तर दैनंदिन जीवनातून अदृश्य होत चाललेले राजकारण परत सुरू करण्याची आहे. कोणत्या ना कोणत्या मार्गाने

राजकारणाची पुन्हा सुरुवात ही आजची सर्वप्रथम गरज आहे. हे खरे असले, तरी या आधीसारखे मध्यमवर्गीय राजकारण आता पुन्हा येऊ शकणार नाही. राजकीय विचारसरणींचा (ideologies) त्या सांगणाऱ्यांच्या जीवनात साक्षात्कार झाला, तरच जनता त्यांच्यावर विश्वास ठेवील. राजकीय कार्यकर्त्यांच्या उक्ती आणि कृतीतली तफावत लोक आता खपवून घेणार नाहीत. ज्याच्या प्रत्यक्ष जीवनात उक्ती व कृतीमधला फरक नष्ट झाला आहे, अशा कार्यकर्त्यांसच इथून पुढे जनतेचा विश्वास प्राप्त होईल, इतरांना नाही. या अर्थाने एक प्रकारे इथून पुढचे राजकारण हे अधिक गंभीर झाले आहे.

राजकीय कामास काही वाव राहिला नाही, वा त्यास परवानगीच नाही मिळाली तर, कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे, नागरी स्वातंत्र्य परत मिळविणे, यांसारख्या मार्गांनी राजकीय काम पुन्हा सुरू करण्यासाठी जनतेस लढावे लागेल. ब्रिटिश राजवटीत गांधीजींनी केले, तसे राजकारण Politics of Ambivalance करावे लागेल. सरकारी धोरण व कार्यक्रम राबविण्यास मदत होईल, अशा प्रकारे काम करून त्यांनी जनसंघटन केले, व त्या जनसंघटनाच्या आधारेच स्वातंत्र्य आंदोलन पुढे उभे राहिले. इथून पुढे याच मार्गाने ग्रामीण भागात भूमिहीन, बेघर मजुरांमध्ये काम करून, त्याद्वारे राजकारणाची पुनर्स्थापना करावी लागेल.

**प्रश्न :** येथून पुढे सरकारच्या कृतींचे स्वरूप काय असेल ?

**उत्तर :** नक्की काही भाकीत याविषयी करणे अवघड आहे. पण ज्या दिशेने आज सर्व घटना घडत आहेत, घडविल्या जात आहेत, त्यांवरून लोकशाही अस्तित्वात राहण्याची चिन्हे कमीच आहेत. वर सांगितल्याप्रमाणे जनजीवनातून राजकारण बंद करण्यात आले आहे. हे राजकारण जर परत आणले गेले नाही, तर शासकीय नेतृत्वास लोकशाही चालू ठेवण्यात फारसा रस नाही. किमान येत्या ३।४ वर्षांत तरी, लोकशाही परत येण्याची शक्यता फारच कमी, जवळजवळ नाहीच.

**प्रश्न :** कोणत्या स्वरूपाची लोकशाही आपणास अभिप्रेत आहे ?

**उत्तर :** या प्रश्नाचे निश्चित व पूर्ण उत्तर देणे कठीण आहे. जगाची विभागणी साधारणतः तीन गटांत करता येते. विकसित भांडवलशाही देश, साम्यवादी देश आणि या दोहोंपैकी कोठल्याही समूहात न येणारे 'थर्ड वर्ल्ड' नावाने ओळखले जाणारे देश. या तिन्ही गटांतील देशांमध्ये लोकशाहीविषयक काही ना काही समस्या अस्तित्वात आहेतच. साम्यवादी देशात व्यक्तिगत स्वातंत्र्य व राजकीय सत्तेचे वाटप हे मोठे न सुटलेले प्रश्न आहेत, तर विकसित भांडवलशाही देशांत आर्थिक सत्तेचे वाटप आणि सामाजिक सत्तेचे वाटप व त्याचबरोबर नीतिमूल्य-व्यवस्थेत आलेली विकृती हे भेडसावणारे प्रश्न आहेत. विकासमान अशा तिसऱ्या जगाच्या देशांत हे सर्व प्रश्न तर आहेतच; शिवाय त्यांच्या जोडीला आर्थिक विकासाचाही प्रश्न आहे. त्या सर्व समस्या एकत्र असल्याच्या परिणामी या तिसऱ्या जगातील देशांमध्ये आजपर्यंत लोकशाहीचे आदर्श रूप (मॉडेल) विकसित होऊ शकलेले नाही. त्यामुळे आपल्या विकसनशील देशास लागू पडेल असे, लोकशाहीचे एकही मॉडेल आपल्याभोवतीच्या देशांत अस्तित्वात नाही. याचाच दुसरा अर्थ असा की, इथली विशिष्ट ऐतिहासिक परिस्थिती, राजकीय प्रवाहाची दिशा व अन्य भौतिक गोष्टी लक्षात घेऊन, आपल्याला आपले स्वतःचे लोकशाहीचे मॉडेल विकसित करावे लागेल.

हे करीत असताना गांधीजींच्या राजकारणविषयक–लोकशाहीविषयक विचारांची दखल घ्यावी लागेल. आदर्श लोकशाहीत गांधींनी दोन समांतर राजकीय व्यवस्थांची कल्पना केली आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांतील लोकशाहीच्या धर्तीवर राजकीय पक्षांकरवी केले जाणारे 'लिबरल' राजकारण व शासनपद्धती ही एक व्यवस्था. या व्यवस्थेकरवी आवश्यक तेवढा राजकीय कारभार, राज्ययंत्रणेद्वारा चालविला जावा. दुसरी या प्रमुख राजकीय व्यवस्थेस समांतर अशी व्यवस्था म्हणजे, संपूर्ण अधिकारांनीयुक्त अशा ग्राम पंचायती होत. या ग्रामपंचायतींनी आपले खेडे आत्मनिर्भर (स्वावलंबी) करण्याचे काम करावे. राजकीय, आर्थिक व अन्य सर्व बाबतींत अशी स्वावलंबिता प्राप्त केली पाहिजे. यासाठी आवश्यक ते सर्व घटनात्मक अधिकार पंचायतींना दिले पाहिजेत. संसदीय निवडणुकांच्या द्वारे राज्ययंत्रणा चालविण्यासाठी प्रतिनिधी निवडणे व तदनुषंगिक अन्य कामे, ही प्रत्यक्ष लोकशाही आणि पंचायतींच्या द्वारे खेड्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी चालविले जाणारे राजकीय व अन्य काम, ही अप्रत्यक्ष लोकशाही होय. या दोन्ही – प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष – लोकशाही पद्धती, एकाच वेळी सारख्याच वेगाने व दोहोंवर सारखाच जोर देऊन चालविल्या पाहिजेत. परस्परपूरक अशा या दोन पद्धती हा गांधींच्या लोकशाहीविषयक विचारांचा गाभा आहे. आर्थिक क्षेत्रात उत्पादन साधनांची मालकी समाजाच्या हाती देण्यासाठी, काही नवीन सामाजिक संस्था निर्माण कराव्या लागतील. देशाच्या व समाजाच्या आर्थिक जीवनाचे नियंत्रण या सामाजिक संस्थाकरवी केले जाईल. जनतेच्या जीवनातील राजकीय व आर्थिक बाबींचे सर्वाधिकार, सर्व पातळ्यांवर जनतेच्या हाती राहिले पाहिजेत. सर्व क्षेत्रात विकेंद्रीकरण हे गांधीप्रणीत समाजव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. आज विकेंद्रीकरणाच्या नावाखाली केंद्रीकरण चालले आहे. ती विकेंद्रीकरणाच्या कल्पनेची थट्टा आहे. ◻

सात

## श्री. उमाशंकर जोशी

प्रसिद्ध गुजराती साहित्यिक व राज्यसभा सदस्य

जॉर्ज ऑर्वेलने आपल्या 1984 या पुस्तकात जगाचे जे भावी चित्र रेखाटले आहे, ते भारतात त्याआधीच प्रत्यक्षात उतरण्याची, खरे होण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. काही विशेष घडले नाही, तर हे चित्र प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे. २६ जून रोजी जे काही घडले त्यानंतरच्या ९ महिन्यांचा अनुभव आपल्याला काय सांगतो ? राजकीय क्षेत्रात जे घडण्याची भीती आहे, वा तशी भीती निर्माण करणाऱ्या ज्या घटना गेल्या काही दिवसांत घडल्या, त्याबद्दल लोकांमध्ये उदासीनता (apathy) दिसते. सुरुवातीस बसलेल्या धक्क्यातून (stunning) अजून लोक पूर्णपणे सावरलेले नाहीत.

कोणत्याही राज्यपद्धतीत, सर्व प्रकारचे मतांतर (विरोध) नष्ट करण्याचा प्रयत्न होता कामा नये. असे करण्यात कोणतेच शहाणपण नाही. म्हणून राज्यकर्त्या पक्षाला व नेतृत्वाला आपली राजकीय शैली बदलावीच लागेल. विरोधाचा प्रत्येक मार्ग बंद केला आणि सर्व जनतेचे केवळ आम्हीच हितकर्ते आहोत, असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला, या माझ्या मते राज्यकर्त्यांनी दोन मोठ्या चुका केल्या आहेत. हे सारे राज्यकर्त्यांनी का केले ? बाहेर ते कोणतीही कारणे सांगोत, प्रत्यक्ष त्यांच्या अंतर्गतच वाढत चाललेल्या असंतोषास दडपून टाकण्यासाठीच हे त्यांनी केले आहे. पण त्यांच्या अजून हे लक्षात आलेले दिसत नाही की, त्यांनी जे काही उपाय योजले आहेत ते विपरीत परिणामकारी आहेत. जे साधायचे म्हणून हे केले, त्याच्या नेमक्या विरुद्ध याचे परिणाम होणार आहेत. आजची परिस्थिती अशांतता कमी करण्याच्याऐवजी अशांततेस प्रोत्साहन देणारी आहे.

आपल्या भोवती घडणाऱ्या घटनांच्या बाबतीत डोळसपणे विचार करणारांच्या मनात, आजच्या घटनांविषयी व राज्यकर्त्यांविषयी साहानुभूती असण्याची शक्यता फारच कमी आहे. आज तोंडाने जे साहानुभूती व्यक्त करीत आहेत व पाठिंबा देत आहेत, त्यांचा भ्रमनिरास होण्याची वेळ फार दूर नाही. अर्थात् त्यांचे मौन फारसे सक्रिय होईल असेही नाही.

पुढील दहा वर्षांत भारतीय लोकशाहीचे स्वरूप काय राहील, हे पुढील वर्षभरात काय काय होईल यांवर बरेचसे अवलंबून आहे. म्हणून पुढील एक वर्ष हे महत्त्वाचे आहे. तामीळनाडू व गुजराथची काँग्रेसेतर सरकारे गेल्याने सर्व देश आता एकछत्री अंमलाखाली आला आहे. अशा तऱ्हेने सर्व देशाचे एकछत्री राज्य हाती घेणे हेच तर, या दोन्ही राज्यांच्या विधानसभा विसर्जित करण्यामागचे उद्दिष्ट होते. ते आता साध्य झाले आहे. यानंतर आता राज्यकर्त्यांना सर्व मार्ग खुले आहेत. म्हणून पुढील वर्षभरात भारतीय राजकारण काय रूप घेते, (mould) यावर पुढील दहा वर्षांतील लोकशाहीचे, राजकारणाचे भवितव्य अवलंबून आहे. पुढचे एक वर्ष हे दहा वर्षांच्या घटनांचा पाया (base) आहे. म्हणूनच पुढचे वर्ष हे सर्वाधिक महत्त्वाचे (crucial) आहे. या वर्षी होणाऱ्या घटनांचे भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम होतील. आज तरी भावी घटना कसा आकार घेतील, हे ठरविणाऱ्या प्रभावी शक्ती (influential forces) अस्तित्वात नाहीत. सरकारी नेतृत्वाच्या हातीच आता सर्व अभिक्रम (initiative) आहे. भविष्यकालचा सर्व निर्णय तेच आता घेऊ शकतात. संपूर्ण परिस्थितीवर त्यांचाच ताबा आहे. भावी राजकीय चौकट (साचा) काय असावी याचा निर्णय सरकारी पक्ष-नेतृत्वच घेऊ शकते. तात्कालीन जगातले तणाव व दडपणे यांपासून प्रस्थापित व्यवस्था वाचविण्याचा, तसेच प्रस्थापितावरोबर जनता असल्याचा भास निर्माण होईल असे स्वरूप त्या व्यवस्थेस देण्याचा प्रयत्न होईल.

पण या मार्गाने नव-भारताची निर्मिती होऊ शकणार नाही. नव भारताच्या निर्मितीसाठी, देशाच्या सार्वजनिक जीवनात जे काही घडते, त्यांत जनतेचा सहभाग असला पाहिजे. राजकीय व आर्थिक सत्तेचे विकेन्द्रीकरण झाले पाहिजे. आज यांपैकी काहीही कुठेच दिसत नाही. विकेंद्रीकरणाचे नाव घेत, सत्तेचे अधिकाधिक केंद्रीकरण होत आहे. आम्ही, सारे जनतेच्या हितासाठी करीत आहोत, असे नेतृत्व निरंतर सांगत असले तरी प्रत्यक्ष जनता त्यांच्या हिशोबात कुठेच दिसत नाही.

म्हणून स्वातंत्र्योत्तरकाळात, जनता आपण मानत होतो त्यापेक्षा अधिक दुर्बल, कमजोर आहे, हे कटु सत्य पुढे आले आहे. हे कटु सत्य जसे आपणास समजले आहे, तसेच ते साऱ्या जगाला समजले आहे. देशहिताच्या । समाजहिताच्या विरुद्ध असलेल्या गोष्टींना विरोध करण्याची शक्ती, (मानसिक) नागरिकांमध्ये अजून आलेली नाही हीच ती दुर्बलता होय. त्यामुळे देशहितैषी व जनहितैषी अशा कार्यकर्त्यांचे काम आता पुष्कळ वाढले आहे. देश रोम-रोमी समर्थ बनायला पाहिजे. तसे देशास समर्थ कसे बनवायचे हा खरा प्रश्न आहे.

**प्रश्न :** भावी परिस्थिती कसे व कोणते वळण घेईल असे आपणास वाटते ?

**उत्तर :** परिस्थिती कसे व कोणते वळण घेईल, यापेक्षा ही परिस्थिती ज्यांना मान्य नाही ते काय करतील, यात मला अधिक रस आहे. आज परिस्थितीत एक प्रकारची कृत्रिमता, अवास्तविकता (unreality) आहे. ही अवास्तविकता लोक फार काळपर्यंत सहन करतील असे मानणे चूक होईल. म्हणून गेल्या नऊ महिन्यांत काय झाले याचा संदर्भ सोडून दिला, तरी देशात परिवर्तनाची गरज बराच काळ आधीपासून निर्माण झाली आहे. आपल्या सामाजिक व राजकीय कमतरता त्याआधीही आपल्याला माहीत होत्या. आता त्याच्याविषयी आपण जागरूक झालो आहोत, झाले पाहिजे.

येणाऱ्या दहा वर्षांत सामाजिक न्याय, स्वातंत्र्य यांनी युक्त अशी नवी समाज-व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने कामास लागले पाहिजे. हे सारे करायचे असेल, तर या कामात जनतेचा सहभाग अत्यावश्यक आहे. आजच्या परिस्थितीने हा सहभागच अशक्य करून टाकला आहे. नोकरशाही किंवा एखादा मोठा राजकीय पक्ष, हे सारे काम करू शकेल असे मानणे हा भाबडेपणा होईल. देशहिताच्या दृष्टीने, देश प्रगतीच्या रस्त्याने पुढे जावा या चांगल्या उद्देशाने आणीबाणी जाहीर केली गेली असे मानले तरीही, जनतेच्या सक्रिय सहभागाशिवाय हे फार दिवस चालणे शक्य नाही. कारण यातून काहीही साधणार नाही. आणीबाणीसारख्या भयपूर्ण वातावरणात देश प्रगतिपथावर जाईल असे मानणेच चूक आहे. आणीबाणी आहे हा मुद्दा बाजूस ठेवला तरी या दिशेने काही केले तरच काही तरी खरे (genuine) काम आपण करू शकू.

**प्रश्न :** इथून पुढच्या काळात सरकार कसे वागेल असे आपणास वाटते ?

**उत्तर :** या संबंधात नक्की काही भविष्य वर्तविणे कठीण आहे. पण निगेटिव्हली मी एवढे सांगू शकतो की, भाषा, चालीरीती, धर्म यांची एवढी विविधता असलेल्या या प्रचंड देशात, वैचारिक स्वातंत्र्याची परंपरा असलेल्या व सत्यशोधक म्हणून ज्याची कीर्ती आहे अशा या देशात, मूठभर लोकांनी बहुसंख्यांकांवर वरून काही तरी लादावे, थापावे हे फार काळ चालणार नाही. कारण त्यात जनसामान्यांचा सहभाग नसेल. त्यामुळे आजचा राजकीय सत्तेचा

पृष्ठ २० वर

# फ्रीडम ॲट मिडनाईट : एक आव्हान

लेखांक दुसरा । गोपाळ गोडसे

## तीन

नथूराम स्त्रीद्वेष्टे होते असा निष्कर्ष फ्रीडम ॲट मिडनाईटच्या लेखकांनी काढला आहे. एक प्रसंग त्यांनी दिला आहे.

नथूराम डोकेदुखीने आजारी होते. नाना आपटे यांनी त्यांना बळेबळे रुग्णालयात हालविले. दोन दिवस विश्रांती मिळेल. त्यानंतर त्यांना उन्मुक्त–डिस्चार्ज– करा असे त्यांनी डॉक्टरना सांगितले होते.

डोके दुखण्याची मर्यादा एक दिवस असते, हे नथूराम यांना नेहमीच्या अनुभवाने ठाऊक होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ते रुग्णालयातून सरळ निघून आले.

ही घटना घडली होती.

परिचारिकांना भिऊन नथूराम निघून आले, अशी लेखकांनी संगती लावली. एखादा अविवाहित पुरुष स्त्रियांशी सलगी दाखवीत नसेल, तर त्याचे कारण त्या पुरुषात स्त्री द्वेष असला पाहिजे, हे लेखकांनी मानसशास्त्र लढविले आहे. लेखक किती उथळ आणि कोत्या मर्यादेत विचार करू शकतात याचे हे एक उदाहरण आहे.

ग्वाल्हेरचे श्री. पु. ल. इनामदार माझे आणि डॉक्टर परचुरे यांचे विधिज्ञ होते. दिल्ली येथील विशेष न्यायालयाने डॉ. परचुरे यांनाही या अभियोगात जन्मठेप सुनावली होती. सिमला येथे तेव्हा पंजाबचे उच्च न्यायालय भरत असे. लाहोरचे हिंदू, निर्वासित झाले; हिंदुस्थानात आले, तशीच न्यायालयाची स्थिती झाली होती. सिमला न्यायालयात डॉ. परचुरे आणि मी यांच्या पुनरावेदनाचे काम इनामदार बघत होते. नथूराम स्वतःचे वक्तव्य स्वतःच करणार होते, म्हणून त्यांनाही सिमल्यात ठेवले होते.

श्री. इनामदार पंचाहत्तरी उलटून गेलेले आहेत. सध्या ते मुंबईला त्यांच्या मुलाकडे राहातात. त्यांनी आपले अनुभव लिहून ठेवले आहेत. ते एक पुस्तकच सिद्ध करण्याच्या खटपटीत आहेत. थोड्या दिवसांपूर्वी त्यांच्या हस्तलिखिताचा काही भाग बघण्याचा योग आला.

नथूराम यांना ज्या काही भेटी, सिमल्याच्या त्यांच्या बंदिवासात मुलींनी आणि चाहत्यांनी आणून दिल्या, त्यांत एका मुलीने एक स्वेटर आणून दिला. त्या घटनेचा उल्लेख मी 'गांधीहत्या आणि मी' या माझ्या पुस्तकात केला आहे. तो प्रसंग श्री. इनामदार यांचे समक्ष घडला.

कोणा थोरामोठ्याच्या एका मुलीने योग्य त्या अधिकाऱ्यांची अनुज्ञा मिळवून, नथूराम यांची सिमल्याच्या त्या कोठडीत भेट घेतली. आरक्षी अधिकारीही मुलीसमवेत होते.

मुलीने विनम्रपणे नमस्ते म्हणून नथूरामना वंदन केले. ती म्हणाली, 'हा स्वेटर मी आपल्यासाठी विणला आहे. आपण ही भेट घ्यावी.' आरक्षी अधिकाऱ्यांना तिने आपला मनोदय आधीच कळविला होता. त्याने पूर्वदक्षता म्हणून स्वेटर बघून घेतला होता.

नथूराम यांनी हात पुढे करून आभारपूर्वक तो स्वेटर घेतला. 'माझ्या या प्रेमळ बहिणीचं नाव कळेल का मला?' (मे आय नो दि नेम ऑफ माय काईंड सिस्टर ?) त्याने विचारले.

डोळ्याला डोळा देऊन, मग डोळे विनम्र करून ती मुलगी दोन क्षण उभी राहिली. नाव विचारल्याने काही कोणाच्या भावनांना हात घालण्याचा प्रश्न नसतो. पण त्या मुलीचे डोळे पाणावले. एखाद्याविषयी मनस्वी आदर असावा आणि भावनातिरेकाने शब्द फुटणे अवघड व्हावे, तशी तिची अवस्था झाली. तिने आपले नाव सांगितले. पुढे ती म्हणाली, 'हा स्वेटर घालून आपण न्यायालयात येत जावे ही माझी इच्छा आहे!'

मुलीच्या बोलण्याचा, वागण्याचा अर्थ कोणीही काहीही काढावा. नथूराम तो स्वेटर घालत असत. त्या मुलीला धन्य धन्य होऊन गेले.

सिमल्याच्या त्या न्यायालयात प्रवेश-पत्रिका घेऊन प्रवेश मिळे. एक महाविद्यालयीन मुलगी नियमितपणे येत असे. ती ठराविक आसनावर बसत असे. न्यायालयाचे कामकाज लक्षपूर्वक ऐकत असे.

एके दिवशी एका आरक्षी अधिकाऱ्याने, आपला कोणी विशेष मित्र न्यायालयात आणला. त्याला आसन त्या मुलीचे द्यावे, असे त्या अधिकाऱ्याला वाटले. त्या मुलीजवळ जाऊन तो म्हणाला, 'कृपा करून तुम्ही त्या तिसऱ्या खुर्चीवर बसता का?'

'का?' त्या मुलीचा प्रश्न.

'हे आसन माझ्या या मित्राला द्यायचे आहे.'

'त्यांना त्या तिसऱ्या खुर्चीत बसवा' त्या मुलीने थंडपणे सांगितले. आपला थंडपणा, उर्मटपणा वाटू नये, म्हणून आपले बोलणे तिने स्मिताने झाकले.

अधिकाऱ्याने अधिक आग्रह केला नाही. मित्राला त्याने संकेत केला, त्याप्रमाणे तो मित्र त्या तिसऱ्या खुर्चीवर बसला. पण या मुलीने आपले ऐकले नाही, हे त्याच्या मनावर तरंगत राहिले.

न्यायालय चालू होण्याची वेळ झाली. नथूरामना आणले गेले. विधिज्ञ मंडळी जमू लागली. न्यायमूर्ती येण्यास थोडा अवधी होता.

तो अधिकारी त्या मुलीजवळ आला. म्हणाला, 'क्षमा करा; तुम्ही प्रत्येक दिवशी याच आसनावर का बसता? प्रवेशपत्र आहे, याचा अर्थ विशिष्ट आसने आरक्षित केली आहेत, असा नव्हे!'

ती मुलगी हसली. म्हणाली, 'मला नथूरामना सुंदर स्मित द्यायचे असते, आणि हा तो कोन आहे. नाही तर त्यांच्या चपखल युक्तिवादाचे रसग्रहण कसे करायचे ? (I want to give Nathuram a pleasant smile, and this is the right angle. In what other way can I appreciate 'his' appropriate arguments ?') ती इतक्या मोठ्याने बोलली की, आजूबाजूच्या सर्व लोकांचे लक्ष तिच्याकडे वेधले. प्रत्येकास कौतुकाचे हसू आले. तो अधिकारीही हसला, तितक्याच कौतुकाने ! रसग्रहण करणाऱ्या अनेक आरक्षी अधिकाऱ्यांतील तो एक होता. तो निर्वासित होता !

एक शीख तरुण आणि त्याची बहीण अधिकाऱ्यांना सांगून नथूराम यांना भेटली. फाळणीच्या घावांचे परिणाम नथूराम यांनी आपल्या निवेदनात रेखाटले होते, तर त्या भावंडांनी ते समक्षच अनुभविले होते. त्यांना नथूरामविषयी आदर वाटणे स्वाभाविक होते. ती भावंडे न्यायालयात नियमितपणे बसत असत. ती मुलगी डॉक्टर आहे. दिल्ली, कानपूर या भागांत तिचे वास्तव्य असते. तिचे नाव नरेश पालसिंग.

प्रत्येक १५ नोव्हेंबरला तिचे नथूरामच्या स्मृतिवंदनाचे पत्र येते. पत्रात भाव असा असतो, 'या दिवशी आपण आपले प्रिय बंधू नथूराम यांचे स्मरण करू या.'

माझे बंधू दत्तात्रय त्या दिवसांत सिमल्याला असताना या डॉ. नरेश पालसिंग यांची भेट झाली. श्री. दत्तात्रय यांना रक्षाबंधनासाठी नरेश पालकडून अव्याहत राखी येत असते. मी सुटल्यावर माझ्याकडेही राखी येते. मी त्यांच्या घरी गेलो होतो. त्यांनी मला एक आठवणीची वस्तू दाखविली. सिमला न्यायालयातील प्रवेश-पत्रिका त्यांनी जपून ठेवली होती. त्यांनी त्यांचीही काही संस्मरणे लिहून ठेवली आहेत.

आणखीही काही अशाच घटना आहेत. प्रत्येक मुलीने नथूरामकडे भाऊ याच दृष्टीने पाहिले, असेही नव्हे.

असे हे प्रसंग कोणाही पुरुषाला सुखद वाटणार नाहीत काय ? पण म्हणून मर्यादा ओलांडून कोणी वागला नाही, तर त्याच्यावर स्त्रीद्वेष्टा असा ठसा मारणे म्हणजे मनाचे आकलन न होण्याचे लक्षण आहे.

तेव्हाचे काही प्रसंग कोणाही लेखकाला फाशीच्या छायेतील हृद्य प्रणय म्हणून रंगविता येतील. ते प्रसंग चांगले खुलतीलही. पण हानी एकच होईल. नथूराम यांचे यथार्थ चित्र वाचकांना मिळणार नाही. प्रदर्शन न करता, मनुष्याजवळ जी शालीनता असते, जे मार्दव असते, जी शोभिवंत मर्यादा असते ती नथूराम यांच्याजवळ होती. त्यामुळेच अशा कोमल प्रसंगांच्या वेलबुट्या करून त्यांच्या जीवनपटावर मढविणे तितकेच अयथार्थ होईल, जितके त्यांच्याविषयीचे स्त्रीद्वेष्टेपणाचे दुष्ट आरोप. इतिहासाचे विकृतीकरण असेही केले जाते, आणि निराकरण झाले नाही तर इतिहास असाच होता, अशी धारणा होते.

नथूराम यांच्या चरित्राचे रसग्रहण करायचे आहे ! वाचकांचे, विशेषतः त्यांतील इतिहासतज्ज्ञांचे, मानसशास्त्रवेत्त्यांचे लक्ष एका गोष्टीकडे मला वेधता येईल.

गांधीजींविषयी आत्यंतिक विरोधी भावना नथूराम यांनी वागविल्या, त्याचे पर्यवसान गांधीवध, हा इतिहासच आहे.

गांधीजींच्या जीवनपटाच्या अंगोपांगांत त्यांच्या वैषयिक जीवनाच्या उल्लेखांनाही त्यांनी महत्त्व दिले होते. सत्याचे प्रयोग; किंवा ब्रह्मचर्याची महती, किंवा अमुक दुर्घटना का झाली, मला अमुक अपयश का आले याची चिकित्सा करतांना, माझ्या ब्रह्मचर्यात कोठे तरी न्यून राहिले म्हणून, किंवा माझ्या विकारांवर मी विजय मिळवू शकलो नाही म्हणून, अशी त्यांची विधाने; किंवा कामविकारावर उतारा म्हणून सहशयन अशांसारखे त्यांचे प्रयोग या गोष्टी गांधीजी जीवमान असताना चर्चेचा आणि टीकेचाही विषय झाल्या होत्या. त्यांची थट्टा झाली होती. व्यंगलेख आणि व्यंगचित्रे यांना ते खाद्य झाले होते.

नथूराम यांनी मी गांधीवध का केला, हे सांगण्यासाठी शंभर पानी लेखी निवेदन प्रस्तुत केले. दिल्लीच्या विशेष न्यायालयात दोन दिवस आणि सिमल्याच्या उच्च न्यायालयात नऊ दिवस आपले प्रतिपादन त्यांनी मांडले.

या सर्व लेखी किंवा तोंडी निवेदनात त्यांनी गांधीजींच्या राजनैतिक दंभाचारावर उग्र आघात केले, पण त्यांच्या वैयक्तिक, वैषयिक जीवनाचा, त्या प्रयोगांचा उल्लेखही केला नाही. उपहास करणे दूरच.

गांधीजींची साधी राहणी हाही तत्कालीन वृत्तपत्रांच्या थट्टेचा विषय असे. मात्र नथूराम यांनी गांधीजींचे मोठेपण सांगताना, त्यांच्या लोकप्रियतेचे कारण शोधताना, लेखी निवेदनाच्या छेदक ६१ मध्ये म्हटले आहे,

'राहणीतील साधेपणा, अंगीकृत कार्यातील स्वार्थरहित निष्ठा, त्यागवृत्ती आणि आफ्रिकेच्या शासकांच्या वर्णद्वेषाविरुद्ध झगडण्याची त्यांची तत्परता यांमुळे भारतीयांची प्रतिष्ठा उंचावली, आणि गांधी हिंदुस्थानात सर्वांना प्रिय झाले.'

तेव्हा, आपणाला जी व्यक्ती अप्रिय असेल, तिच्या वर्तनाची, राहणीची, वैयक्तिक जीवनाची, निंदा-नालस्ती करणे, किंवा अस्तित्वात नसलेले भाव त्या व्यक्तीला चिकटवणे, हे काही लेखकाला अनिवार्य नसते. त्या लेखकाचा भावच अशा प्रसंगी दिसतो. तो म्हणजे हीन भाव.

हनन वेगळे आणि चारित्र्यहनन वेगळे. वाचक सूज्ञ आहेत. फोड त्यांच्या लक्षात येईल. चारित्र्यहनन ही गोष्टच अपप्रचाराच्या हेतूने केलेली असते. त्यात खोटेपणा असतो, इतिहासविकृती असते. इतिहासलेखनाची पथ्ये न पाळल्याने, चारित्र्यहननकार नीतिहीन किंवा अनीतिमान ठरतो.

न्यायालयात गांधीजींच्या राजनीतीची छाननी करतानाही, नथूराम यांनी पाळलेल्या संयमावरून वाचकांनी त्यांचे मूल्यमापन करावे. सत्यासत्यता पडताळून बघण्यास पुरावा उपलब्ध आहे.

विषयच आला आहे. गांधीहत्या अभियोगात अभियोजकांनी आपले म्हणणे मांडतानाही विशिष्ट पातळी कधी सोडली नाही. चारित्र्य काढायचे आणि त्यावर कोठे तरी टीकाटिपणी करायची, हे त्यांनी केले नाही. विषय न्यायालयाच्या कामाशी संलग्न नसला तरीही जाता जाता कोणी सहज कोपरखळी मारून जातो. नाना आपटे यांच्याविरुद्ध त्यांच्या विशेष परिचयाची एक मुलगी उभी करण्या-

पूर्वीच त्यांनी तो बेत रहित केला. त्या साक्षीची ओळख न्यायालयात नाना आपटे यांची वयस्या (friend) एवढीच दिली. आणि ती अभियोजकांच्या विरुद्ध जाईल (होस्टाइल) म्हणून साक्ष घेत नाही, एवढेच सांगून तो विषय संपविला. ¤

## चार

उल्लेखित पुस्तकाच्या लेखकांना म्हणे आणखी एक गुपित कळले.

'सावरकर अनेक वर्षे अफूचे सेवन करीत !'

या तर्कटाला आव्हान मिळणारच ! हिंदुस्थान तसा अज्ञानी गणला जात असला तरीही, अफूसेवन करणारा मनुष्य कसा राहतो, कसा वागतो, कसा बोलतो याचे ज्ञान फ्रीडम ॲट मिडनाईट वाचणाऱ्या वाचकांपैकी पुष्कळांना असणार. त्यांतील अनेक लोकांनी सावरकरांना प्रत्यक्ष पाहिलेले असणार, त्यांच्या निकट सहवासात आलेलेही काही लोक असणार ही लेखकांची अटकळ होती. तशा परिस्थितीत पहिल्या झटक्यातच हे विधान मिथ्या असल्याचे प्रत्ययाला येणार. तसे होऊ नये, आपल्या तर्कटाला थोडा तरी सत्यतेचा आभास व्हावा, म्हणून लेखकांनी त्या भोवती एक छप्पर बांधले. ते कोणते ? तर ते म्हणे ' तसे त्या व्यसनाच्या आहारी गेलेले नव्हते !' (Not adicted to it !) म्हणजे, वर्षोवर्षे अफूसेवन करणारा माणूस त्या व्यसनाच्या आहारी गेलेला नसतो, इतपत लोकांनी विश्वास ठेवावा अशी लेखकांची अपेक्षा !

लेखकांचा हेतू इतिहासकथन हा नाही. सावरकर मद्यपान करीत होते, असे जर लेखकांनी झोकून दिले असते तर, त्यांच्या दृष्टीने, सावरकरांविषयी अधिक अप्रीती निर्माण होण्यास साहाय्य झाले नसते. मग त्यापेक्षा अधिक काही तरी पाहिजे म्हणून त्यांनी अफूचा शोध लावला !

'अमक्याच्या घरासमोर घाण टाकून ये; तुला पाच रुपये देतो' असे एखाद्याने भंग्याला सांगावे, आणि भंग्याने ते करावे, तसा प्रकार वाटण्याइतक्या हिडिस स्तरावर हे लेखक गेले आहेत. सावरकरांचे विरोधक आजही अनेक आहेत. पण त्यांच्यातील कोणी या जोडगोळीला असल्या कामासाठी हाताशी धरले असेल, असे मला मुळीच वाटत नाही. गाढवाला स्वप्ने पडायची तीही उकिरड्याचीच पडावीत तसे या तथाकथित इतिहासकारांच्या मेंदूच्या लहरीतून वाङमयीन अलंकार (!) प्रसवतात ते असले !

स्वातंत्र्यवीर सावरकर या लेखकांना समजले ते किती ? तर 'सावरकरांचे ध्येय रक्तपाती क्रांती करणे हे होते; राजनैतिक हत्या करीत राहणे ही कला त्यांनी आत्मसात केली होती,' येवढे सार काढण्याइतपतच ! हे गृहीत धरल्यावर, अशा व्यक्तींना काही वैगुण्ये चिकटवणे क्रमप्राप्तच होते. कारण लेखकांच्या मानसशास्त्राप्रमाणे, एरव्ही मनुष्य अशा निकृष्ट, म्हणजे रक्तपाती ध्येयाला चिकटून राहीलच कसा ? जो निर्व्यसनी असेल, सच्छील असेल, तो रक्तपात करील कशाला ? ही लेखकांची मनोधारणा !

इतिहास या नावाने जी खोटी विधाने लेखकांनी ठोकून दिली त्यांतील एक विधान, 'नाना आपटे यांना फाशीच्या फळीवर उचलून न्यावे लागले ' हे आहे.

लेखकाचा मेंदू कसा चालला हे बघण्याजोगे आहे. विलासी जीवन जगणारे ते नाना आपटे. अशा माणसाला मरण कसे आवडेल ? उद्याच्या उपभोगाचे काय ? तेव्हा मृत्यू उभा ठाकला आहे म्हटल्यावर मनाने, म्हणून शरीराने, कच खाल्लीच पाहिजे !

विलास हे ज्याचे आयुष्याचे ध्येय असेल, तो असल्या जीवघेण्या धकाधकीत तडफडायला जाईलच कशाला ? हात राखून वागणाऱ्या अशा व्यक्तीला आपले विलासीपण चार लोकांना कळणे यांत दुष्कीर्ती वाटत नाही. येथे तर, या धकाधकीत राजकीय दुष्कीर्तीचे बळी होणे, हेही ठरल्यासारखेच होते. ज्या घटनेने नानांनी सहयोग दिला ती घटनाही अशी नव्हती की, चार दोन महिन्यांचा बंदिवास भोगून झाला की, पुन्हा आपले विलास करायला मोकळे !

असेल विलासी जीवन ! पण विलासी जीवन म्हणजेच आयुष्याचे ध्येय आहे, असे न समजणारेही लोक इतिहासात होऊन जातात, इतिहासात होऊन गेले आहेत. जीवनच ते कोण्या ध्येयासाठी तुच्छ समजतात, तेथे विलासाची काय गोष्ट ! या वस्तुस्थितीपर्यंत लेखकांचा मेंदू पोहोचू शकला नाही !

विद्वान लेखकहो ! तुम्ही भले नथूराम किंवा नाना आपटे यांना निंदेचे लक्ष्य करा. ज्या धैर्याने त्यांनी मरणाच्या उंबरठ्यापर्यंत वाटचाल केली, ज्या उल्हसित वृत्तीने ते दोघे पृथ्वी आणि अज्ञात यांना सांधणाऱ्या, नव्हे तर विभागणाऱ्या सेतूवर उभे राहिले, त्याचे मूल्यमापन तुमच्याकडून होणे नाही ! तुमच्या देशात झाले नव्हते ना ते! तेव्हा तुम्ही त्यांच्याजवळ नसलेले गुणही त्यांना चिकटविले असतेत!

तुम्ही स्वत: नाना आपटे यांच्या जोडयांत उभे असल्याची कल्पना केलीत. दोर बघताच तुमची काय स्थिती होईल, याची अंधुक कल्पना केलीत, आणि ती नानांचा इतिहास म्हणून कागदावर उतरवलीत !

निंदा-नालस्तीवर पोट जाळणाऱ्या लेखकांनो ! तुमच्या त्याही कल्पनेत एक त्रुटी राहिली आहे ! तुम्ही नानांच्या जागी असतात तर, तुम्हाला फाशीच्या फळीवर उचलून नेण्याचा त्रासच पडला नसता ! तुम्हाला उचलून न्यावे लागले असते सरळ तिरडीवर !

मराठी वाचकवर्गाला एक पुनरुक्ती सहन करावी लागणार आहे. गांधीहत्या आणि मी या पुस्तकाव्यतिरिक्त मी काही लेख लिहिले आहेत, त्यांत एक प्रसंग दिला आहे—

आम्ही तेव्हा अंबाला बंदीगृहात होतो. नथूराम आणि नाना आपटे यांच्या फाशीला अद्याप चार-पाच दिवस होते. मी दुपारचा फाशीकोठीत गेलो होतो. आमचे कक्ष तेव्हा फाशीकोठीपासून पाच-एक घरांइतके दूर होते.

सहजगत्या त्या दिवशी नाना प्रथम दिसले.

'आज अमुक फाशी गेला. कळले ना ?' नानांनी मला विचारले.

सर्व बंदीगृहातच आज कोणी तरी फाशी गेले आहे, हे कळत असते. फाशी होऊन जाईपर्यंत बंदीगृह—म्हणजे कक्ष किंवा प्रशाल (बराकी)— उघडत नाहीत. चांगले साडेआठ—नऊ वाजलेले असतात तोवर. त्यामुळे मला फाशीची घटना ठाऊक होती. फाशीकोठीत जाणे—येणे असल्याने, कोण फाशी गेला असेल, याचीही कल्पना होती.

'तो अमुक सिंग फाशी गेला,' नाना म्हणाले. (नाव माझ्या

लक्षात नाही. आपण त्याला लक्ष्मणसिंग म्हणू.)

फाशीकोठीत चार खोल्या होत्या. फाशीवाल्यांच्या खोल्या बदलत असत. त्यामुळे त्या लक्ष्मणसिंगशीही कधी कधी बोलायला मिळायचे.

नानांना मला काही नवीन वार्ता म्हणून ती घटना सांगायची नव्हती. ते म्हणाले,

'आमची घमेंड उतरली आज, गोपाळ! लक्ष्मणसिंगने उतरवली ती!'

'का? काय झाले?' माझा प्रश्न.

'त्याने सकाळी स्नान केले, पूजापाठ केला. मोठ्या प्रसन्न मुद्रेने त्याने आमचा निरोप घेतला आणि तो फाशीच्या मंचाकडे निघाला. निरोप कसा घेतला त्याने? 'अच्छा भैय्या! आओगे तो मिलेंगे फिर! गुरुके घर!' असे म्हणून!

त्या लक्ष्मणसिंगची कथा माझ्या कानांवर होती. पत्नीच्या संबंधांत त्याने कोणाला गोळी घातली होती. सैनिकी न्यायालयाने त्याला फाशी सुनावली होती. फाशीचे कार्यवहन करण्यासाठी त्याला अंबाला बंदीगृहात धाडले होते.

लक्ष्मणसिंगला त्याच्या कृत्याचा पश्चात्ताप नव्हता. स्वतःच्या मरणाची त्याला चिंता नव्हती. ज्याला त्याने मारले होते, त्याने त्याच्या मनःस्वास्थ्यावर कठोर आघात केला होता. 'एक दिवस मरायचेच आहे! पण जगत आहोत, तोवर मानाने जगता येत नसेल, तर ते कसले जगणे' अशासारखी त्याची वचने मी त्याच्याही बोलण्यांतून ऐकली होती.

पण प्रत्यक्ष मरणाची वेळ येताच स्वतःचा धीर सुटतो, अशीही उदाहरणे मी पाहिली आहेत. त्यामुळे नानांनी सांगितले त्या स्थितीचे मला आश्चर्य वाटले. पण नानांना अद्याप बोलायचे होते. ते म्हणाले,

'लक्ष्मणसिंग येथून जयजयकार करीत निघाला, 'जो बोले सो भये, सो निहाल सत् श्रीअकाल!

'खणखणीत स्वरांत त्याच्या गर्जना चालू होत्या. फाशीचा मंच मागेच असल्याने (स्थूलपणे सव्वाशे ते दीडशे फुटांवर) आणि सर्वदूर शांतता असल्याने त्याचे ते जयजयकार स्पष्ट ऐकू येत होते. वधकाने फळ्यांमधील दांडा ओढल्याचा आवाज ऐकू आला आणि जयजयकार थांबला! स्वर कापरा झाल्याचा किंचितही संकेत शेवटपर्यंत नव्हता!'

रोमहर्षकता वाढावी असे ते वर्णन नाना सांगत होते. ज्याची मानसगात्रे बधिर असतील त्यालाच त्या प्रसंगातील रोमहर्षकता जाणवणार नाही.

नाना म्हणाले, 'लक्ष्मणसिंग जगाच्या दृष्टीने आणि आम्हा तथाकथित उच्च वर्णियांच्या म्हणजे, राजकीय कारणांसाठी दंडित असलेल्या बंद्यांच्या दृष्टीने, एक सामान्य अपराधी-ऑर्डिनरी क्रिमिनल! तेव्हा अशा सामान्याला प्राणाचे भय असायला हवे असे समीकरण उगीचच आम्ही आमच्या अहंकारी मनात वागवीत होतो! लक्ष्मणसिंगचे ते धीरोदात्त वर्तन मी पाहिले. शेवटपर्यंतचे ते जयघोष ऐकले. माझी ती घमेंड उतरली!'

थोडे थांबून नाना पुढे म्हणाले, 'आम्ही शेवटपर्यंत आमच्या मातृभूमीचा, अखंड भारताचा, वंदेमातरम्‌चा जयघोष करीत जाऊ यात नवल ते काय आहे! आम्ही राजबंद्यांनी काय मोठी प्रतिष्ठा मिरवावी की, आम्हीच तेवढे जीवन यःकश्चित समजतो!'

आव्हानित पुस्तकाचे लेखक त्या घटनेपासून सत्तावीस वर्षे दूर आहेत, तर नथूराम आणि नाना यांच्या मनःस्थितीपासून ते राहतात तितकेच म्हणजे सहस्रावधी मैल दूर आहेत!

नथूराम आणि नाना यांनी अखंड भारताचा, वंदेमातरम्‌चा, स्वातंत्र्यलक्ष्मीचा, उच्चरवाने उद्घोष केला. त्या विनाशक सेतूवर उभे राहून प्रार्थना ही म्हटली....

पाठीमागे बेडीने जखडलेल्या हातात त्यांनी श्रीमत् भगवत्-गीता, अखंड भारताचे मानचित्र आणि भगवा ध्वज या वस्तू धरल्या होत्या.

उद्घोषांचे निनाद संपताच खटका सरकवला गेला. फळ्या पडल्या. त्या दोघांचा पृथ्वीवरील प्रवास संपून अज्ञानातील प्रवास चालू झाला.

त्यांच्या हातांतील वस्तू गळून पडल्या त्या त्यांचे शरीर अचेतनावस्थेत गेल्यावर!

अधिकाऱ्यांनी त्या वस्तू आमच्या स्वाधीन केल्या.

[ क्रमशः ]

---

## आपली लोकशाही — आगामी दहा वर्षे : पृष्ठ १६ वरून

डोलारा फार काळपर्यंत चालणार नाही. म्हणूनच सत्ताधाऱ्यांना आपली आजची राजकीय शैली (political style) बदलावीच लागेल. मार्गदर्शित लोकशाहीचा प्रयोग इथे राबविण्याचा प्रयत्न केला जाईल असे अनेकांचे म्हणणे आहे. तो तसा जरी झाला, तरी त्यास यश येणार नाही. हा प्रयोग फार काळ चालणार नाही. कारण ते सर्व इथल्या जनतेच्या स्वभावाविरुद्ध आहे. आज लोकांमध्ये आश्चर्य, भीती व स्तब्धता दिसत असली तरी, लवकरच आपली गेलेली स्वातंत्र्ये व लोकशाही अधिकार ते परत मिळवतीलच मिळवतील-असा माझा विश्वास आहे.

**प्रश्न :** नजीकच्या काळात निवडणुका होतील का?

**उत्तर :** फेब्रुवारी ७७ मध्ये निवडणुका घेतल्या जाण्याचा संभव आहे. तथापी सत्ताधाऱ्यांना सोयीचे वाटले तर, त्या आधीही त्या होण्याची शक्यता आहे. मागे म्हटल्याप्रमाणे येते वर्ष हे निर्णायक ठरणार आहे. या वर्षात जर निवडणुका झाल्या तर, जनता सहभागाचा अनुभव घेऊ शकेल. आपलाही सहभाग या देशाच्या राजकारणात आहे, असे जनतेला वाटेल. तोपर्यंतच्या काळात नोकरशाही अधिक डोईजड होणार नाही व भ्रष्टाचार वाढणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

**प्रश्न :** २६ जूनपूर्वीची परिस्थिती पुन्हा येईल असे आपणास वाटते काय?

**उत्तर :** नाही. ती आपोआप येणार नाहीच. स्वबलावर जनतेला ती परत आणावी लागेल. आपल्या हातातील सत्ता अबाधित ठेवणे हाच सर्व कृतींचा उद्देश असल्याने, त्यासाठी जे जे आवश्यक वाटेल ते ते केले जाईल. म्हणूनच २६ जून पूर्वस्थिती आता परत येणे शक्य नाही. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचे विसर्जन करून लोक सेवक संघ स्थापन करण्याचा सल्ला गांधीजींनी दिला होता. पण तो मानला गेला नाही. परिणामी काँग्रेस हा एक होल्डॉल पक्ष झाला. अनेक प्रकारच्या परस्परविरोधी विचार व तत्त्वांचे मिश्रण असलेला हा पक्ष आहे. खरे तर पक्ष या संज्ञेसच काँग्रेस पात्र नाही. हर प्रकारे आपली सत्ता कायम ठेवण्यासाठी पक्षाचा हा देखावा केला जात आहे. विरोधी पक्षांचे सर्व स्वातंत्र्य तर काढून घेतलेच आहे, स्वतःच्या पक्षातीलही व्यक्तिगत मतभेद-स्वातंत्र्य आज काढून घेतले आहे. सत्तारूढ पक्षही स्वतंत्र राहणार नाही याची व्यवस्था करण्यात आली आहे. पण हे फार दिवस चालणार नाही. लोक आपली स्वातंत्र्ये व लोकशाही अधिकार परत मिळवतीलच मिळवतील. कारण स्वतःच्या भाग्यनिर्माणासाठी अन्य काही मार्गच त्यांच्यासमोर नाही.

येत्या दशकांत केवळ अस्तित्वाचे राजकारण (Politics of Survival) करून चालणार नाही. काही अधिक निर्भय पावले उचलून आपले राजकारण अधिक मूलगामी, परिवर्तनमूलक करावे लागेल. ☐ ☐

# जुलूस

## रंगलेली चर्चा

साहित्य, कला आणि वाङमय हे तीन शब्द त्यांवर अनेक वादप्रचूर लोकांनी टीका केल्यामुळे आणि अनेक टीकाकारांनी वाद घातल्यामुळे भलतेच गुळगुळीत झाले आहेत. ललित साहित्य आणि दलित साहित्य, जीवनवाद आणि कलावाद, जुने आणि नवे वाङमय वगैरे वगैरे विषय चघळून चघळून बेचव झाले आहेत. ह्याच विषयांभोवती घुटमळण्याऐवजी, चर्चेसाठी एखाद्या नवीन विषयाची प्रेक्षकवर्ग आतुरतेने वाट बघत आहे. अशा परिस्थितीत ' रूपवेध 'तर्फे जेव्हा ' जुलूस ' ह्या नाटचप्रयोगावर चर्चा आयोजित करण्यात आली तेव्हा रसिक प्रेक्षकांना थोडे हायसे वाटले असेल. चर्चा छबिलदास हायस्कूलच्या सभागृहात आयोजित केली होती. प्रा. पुष्पाबाई भावे ह्यांनी चर्चेला सुरुवात करताना एक गोष्ट स्पष्ट केली. बादल सरकारांनी लिहिलेली ' जुलूस 'ची संहिता बहुतेक प्रेक्षकांनी वाचली नसल्याचीच शक्यता असल्याने फक्त नाटचप्रयोगावर चर्चा व्हावी. ' जुलूस 'चा नटसंच, श्री. अमोल पालेकर, सौ. अनुया पालेकर वगैरे मंडळीही चर्चेला उपस्थित होती.

पुष्पाबाई म्हणाल्या, ' जुलूस 'चा प्रयोग पाहिल्यावर त्यात नवीन व आगळी आढळणारी गोष्ट म्हणजे प्रेक्षक सहभाग (Audience Participation). मराठी नाटचप्रयोगात प्रेक्षक सहभाग ही एक धाडसी कल्पना ! मराठी माणसाच्या स्वभावातच जो संकोच भिनलेला आहे तो बाजूला सारून, त्याने प्रयोगात सक्रिय भाग घेणे ही अशक्य गोष्ट आहे असे आजपर्यंत नाटक मंडळींना वाटत होते. परंतु जुलूसच्या आतापर्यंत झालेल्या प्रयोगात बहुतांशी यशस्वी झाली आहे.' अमोल पालेकर म्हणाले, ' प्रेक्षक सहभागाची ' कलकत्तेकर मंडळींना सवय आहे. बादलबाबू जेव्हा रस्त्यावरून अशा नाटकांचे प्रयोग करतात तेव्हा तेथील प्रेक्षक नाटचप्रयोगात उत्साहाने सामील होतात. ' प्रेक्षक सहभागामुळे नाटक हे केवळ नाटक ' ह्या पातळीवर न राहाता जास्त वास्तववादी वाटते.' श्रोत्यांमधून एक प्रश्न विचारण्यात आला की, ' प्रेक्षक सहभागाची नाटकाला गरज आहे काय ?' त्यावर पालेकर म्हणाले, प्रेक्षक सहभागाची नाटकाला गरज आहेच असे म्हणता येणार नाही. परंतु ' जुलूस ' सारख्या नाटकात प्रेक्षक सहभागाने कथाआशयाला बळकटी येते. एखाद्या गुंडगिरीच्या नाटकात ' प्रेक्षक सहभागाची ' आवश्यकताही नाही.

जुलूस ह्या नाटकाला राजकीय पार्श्वभूमी आहे काय ? असा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला. तसेच ' जुलूस ' हे विशिष्ट राजकीय परिस्थितीवर आधारलेले नाटक आहे काय ? किंवा एखाद्या राजकीय तत्त्वप्रणालीशी मिळतेजुळते सूर जुलूसच्या कथानकात सापडतात काय ? असेही प्रश्न विचारण्यात आले. अमोल पालेकरांनी स्पष्ट केले की, हा आरोप सर्वस्वी चुकीचा आहे. ते म्हणाले, बादल सरकारांनी १–१॥ वर्षापूर्वी ह्या नाटकाचे प्रयोग केले तेव्हा ते जितके रंगले, तितकेच आता रंगत आहेत आणि पुढेही रंगतील. ह्या नाटकाला राजकीय पार्श्वभूमी अजिबात नाही. जुलूस हा व्यक्ती आणि समाज ह्यांतील संघर्ष आहे. त्याला वेश, राजकारण, सोशॅलिझम, कम्युनिझम वगरे गोष्टींचा वासही लागू शकत नाही. एखाद्या टीकाकाराला हे नाटक साम्यवादाकडे झुकणारे वाटत असल्यास तो प्रत्येकाचा दृष्टिकोन आहे किंवा एखाद्या गोष्टीचा मूलभूत विचार न करता ती गोष्ट राजकीय दृष्टीकोनातून पाहाण्याची सवय पुष्कळशा टीकाकारांना असते. त्यातून हा वाद निर्माण झाला असण्याची शक्यता आहे. वस्तुतः जुलूसचा राजकारणाशी संबंध नाही.

नवीन मुद्दा मांडताना पुष्पाबाईंनी सांगितले की, प्रयोग पाहिल्यावर लेखकाला एक जबरदस्त अनुभव व्यक्त करावयाचा आहे हे पटते, परंतु नाटकातील तरुण मुन्ना किंवा वृद्ध मुन्ना पाहिजे, तितके प्रेक्षकांना येऊन भिडत नाहीत. दोघांमध्ये एक विशिष्ट अंतर राहते. तसेच एक प्रश्न विचारण्यात आला की, ' घनःश्याम सुंदरा 'च्या जुलूमाने नाटकाचा शेवट केला आहे, तो त्या भूपाळीत, जो एक भाबडा आशावाद साठलेला आहे किंवा मराठी माणसांच्या मनात ह्या भूपाळीबद्दल ज्या प्रसन्न भावना (Associations) आहेत, त्याचा ( गैर ) फायदा घेऊन केला आहे काय ? पालेकर म्हणाले, घनःश्याम सुंदरा ह्या भूपाळीतल्या आशावादाचा आम्ही जरूर उपयोग केला आहे, परंतु भूपाळीचा जुलूस येत असताना मुन्ना म्हणतो, हा जुलूस कदाचित आपल्याला मार्ग दाखवील. ह्या वाक्यातला ' कदाचित ' हा शब्द महत्त्वाचा आहे आणि तो ठळकपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा आम्ही प्रयत्न करतो. जुलूस ह्या नाटकाची मध्यवर्ती कल्पना आणि त्यातील पुनरावृत्तींचा विचार करता ह्या नाटकाचा शेवट निश्चित स्वरूपात करता येणे अशक्य आहे. कदाचित ' घनःश्याम 'चा जुलूस मुन्नाला मार्ग दाखवणारही नाही आणि मुन्ना परत त्याच


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण धाईगर्दीत उरकलेला आलेख.

आनंदाच्या दाही दिशा

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : दहा रुपये

रस्त्यांवरून, त्याच वळणांवरून भटकत राहील.

ह्याच संदर्भात एक प्रश्न विचारण्यात आला, जुलूस हा नाट्यप्रयोग दीड ते पावणे-दोन तासांचा आहे. प्रयोगात काही जुलूस पुन्हा पुन्हा दाखवण्यात आले आहेत. ह्या पुनरावृत्ती, नाट्यस्पर्धेतील किमान वेळेपर्यंत नाटकाची लांबी वाढवण्याच्या दृष्टीने दाखवण्यात आल्या आहेत काय? पालेकर म्हणाले, नाट्यस्पर्धेच्या किमान वेळेसाठी नाटकाची लांबी वाढवली आहे, असा समज झाला असेल, तर तो केवळ चुकीचाच नसून, आमच्यावर अन्यायकारक आहे. नाट्यप्रयोगाच्या वेळेला किमान बंधन नसावे, म्हणून मी दोन–तीन वर्षे झगडतो आहे आणि दरवर्षी दीड–दीड तासांची नाटके सादर करतो. जुलूसमधील पुनरावृत्ती अटळ आहेत, किंबहुना पुनरावृत्तींमुळे कथाआशय अधिक स्पष्ट होतो. जुलूसमध्ये ज्या पुनरावृत्ती दाखवल्या आहेत–उदा. गणपतीच्या जुलूसानंतर, मशिदीतील नमाज आणि चर्चमधील प्रार्थना–हे तीनही जुलूस त्याचक्रमाने परत दाखवण्यात आले आहेत किंवा मुन्नाचा सतत होणारा खून, प्रेतयात्रा वगैरे जुलूस माणसाच्या जीवनात घडणाऱ्या पुनरावृत्तींचे प्रतीक आहेत. पुनरावृत्ती दाखवल्या नसत्या तर नाटकाच्या आशयात उणेपणा राहिला असता.

जुलूसमधील काम करणाऱ्या नटांनी, नाटकाच्या तालमी करतानाचे अनुभव सांगितले. श्री. कमलाकर नाडकर्णी म्हणाले, नाटकाचे आतापर्यंत वीस–बावीस प्रयोग झाले, परंतु नाटकात काम करताना यांत्रिकपणा जाणवत नाही. नाटकात आम्ही समरस झालेलो असतो. इतरही नटांनी नाटकात येणारे अनुभव सांगितले. पुष्पाबाई चर्चेचा समारोप करताना म्हणाल्या, नाट्यचर्चेमुळे, नाटकात प्रत्यक्ष काम करणाऱ्या नटांनी सांगितलेल्या अनुभवांमुळे नाटकाविषयीचे समज–गैरसमज दूर होतात. नाटकातील विशिष्ट जागा, खुबी, अधिक स्पष्ट होतात. जुलूस हा जबरदस्त अनुभव असून, त्याचा प्रयोगही देखणा होतो.

—दीपक भास्कर कुलकर्णी

फ्रॉम रशिया विथ लव्ह

# ए टू सोल्जर

## ह्या १९४१ च्या दिवाळी मोसमात तो कुठं आहे ?

एका दिवसातच शहराचा नूर एकदम पालटला. कालपर्यंत शांत असणारं मॉस्को शहर एकदमच बदललं. जर्मन सैनिकांनी मुसंडी मारली. 'आणि आता पुढचा पल्ला मॉस्कोचा' म्हणत हिटलरचे नाझी सैनिक मॉस्कोकडे कूच करून निघाले. जागोजाग खंदक खोदले गेले. शाळा, कॉलेजं, होस्टेलचं इस्पितळात रूपांतर झालं. युद्धसामग्री तयार करणारे कारखाने चोवीस तास चालू लागले. शाळा, कॉलेजांतील मुलं युद्धाचं मिळेल ते काम पत्करू लागली. कुणी व्हॉलिंटीअर्स झाले, कुणी युद्धात भरती व्हावं म्हणून रिक्रूटिंग ऑफिससमोर रांगेत उभे झाले.

युदिन, कोल्या, वॅसिली, मार्याना आणि नाताशा मॉस्कोतील तत्त्वज्ञान विद्यापीठात विद्यार्थी होते.

नाताशा मॉस्कोत नव्हती. खंदक खणायला व्हॉलिंटीअर म्हणून ती दुसरीकडे गेली होती. जाताना ती कोल्याला मुद्दाम भेटून गेली. तिच्या अंगावर व्हॉलिंटीअरचा पांढरा ब्लाऊज आणि आकाशी स्लॅक्स असा ड्रेस होता. कोल्यावर तिचा जीव होता. पृथक् होताना तिनं कोल्याला जवळ ओढलं, गहिंवरली, अन् त्याला बाहूत वेढून, तिनं त्याचं दीर्घ चुंबन घेतलं.

युदिनला रिक्रूटिंग ऑफिसमध्ये नकार देण्यात आला. त्याच्या डाव्या डोळ्यात तिळाएवढा मोतीबिंदू होता. कोल्या आणि वॅसिलीला 'वेळ येताच बोलावू' असं सांगण्यात आलं.

एक दिवस युदिन आनंदाच्या भरात ओरडत आला, आणि म्हणाला, 'माझं नाव एअर युनिटमध्ये टाकण्यात आलंय्.' सगळ्यांना आश्चर्य वाटलं. त्यानं डोळ्याच्या डॉक्टरी परीक्षेचं कार्ड कुठून तरी मिळवलं. त्यातील अक्षर अन् अक्षर पाठ केलं. सी अक्षराचं ओपनिंग, नंबर सारं मुखपाठ. परीक्षेत पास झाला. त्याला रेडआर्मीचा युनिफॉर्म मिळाला.

त्याचं सिलेक्शन झाल्याचा मार्यानाला खूप आनंद झाला. ती त्याची क्लासमेट आणि होस्टेलमध्ये रूममेट होती. आणि विशेष म्हणजे त्याचं पोस्टींग मॉस्कोत होतं. साऱ्यांनी त्याचं अभिनंदन केलं. त्याला निरोप दिला.

काही दिवसांनंतर कोल्या आणि वॅसिलीलाही बोलावणं आलं. त्यांना इन्फंट्री स्कूलमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून पाठवायचं ठरलं. दोघांना निरोप द्यायला मार्याना स्टेशनवर आली होती. थोड्याच वेळात एक मुलगा अन् मुलगी आली. मुलानं हेडला अर्ध्या तासाची सुटी मागितली. तो म्हणाला, 'आम्ही लग्न रजिस्टर करून येतो. ऑफिस जवळच आहे.' आणि एक दुसऱ्याच्या कमरेत हात घालून ते अदृश्य झाले.

वॅसिली म्हणाला, 'वेडेच आहेत, नाही ?'

'का ?' मार्यानाच्याने राहवलं नाही.

'त्याला काही झालं तर ? समजा, युद्धात कामी आला ? ती बिचारी विधवा होईल ना ?'

'मूर्खासारखा बोलू नकोस.'

'का ? मी म्हणतो त्यात काही गैर आहे ?'

'तुझं हे बोलणं थांबव ! ह्यापेक्षा चांगलं तुला बोलताच येणार नाही का ?'

कोल्यानं त्यांना मधेच थांबवीत म्हटलं, 'त्यांच्यासारखं लग्न करून युद्धाला जाणं मलाही खचितच आवडेल. युद्धात तसंच मरणं वेगळं आणि एक पती म्हणून मरणं वेगळं आहे.'

तेवढ्यात नवविवाहित जोडपं येऊनही ठेपलं. बरं झालं, ते गाडी सुटायच्या आधी आलेत. गाडी सुटली तशी त्या परिणितेच्या

डोळ्यांत पाणी जमून आलं. हात उंचवीत मार्याना म्हणाली, ' —पत्र पाठवा, हं ! '

वॅसिलीला मार्यानाशी आपण उगाच मरणाच्या गोष्टी केल्या म्हणून वाईट वाटलं. गाडी सुटली तरी मरणाचा विचार काही त्याच्या डोक्यातून निघेना. तो म्हणाला, ' कोल्या, आणखी काही दिवसांनी आपली आठवण आणि हे युद्ध, मानवजातीला पडलेल्या स्वप्नासारखं इथल्या लोकांना वाटेल. '

' काहीतरी मूर्खासारखं बोलू नकोस. तसं खचितच होणार नाही. अरे, आमचं मोराल किती मोठं आहे. नाझींना आपण पिटाळून लावू. '

कोल्यानं त्याच्या खांद्यावर हलकेच थाप दिली. गाडीत एक संग्रामगीत साऱ्या मुलांनी सुरू केलं. कोल्या आणि वॅसिलींनी त्यांना खुल्या गळ्यानं साथ दिली. ◻

एक दिवस, रविवार पाहून, नाताशा त्यांना भेटायला आली. नाताशानं कोल्याचा शोध तो कुठेही असता तरी लावला असता. ती आली म्हणून त्यांनी हेडक्वार्टर सोडायची परवानगी मागितली. त्यांची प्रार्थना अर्थातच मान्य केली गेली नाही. कर्नलने उलटपक्षी त्यांना दाटलं. त्यांचा वेष जरा गबाळ्यासारखा होता. वॅसिलीनं कोल्याकडे पाहिलं. त्याच्या शर्टचं खिशाचं बटन नव्हतं, आणि खिशात काहीतरी गच्च भरलं होतं. कर्नलनं त्याच्या खिशातून कागदाचं पुडकं काढलं. पुडकं कसलं ? ते नोटबुकच होतं. कर्नलनं पानं चाळली. एका पानावर नजर स्थिर केली. तिथं चक्क कविता होती.

The guilly sky
was lashed by forks of lightening...

कर्नलनं त्यांना दाटलं तरी, कोल्याच्या कवितेला दाद दिली. पुढच्या पानावर ओळी होत्या— ' A soviet man has no right to be an ignoramus, a fool, in general a lovly person: because forever before him stand Lenin and Revolution.'

' कुणाचं वाक्य, रे, हे ?' आनंदातिशयानं कर्नलनं विचारलं.

कोल्या चूप राहिला. " असं...असं... तुमचं होय ! ' कर्नलच म्हणाला.

आतापर्यंत ते नाताशा आली आहे हे पार विसरले होते. कर्नलनं त्यांना परवानगी दिली, अन् ते तडक गेटकडे धावले. कोल्या आणि नाताशा पुतळ्यासारखे एक दुसऱ्याकडे पाहात राहिले. अन् दुसऱ्याच क्षणी ते एकदुसऱ्याच्या मिठीत होते. वॅसिली त्यांना मागे टाकून पुढे जायला लागला. टू इज कंपनी थ्री इज क्राऊड.. हे त्याला 'चांगलं माहीत होतं: नाताशाच्या हाकेनं वॅसिली परत आला. तिनं दोघांनाही डोळे भरून पाहिलं, जशी त्यांना पहिल्यांदाच पाहात होती. मग तिच्या डोळ्यात पाणी दाटून आलं. ती म्हणाली, ' युदीन गेला, एका एअर इंडियामध्ये कामी आला.' तिच्या डोळे भरून पाहण्याचा अर्थ त्यांना मग एकदमच उलगडला. दोघांच्या तोंडामधून एकदम प्रश्न आला, ' मार्याना कुठाय ?'

' तिनं त्याच्याच युनिटमध्ये नाव एन्रोल केलंय्.' ती परत गेली अन् युदिनच्या आठवणीनं त्या रात्री ते अस्वस्थ झाले. नाही... नाही... असं कसं झालं ?

आकाशात प्रकाशाचा झोत उसळला. ॲक्‌ॲक् गनच्या आवाजात ते युनिदचा मृत्यू विसरले. कोल्याजवळ रिकाम्या मॅगझिनच्या दोन पेटचा होत्या आणि वॅसिलीजवळ लाईट मशीनगन. त्यांनी एकदमच खंदकात उडी घेतली.

रात्र...दिवस...पुन: रात्र... कानठळ्या बसवणारे आवाज. तोफांचे, मशीनगनचे... आकाशातून सोडलेल्या बॉम्बचे... कुणाची किंकाळी...कुणाचा लटका तुटका पाय... कुणाचे जळून खाक झालेले शरीर...शत्रूची सरशी होत होती. तो पुढे पुढे येत होता. कोल्या आणि वॅसिली अजूनही फ्रन्टवर नव्हते. त्यांची पाळी नेहमी सेकंड लाईन ऑफ डिफेन्सची असायची. सतत प्रवास... गाडीचा...जीपचा... . पायी... सोबत मशीनगनचं अन् मॅगझिन बॉक्सेसचं ओझं. थकवा इतका यायचा, वाटायचं कुठंतरी निवांत पडावं. पण डोळ्यात झोप ठेवून चालणार नव्हतं. त्यांचा प्लॅटून फक्त ' ऑनवर्ड मार्च ' करीत होता.

लेफ्ट...लेफ्ट...फॉरवर्ड मार्च... मग बायोनेट लावायचा हुकूम मिळाला. पोटात कावळे ओरडायला लागले...डोळ्यापुढं नग्न बायोनेटस् खांद्यावर उठलेल्या. चालताचालताच एका रोमधला एकजण कोलमडून पडला. पुढच्यानं मागे काय झालंय् म्हणून वळून पाहिलं. बायोनेटचं तीक्ष्ण पातं त्याच्या डोळ्यात खुपलं. त्याही अवस्थेत तो चालत राहिला. कोल्या आणि वॅसिली ते पाहून हळहळले. बर्फाची लादीच्या लादी पायाखाली पसरली होती. रात्रीची पायपीट अन् दिवसाचं खंदकात आत्मरक्षण करीत राहायचं. शत्रू आता फक्त पन्नास मैलांवर होता.

प्रकाशाच्या पडद्यातून एक आकृती दिसली. पुढे पुढे येणारी...एक आरोळी...हूजदेऽर... प्रतिउत्तर... फ्रेन्ड... सगळ्यांनी त्याला वेढलं. त्याचा ड्रेस मळका, फाटका होता. चेहऱ्यावर काळपट डाग होते. तो बोलतच गेला. अविरत न थांबता...अख्खी बटॅलियन मारली गेली. मी एकटाच तेवढा उरलो .. त्याच्या चेहऱ्यावर, डोळ्यात, बोलण्यात चक्क भीती दिसत होती. कुणीतरी म्हणालं, —' ए क्लीअर केस ऑफ पॅनिक.'

तेवढ्यात प्लॅटूनचा लेफ्टनंट पुढं आला. त्याच्या भुवया चढल्या होत्या. त्यानं त्याला विचारलं—' तुझी बंदूक कुठं आहे ?'

बंदूक सोडून तो ॲटरॅंडम बोलत होता. ' मी एकटाच उरलोय्. एकटाच. काहीतरी भयंकर पाहिल्यावर माणूस जसा असंबद्ध बोलतो तसा तो बोलत होता. लेफ्टनंटनं एका कॅडेटला हुकूम दिला.—' ह्याला हेडक्वार्टरला न्या. कॉवर्ड आहे हा ! चीफ ऑफ स्टाफ त्याची काळजी घेईल.'

तो निघून जाताच न जाणो का तर कोल्या वॅसिलीजवळ म्हणाला, ' काळजी करू नकोस. मी पळून येणार नाही.'

वॅसिली विचार करायला लागला— ही जमीन आमची. हे आकाश आमचं. आमचीच माणसं अशी नेभळटासाठी पळत सुटली तर कसं व्हायचं ? जमिनीवर पाय घट्ट असतील तर शत्रू येऊ शकणार नाही. अन् आकाश ? त्यावर तर त्यानं केव्हाही यावं, बॉम्ब टाकावा. वस्त्या, पूल, माणसं नेस्तनाबूत करावीत अन् जावं असं चाललंय्.

वॅसिली आणि कोल्या कितीदातरी मृत्यूला हुलकावणी देत तावून सुलाखून निघाले होते. ◻

आता ते फक्त सातजण उरले होते. शत्रूचा सगळ्या परिसरात अधिकार झाला होता. रोड तेवढा त्यांच्याकडे होता. ॲम्युनेशन सप्लाय त्यामुळं व्यवस्थित व्हायचा. दारूगोळा हाताशी असल्यामुळं, नाझी सैनिकांना

थोड्या अंशानं का होईना, दूर ठेवता आलं होतं. तशात पुन: ट्रक आला. सामान उतरवलं गेलं. एकजण कमिसारजवळ गेला. म्हणाला, 'शत्रू समुद्राच्या लाटेसारखा येतो आहे. आपण परतावं ( Retreat ) हेच बरं !' लेफ्टनंट हाच आता त्यांचा कमिसार होता.

कमिसारनं एक तुच्छ कटाक्ष त्याच्याकडे टाकला. सारे मग त्याच्याकडे पाहायला लागले. तो ओरडलाच, 'माझ्याकडे असे सारे रोखून काय बघताहात ? तुम्हाला काही अधिकार नाही. तुम्हाला मरायचं असेल तर पुढे जा. मला मरायचे नाही...नाही...'

थांबलेल्या ट्रककडे तो सारखा पाहात होता. मग त्यानं जोरात उडी मारली अन् ट्रक धरायला धावू लागला. ट्रक हालला.

'स्टॉप...यू सन ऑफ ए बिच' म्हणत कमिसारनं तोंडातली लाळ थुंकून टाकली. क्षणानंतर त्यानं पिस्तोल काढलं अन् आवाज दिला—स्टॉप...कॅडेटनं वळून पाहिलं. कसाबसा तो ट्रकच्या दारापर्यंत पोचला होता. रिव्हॉल्वरचा चाप ओढला गेला. कॅडेट धाडकन् खाली सडकेवरच कोसळला. बराच वेळ कमिसारच्या बोटात रिव्हॉल्वर लटकत राहिलं. त्याचे हात खरंच थरथरत होते. ¤

लांबून शिवळा क्रॉस असलेले टँक्स येताना दिसले. तिकडे कमिसारचं लक्ष जाताच, तो म्हणाला, 'ही आपली माणसं आहेत. त्यांनी टँक्स कॅप्चर केलीत' पण त्यांना धोका झाला. त्या टँक्समध्ये नाझीच होते. टँकच्या नळीतून तोफगोळा त्यांच्या दिशेने फेकला गेला. सरपटत सहाहीजण खंदकात जावून पोचले. कुणीच जखमी झालं नव्हतं. ज्या खंदकात त्यांनी आश्रय घेतला ते भक्कम होते. तिथून जवळच टनेलसारखी एक पोकळी होती. त्यात भरपूर ऐसपैस जागा होती. वरचा भाग बांधलेला होता. तेवढ्यात आवाज झाला... धडाड् धुम्...एक गोळा नेमका छतावर पडला होता. छत कोलमडून पडले. सुदैवानं छत असे पडले की, उभ्या भिंतीशी एका अँगलने छताने थोडी जागा सोडली. श्वास गच्च दाबून त्यांनी एक दुसऱ्याकडे पाहिले. बाहेरून त्यांना कुणी बघू शकणार नव्हते. शत्रूंना वाटलं की छताखाली दबून सारी माणसं मेलीत. गाडली गेलीत. कमिसार दबल्या आवाजात म्हणाला, 'त्यांना आपण गेलो आहोत असं वाटू द्या. रात्री आपण इथून बाहेर पडू. कुणाला पत्ता लागणार नाही. वॅसिली इतका दमला होता की, तो घोरायला लागला. कमिसारनं त्याला हातानं हलवीत उठवलं. डोळे रोखून पाहात दाटलं. रात्रीचा एका पोकळीतून प्रकाशाचा झोत टाकला गेला. कुणीतरी ओरडलं...रश्... मशीनगनचं टोक छिद्राशी भिडवून फैरी झाडल्या गेल्या. त्या त्रिकोणी पोकळीत बारूदाचा वास भरून राहिला. साऱ्यांनी डोळे आणि नाक आत झाकून घेतले होते.

पुन: सारे शांत झाले. जसे तिथे कधी काही झालेच नव्हते.

रात्र झाली. कमिसारनं प्रत्येकाला नंबर दिला. गनर नंबर एक होता. कोल्या दोन, वॅसिली तीन, दोन आर्टिलरीचे कॅडेट्स् अन् नंबर सहा स्वत: कमिसार. प्रत्येकाला बाहेर सरपटत निघायचं होतं. निघायचं छिद्र इतकं छोटं होतं की, साधारण सैनिकाला हॅवरसॅक, मॅगेझिन बॅग घेवून निघता येणे शक्य नव्हतं. मग प्रत्येकानं पाठीवर बांधलेली हॅवरसॅक काढली. नंबर एकला आज्ञा झाली. त्या छोट्या छिद्रातून पुढे टनेल होता. तो सरपटत गेला. थोड्या वेळानं कोल्यापण गेला. वॅसिली तोंडाशी आला, तसा फायरिंगचा आवाज आला. तो मागे झाला. पुन: सामसूम. मग सरपटत निघाला. त्याला अंधारात कुणीच दिसेना. बर्फावर कितीतरी यार्डाचं अंतर वॅसिलीनं सरपटत पार केलं. टेलिफोनच्या तुटलेल्या तारांच्या दिशेने तो सरपटत राहिला. कधी पोटाच्या भारावर, कधी टोंघळ्यावर, लांबवर अधूनमधून फैरी झडतच होत्या. कशीबशी त्यानं बंदूक सांभाळली होती. क्षितिजावर पहाट येवून थडकली होती अन् वॅसिली भयभीत रात्र आणखी मोठी व्हावी, अशी खोटी आशा मनात लावून होता. प्रकाशाच्या पकडीत यायच्या आधी त्याला सुरक्षित जागी पोचायचं होतं. तो एकटाच होता. कुठं गेलेत नंबर एक, नंबर दोन... बाकीच्यांचं काय झालं ? हा सगळा विचार करायला सवड नव्हती. गावातील शेवटचं घर मागे टाकून तो पुढे जंगलात निघून गेला. आता तो पायावर उभा झाला आणि धावत सुटला. पाण्याच्या ओढ्याशी आला. तिथं कुणीतरी पडलं होतं. त्यानं त्याच्यावर बंदूक रोखली...तो म्हणाला, 'फ्रेन्ड...' तो जखमी होता. त्यानं त्याला खांद्यावर घेतलं आणि चालायला लागला.

बर्फ सारखा पडत होता अन् त्याचं मन 'कोल्या कुठे आहे ?' विचारीत होतं. शाळेत, खेळात, युद्धात ते सोबत होते. अन् आता ? ह्या १९४१ च्या हिवाळी मोसमात तो कुठं आहे ? कुठे बर्फ त्याच्या गार शरीरावर तर पडत नाही ना ?

...वॉर्सा ते मॉस्कोला धडकी मारणाऱ्या नाझी फौजा, मॉस्को ते वॉर्सामार्गाने परतल्या- देखील. ह्याच मार्गावर त्या खेड्यात परतताना नाझींनी कत्तली केल्या. मुलांना गोळ्या घातल्या. तिथल्या जुन्या किल्ल्यात जखमी स्थितीत त्यांच्या हाती कोल्या लागला. सगळे नाझी सैनिक तिथल्या क्लबवर जमा झाले. उंचावर लेनिनचा पुतळा होता. तो बंबार्ड करून उडवला गेला. त्यावर एकाला क्रूर थट्टा सुचली. अख्खा रशिया लेनिनला सुप्रीम कमिसार मानायचा. त्यांनी जखमी कोल्याला जिथं पुतळा होता, तिथं उभं केलं. आधीच त्याच्या छातीत गोळया होत्या. थट्टेने जर्मन अधिकारी त्याच्याकडे पाहात म्हणाले— कमिसार.

कमिसार शब्द ऐकताच जखमी स्थितीतही सॅल्यूट द्यायला त्याचा हात उठला, आणि मशीनगनच्या गोळ्यांनी त्याच्या शरीराची चाळणी केली. त्याच्या डोळ्यापुढे आकाश गरगरलं. नाताशा त्याच्या डोळ्यापुढे आली का ? युदिन आला का ? मार्याना आली का ? वॅसिली आला का ? त्याच्या डोळ्यांपुढे अख्खा रशिया आला असावा.

...जे लोक नशीबवान होते अन् कोल्याची गोष्ट सांगायला उरले ते म्हणतात...कोल्या उभा होता सॅल्यूट देत... पडला तेव्हा त्याचा एक हात त्याच्या डोक्याला स्पर्श करून होता. ए ट्रु सोल्जर !

तो कोण होता ? कुठून आला होता ? कुणालाच त्याचं नाव माहिती नव्हतं. जिथं त्याला गोळ्या घातल्या तिथं एक स्मारक उभारलं गेलंय्. एका अनामिक सैनिकाचं !

वर्षे लोटलीत, नाताशा अंधारात हुंदके देते आहे. म्हातारी व्हायला आलीय्. केसं पिकू लागलेत. पण कोल्याला तिचे हुंदके कसे ऐकू जाणार ?

कोल्याची गोष्ट सांगायला वॅसिली-वॅसिली रोस्लॅकॉव्ह मागे राहिला. आता तो जाणकार समीक्षक आहे. गोष्टीही लिहितो. ही गोष्टही त्याचीच आहे.

**—झिरो झिरो सेव्हन**

# या अंधत्वाची कारणे तरी काय ? : पृष्ठ ६ वरून

तील असतो. परदेशी संस्थांचा प्रतिनिधी असतो. संस्थेकरता आणखी देणग्या मिळतात. हे सर्व ठीक आहे, आवश्यक आहे. पण चालकांच्या किंवा भेट देणाऱ्यांच्या मनात असा किंतु येत नाही की, यांतील किती टक्के अंधत्व टाळता आले असते ! आपण हे टाळण्याकरता काय करीत आहो ?

सध्या जिकडे तिकडे नेत्रशिबीरे होत आहेत. नेत्र शिबीराला Royal common wealth Society for Blind प्रत्येक ऑपरेशन केलेल्या रोग्यामागे दोन पौंड देते. महाराष्ट्र सरकार ५००० रु. देते. गांवातून, जिल्हा परिषद, सधन व्यापारी वगैरे देणग्या देतात. नेत्र शिबीर करणाऱ्या संस्थांना श्रमाव्यतिरिक्त विशेष खर्च येत नाही. नेत्र शिबीर म्हणजे मोतिबिंदू काढण्याचे शिबीर. यात भाग घेणारे डॉक्टर तहांन भूक विसरून जिवापाड मेहनत घेत असतात. तपासणी करता आलेल्या शंभर लोकांत १५% कांचबिंदुमुळे, १०% वैदूमुळे, २–३% जखमांमुळे आंधळे झालेले असतात. यांच्या आंधळेपणावर काहीही उपाय नसतो. हे आंधळेपण येऊ नये म्हणून विशिष्ट काळजी घ्यायची असते. मोतिबिंदू काढणे हे जसे आपले आद्यकर्तव्य आहे त्याप्रमाणे या २७% लोकांकरता–की, जे कधीही बरे होणे शक्य नाही–आपण काही केले पाहिजे, हा विचार एका डॉक्टरच्या तरी विवेकबुद्धीला त्रास देतो का ?

अंध विद्यालयात किंवा वर्कशॉपमध्ये अंधत्व आल्यावर शिक्षण किंवा पुनर्वसन करण्याची सोय असते. पण यांतील काही टक्के अंधत्व येऊ नये म्हणून अजूनपर्यंत तरी या संस्थांतून काहीही यंत्रणा अस्तित्वात नाही, याची जाणीव व टोचणी संस्थातील कार्यकर्त्यांना दिसते का ?

त्यामुळे कितीही अंध विद्यालये निघाली, कितीही work–shop सुरू केले, कितीही नेत्र-शिबीरे घेतली तरी, वय ५ ते २० दरम्यानची ४०% मुले व वय ४० ते ६० दरम्यानचे ३०% लोक आंधळे रहाणारच.

या अंधत्वाची कारणे तरी काय ? शेंकडेवारी तरी काय ?

अंधशाळेतील १०० मुले घेतली तर, त्यांतील २० लहानपणी डोळे आले असता ते बरे होण्याकरता आईबापांनी केलेल्या चुकीच्या उपायांमुळे, २० देवीमुळे (आता हे प्रमाण कमी होत आहे.) उरलेल्या ६० जन्मांध, रातांधळेपणा, टच्युमर, मेनिनजायटीस् वगैरे कारणांमुळे अंध झालेली असतात. योग्य यंत्रणा असती तर, वरील ४०% मुले आंधळी झाली नसती.

आपण ज्या अंध मुलांना शिकवण्याकरता इतके श्रम व अमाप पैसा खर्च करतो, त्यांपैकी वरील ४०% आंधळी होऊ नयेत म्हणून प्रयत्न करणे हेसुद्धा आपलेच काम आहे. शाळेचा किंवा work–shop चा अविभाज्य भाग आहे, अशी जाणीव व कृती जेव्हां शाळेच्या चालकांमध्ये निर्माण होईल तेव्हाच हे अंधत्व हलके हलके कमी होईल.

हाच निकष नेत्र-शिबिरांना लावला तर, काचबिंदू वगैरेमुळे आलेले ३० टक्के अंधत्व कमी होण्याच्या मार्गाला लागेल.

हे अंधत्व येऊ नये म्हणून योग्य यंत्रणा काय ?

या अंधत्वाचे कारण काहीही असो– चुकीचे उपाय, देवी, काचबिंदूबद्दल चुकीच्या कल्पना, वैदू वगैरे–सर्वांच्या मुळाशी मुख्य कारण एकच, ते म्हणजे अज्ञान व त्यामुळे होणारी दिरंगाई. उपाय म्हणजे जिथे जिथे आंधळे लोक जमा होत असतील, तिथे तिथे या अज्ञानाविरुद्ध सातत्याने प्रचार करणे. कोणत्या चुकीच्या उपायामुळे आपले मूल आंधळे झाले, हे आई-बापांना कळले म्हणजे, पुढच्या वेळी तोच उपाय ते करणार नाहीत व योग्य उपाय करतील. काचबिंदूबद्दलच्या कोणत्या चुकीच्या समजुतीमुळे आपला बाप, आई किंवा भाऊ आंधळी झाली हे समजले म्हणजे घरातील किंवा आजूबाजूच्या कोणाला काचबिंदूचा त्रास सुरू झाला म्हणजे हेच लोक योग्य मार्गदर्शन करतील.

हे सर्व विचार कार्यवाहीत कसे यावयाचे ?

पहिली जबाबदारी माझ्यासारख्या मुंबई पुण्याबाहेर व्यवसाय करणाऱ्या नेत्र-तज्ज्ञांची. मुंबई पुण्यात एवढे अज्ञान नसते. मोतिबिंदूच्या रोग्याबद्दल मला जे प्रेम व आस्था वाटते, त्यापेक्षा जास्त काचबिंदूमुळे अंध झालेल्या रोग्याबद्दल वाटली पाहिजे. पहिल्या रोग्यापासून मला तीनचारशे रुपये मिळणार असतात. कारण ऑपरेशन करून त्याला नजर येणार असते. दुसऱ्यापासून काहीच मिळणार नसते. कारण ऑपरेशनचा त्याला काहीच उपयोग होणार नसतो. त्याला व त्याच्या नातेवाईकांना काचबिंदूबद्दलच्या चुकीच्या कल्पना व त्यामुळे आलेले अंधत्व, योग्य वेळी इलाज केला असता तर नजर टिकली असती हे समजावून सांगण्यात मी पाच मिनिटे खर्च केली पाहिजे. 'मला वेळ नाही, लोकांना समजत नाही, लोक अडाणी मूर्ख आहेत, हे काम आरोग्यखात्याचे आहे (Preventive Medicine) माझे नाही' वगैरे वगैरे ठराविक कारणे मी सांगता कामा नयेत. प्रत्येक नेत्रतज्ज्ञाने ही त्याची नैतिक जबाबदारी मानली पाहिजे. ज्या समाजावर आपण पैसे कमावतो, त्या समाजाचे हे ऋण मानले पाहिजे, फेडत राहिले पाहिजे.

खाजगी व्यवसायात (Private Practice) असे दोन रोगी रोज येतात. तर नेत्र-शिबिरामध्ये २०० येतात. सध्या नेत्र-शिबिरे ही मोतिबिंदू शिबिरे झालेली आहेत. वर वर्णन केलेली ४० टक्के मुले व ३० टक्के वृद्ध यांना त्यांच्या अंधत्वाची कारणे समजावून सांगण्याइतका वेळ तिथे नसतो, इच्छाही नसते. याकरिता मुंबई येथील Blind Relief Association ने तेरा पोस्टर्सचा एक सेट तयार केला आहे. डोळे आले असता केले जाणारे चुकीचे उपाय व त्यामुळे आलेले अंधत्व, मोतिबिंदू सरकवणारा वैदू व ऑपरेशन करणारा डॉक्टर यांतील फरक, काचबिंदूबद्दल ग्रामीण भागातील चुकीच्या कल्पना व चुकीचे मार्गदर्शन हे सर्व चित्ररूपाने या पोस्टर्सद्वारा दाखविले आहे. 'अंधत्व प्रतिबंध प्रदर्शन' या नावाने हा सेट प्रत्येक नेत्र-शिबिरात दाखविला तर तिथे जमलेल्या जनसागराला आपले काय चुकते हे समजेल, आपल्या मुलाला, वडिलांना, आईला अंधत्व का आले हे समजेल, परत ही चूक होणार नाही. या अंधत्वाचे प्रमाण कमी होण्यास सुरुवात होईल. दहा मोतिबिंदूवर शस्त्रक्रिया करून दहा अंधांना नजर देण्यापेक्षा एक

लहान मूल आंधळे होण्यापासून वाचविणे जास्त महत्त्वाचे आहे, असे जेव्हा डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरला वाटेल तेव्हाच हे पोस्टर्स नेत्र-शिबिराचा अविभाज्य भाग केला जाईल.

डोळ्यांचे सार्वजनिक मोफत दवाखाने, सिव्हिल हॉस्पिटल यांच्या Out-Door मध्ये अंधशाळा, Work-Shop या संस्थांच्या सार्वजनिक हॉलमध्ये या पोस्टर्सचा उपयोग करता येईल.

आज ५०,००,००० अंध आपल्या देशात आहेत. यांतील निम्म्या लोकांचे आंधळेपण टाळता आले असते व त्याला उपाय एकच– लोकशिक्षण. अत्यंत कमी खर्चाचा. मग इतकी वर्षे व अजूनसुद्धा या समस्येकडे लक्ष का दिले जात नाही ?

व्यवहारात असे अनेक का आहेत की, ज्यांना उत्तर नाही. सिगरेटमुळे फुफ्फुसाचा कॅन्सर होतो हे आता सिद्ध झाले आहे, म्हणून कोणी सिगरेट सोडली आहे का ? टायफाइडचे जंतू पिण्याच्या पाण्यातून पोटात जातात. यावर उपाय पाणी नेहमी उकळून पिणे. सर्वसाधारण नागरिक तर राहोच, किती डॉक्टर लोक पिण्याचे पाणी उकळून पितात ? मी डॉक्टर असूनसुद्धा घरच्या लोकांना पटवू शकलो नाही.

जेव्हा एखादी समस्या प्रचंड स्वरूपात उभी राहते, तेव्हा तिच्याकडे लक्ष वेधले जाते. देवीची साथ आली म्हणजे Mass Vaccination होते.

आंधळ्यांची समस्या या स्वरूपात कधीच दिसणार नाही. १००० काचबिंदूने अंध झालेले लोक एके ठिकाणी जमा झाले आहेत असे कधीच घडणार नाही. नेत्र शिबिरांमध्ये आम्हाला काचबिंदूने आंधळे झालेले १०-१० लोक रांकेत बसलेले दिसतात, की ज्यांच्याकरता आम्ही काही करू शकत नाही. तात्पुरते आम्हाला वाटते की, काही तरी केले पाहिजे, पण नंतर आम्ही डॉक्टर लोक मोतिबिंदूची ऑपरेशन्स करण्यात इतके मशगूल होऊन जातो की वरील विचार हवेत विरून जातो. दुसरे म्हणजे नेत्र-शिबिरानंतर १००० शस्त्रक्रिया केल्या हे दृश्यफल समारोपाच्या दिवशी दिसते व समाजाला दाखविले जाते. प्रचंड कार्य केल्याबद्दल आमच्या पाठीवर समाजाकडून जी शाबासकी दिली जाते, ऑपरेशन करून नजर दिल्याबद्दल काही पेशंटकडून माइकवर आमच्यावर जी स्तुतिसुमने उधळली जातात तसे Prevention (प्रतिबंध) च्या बाबतीत काहीच होणे शक्य नसते. कारण प्रतिबंध प्रयत्नांचे दृश्यफल लगेच कधीच दिसणार नाही, पंधरा वर्षांनी दिसणार.

Prevention ( प्रतिबंध ) ही समस्या मोठी असली तरी सामान्य जनतेला ती कधीच जाणवणार नाही. अंध लोकांशी संबंध नेत्र-तज्ज्ञांचा व अंधशाळेचा येतो. त्यांपैकी अंधशाळांचे चालक डॉक्टर नसतात म्हणून ही समस्या हाताळण्याची पहिली व अंतिम जबाबदारी आम्हा नेत्र-तज्ज्ञांचीच आहे. आपल्या खाजगी व्यवसायात येणाऱ्या अशा प्रत्येक रोग्याला आम्ही समजावून सांगितले पाहिजे. नेत्र-शिबिर, डोळ्यांची हॉस्पिटले या ठिकाणी हे समजावून सांगण्याची यंत्रणा निर्माण केली पाहिजे. अंधशाळा व वर्कशॉपमध्येसुद्धा प्रत्येक विद्यार्थ्याच्या नातेवाईकाला व विद्यार्थ्याला आपला पाल्य किंवा आपण का आंधळे झालो हे समजले पाहिजे.

हे काम आरोग्य खात्याचे आहे असे म्हणून नेत्र-तज्ज्ञाला आपली जबाबदारी झटकून टाकता येणार नाही. आरोग्य खात्याला अनेक कामे आहेत. ही जबाबदारी बिन सरकारी यंत्रणेनेच स्वीकारली पाहिजे. याबद्दल धन्यवाद मिळणार नाहीत, वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळणार नाही, पण सातत्याने १५ वर्षे हे काम करीत राहिले तर–

(१) सुरुवातीच्या ५०,००,०० अंधांचे २५००० होतील.

(२) अंधशाळेतील सुरुवातीस वर्णन केलेले ४०% अंधत्व कमी कमी होत जाईल.

(३) नजर असताना काचबिंदूवर ऑपरेशन करून घेण्याकरता लोक येतील, संपूर्ण आंधळे झाल्यावर नाही.

(४) वैदूंची जमात नष्ट होण्याच्या मार्गाला लागेल.

या समस्येची आर्थिक बाजू : एका अंध विद्यार्थ्याला एस. एस. सी. होईपर्यंत अंध शाळेला ८ ते १० हजार रुपये खर्च येतो. पुढे त्याला व्यवसाय मिळवून देण्याकरता एन. ए. बी. ( National Association for Blind ) सारख्या संस्थेला पुष्कळ श्रम करावे लागतात. १०० विद्यार्थ्यांमध्ये ४० विद्यार्थी असे असले तर ४०×१००००= (४,००,००० चार लाख रुपये खर्च येणार.) योग्य प्रचार यंत्रणेमुळे ही संख्या घटली तर हेच चार लाख ज्यांचे अंधत्व टाळता येत नाही, ज्यांच्याकरता अंधशाळांची खरोखर जरूरी आहे अशा जन्मांध, रातांधळेपण, ट्यूमर, डिटॅचमेंट वगैरेकरता खर्च करता येतील. शेतकऱ्याकडे आंधळ्या वृद्धाची किंमत भाकड जनावराइतकीच असते. हे अंधत्व टळले तर या वृद्धांना माणसांसारखे जगता येईल.

सुरुवातीला लिहिल्याप्रमाणे Foresight saves sight ही घोषणा प्रत्येक नेत्र-तज्ज्ञाने आपल्या तपासणीच्या खोलीत स्वतःला सतत दिसेल अशा ठिकाणी लावणे जरूर आहे. आज हे अंधत्व टाळण्याकरता सर्वांत मोठा अडथळा म्हणजे आम्हा नेत्र-तज्ज्ञांचे या बाबतीतील औदासिन्य.

समजा हे औदासिन्य गेले, नेत्र-तज्ज्ञांना वाटले की ऑपरेशन करण्यापूर्वी साबूने पाच मिनिटे हात धुणे जितके आवश्यक आहे तितकेच या अंधांना समजावून सांगण्यात पाच मिनिटे घालविणे आवश्यक आहे. तर वरील पोस्टर्सशिवाय आणखी काय करता येईल ?

वरील वर्णन केलेल्या विषयावर १६ मी. मी. फिल्मस् काढता येतील. नजर असल्यापासून नजर संपूर्ण जाईपर्यंत, कशा चुका होत जातात याची फिल्म तयार केली व नेत्र-शिबिरांच्या वेळी दाखविली, तर फार उपयोग होईल. साध्या एका चित्रापेक्षा अथपासून इतिपर्यंत घडणाऱ्या सर्व घटना दिसल्या तर नक्कीच उपयोग जास्त होईल. अंध-शाळा किंवा अंधांचे पुनर्वसन करणाऱ्या संस्थांचे बजेट एवढे प्रचंड असते की, त्यातील १% जरी या करता खर्च झाला तरी दृश्य उपयोग १५ वर्षांनी दिसू लागेल.

ही समस्या हाताळण्याकरता खर्च अत्यंत कमी आहे. पण नेत्र-तज्ज्ञ, अंध-शाळा चालक, एन्. ए. बी. ( नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईन्ड ) बी. आर. ए. यांची वैचारिक बैठक जमली पाहिजे. आजमुद्धा बी. आर. ए. ( ब्लाईन्ड रिलिफ असोसिएशनने ) पोस्टर्स करता खर्च केलाच नाही का ?

या अंधत्वाच्या गांभीर्याची जाणीव असलेल्या नेत्र-तज्ज्ञांचे मार्गदर्शन, वरील संस्थांकडून आर्थिक मदत, नेत्र-शिबिरे, डोळ्यांची रुग्णालये, अंध-शाळा, वर्कशॉप्स यांचे सहकार्य या सर्वांचा संयोग झाला तर Foresight saves sight ही W. H. O. ची या वर्षीची घोषणा कार्यवाहीमध्ये येईल. याचा दृश्य परिणाम मात्र पंधरा वर्षांनी दिसू लागेल. ◻

पोस्टर्सच्या बाबतीत पत्रव्यवहार करावयाची इच्छा झाली तर, पत्ता :

Blind Relief Association
Botawala Bldg.
481 Kalabadevi Rd.
Bombay 2 B. R.

◻

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २७।३।७६ ते २।४।७६

### भारताच्या राजकारणात अघटीत घडणाऱ्या घटनांची चाहूल

भारत सरकारचा व महाराष्ट्र सरकारचा अर्थसंकल्प बाहेर येऊन आता काही दिवस लोटले आहेत. कर नाहीत, त्यामुळे सामान्य माणूस नव्हे तर, मोठमोठे उद्योगपती व कारखानदार यांचा जीव भांड्यात पडला आहे हे खरे, तरीपण घरी दारी, बाजारात असावा तेवढा उत्साह दिसत नाही, याचे कारण पैसा कमी झाला आहे. समांतर अर्थव्यवस्थेला जो जबरदस्त तडाखा सरकारने दिला त्याचा हा दुष्ट परिणाम होय. याबद्दल सरकारचे अभिनंदन होईल. मकर राशीला चौथा झालेला गुरू बौद्धिक अस्वास्थ्य निर्माण करतो. चालू राजकीय परिस्थितीला काहीसे अनुकूल वळण लागेल. उत्साह निर्माण होईल, अशी पावले पडतील. विरोधी पक्ष व कॉंग्रेस यांच्यात विचारविनिमय सुरू होईल. पुढे घडणाऱ्या घटनांची चाहूल लागेल. पंतप्रधान इंदिरा गांधी पुन्हा एकदा लोकांना आश्चर्याचा धक्का देतील.

**मेष : नोकरीत उत्तम**

अनेक अनुकूल अशा घटनांनी हा आठवडा भरलेला आहे. कारण अंतरिक्षातील गुरू, रवी, मंगळ यांसारखे सामर्थ्यवान ग्रह तुम्हाला अनुकूल आहेत. आत्मविश्वास दुणावेल. जे अशक्य वाटावे तेच करण्याची जिद्द निर्माण होईल. नोकरी व्यवसायात समाधानाच्या व आनंदाच्या घटना घडतील. त्यामुळे अनेक दिवस उराशी बाळगलेले स्वप्न साकार होईल. उद्योगांच्या उभारणीसाठी कर्ज मिळेल. व्यापारी लोकांना नवीन खरेदीला शुभकारक आहे. सोने–चांदीची खरेदी–विक्री चार पैसे मिळवून देईल. हाती घेतलेल्या योजनांना गती मिळेल. तब्बेत सुधारलेली दिसेल. शुभ दिनांक ३०, १ एप्रिल.

**महिलांना** : नोकरीच्या प्रयत्नात मोठे यश येईल.

**विद्यार्थ्यांना** : लॉटरीत भाग घेण्यास अनुकूल आहे.

**वृषभ : तणाव कमी होईल.**

सध्या तुम्ही आर्थिक कोंडीत. जरी सापडला असला तरी, त्यामुळे दचकून जाण्याचे मुळीच कारण नाही. तिसरा शनी, अकरावा रवी तुमचे सारे मनोरथ पूर्ण करणार आहे. अडचणीचे डोंगर आणि विरोधकांच्या कारवाया उधळून लावणार आहात. पैसा मिळवण्यासाठी एखादी नवी कल्पना डोक्यात घोळू शकेल. एखाद्या योजनेची सुरूवातही होईल. हा आठवडा तसा प्रगतीचाच आहे. नोकरीत सारे अनुकूल वातावरण राहील. सहकारी व वरिष्ठ यांची मर्जी राहील. कामाचा ताण मात्र कमी होणे कठीण. शुभ दिनांक २८, २ एप्रिल.

**महिलांना** : भरतकाम, विणकाम या संबंधीचे काही नवे प्रयोग प्रसिद्धी मिळवून देतील.

**विद्यार्थ्यांना** : पैशाची उधळपट्टी थांबवावीच लागेल. अडचण मात्र भासणार नाही.

**मिथुन : धीर धरणे आवश्यक**

खरे तर मिथुन व्यक्ती अलीकडे उगाचच निराश बनलेल्या दिसत आहेत. दुसरी साडेसाती असली तरी, ती काही तेवढी वाईट नाही. या आठवड्यात गुरू अकरावा आहे. रवी दहावा आहे, तर मंगळ राशीवर आहे. ही सारी ग्रहरचना तुम्ही सामर्थ्यवान बनावे अशीच आहे. कोणतेही संकट तुम्हाला काही करू शकणार नाही. डोळ्यासमोर कारणांतिक संकट उभे करून खचून जाऊ नका. ज्या संकटाची तुम्हाला भीती वाटते ते संकट या आठवड्यास पूर्ण निवारण झालेले असेल. आर्थिक बाजू एवढी कमकुवत नाही. मन स्थिर राहील. शुभ दिनांक २८, ३० व १ एप्रिल.

**महिलांना** : मन चंचल ठेवू नका. वाचन, मनन करा. लेखनाची सुरूवात होईल.

**विद्यार्थ्यांना** : यश आणि समाधान मिळेल.

**कर्क : संधीची वाट पाहा**

मंगळ बारावा असताना अनेक दिव्यांतून जावे लागते. क्षुल्लक कामासाठी दगदग, कटकट सहन करावी लागते. पण दैवयोगापुढे कुणाचे काही चालत नाही, हेच खरे. म्हणून जे जे होईल ते ते सहन करण्याखेरीज सध्यातरी गत्यंतर नाही. पण एवढ्याने हतबल होण्याचे मात्र कारण नाही. संधीची वाट पाहत बसणे योग्य होईल. जमीन खरेदी, कर्ज देणे–घेणे, व्यापारी–खरेदी यांसंबंधांत काळजी घ्या. भलत्या आश्वासनाच्या आहारी जाऊ नका. तब्येतीचीदेखील काळजी घेणे आवश्यक आहे. नोकरीत त्रास पडला तरी अधिकारदेखील वाढेल. शुभ दिनांक २९, ३०.

**महिलांना** : शिक्षिका असणाऱ्या महिलांनी मुलांच्या बाबतीत काळजी घ्यावी. आक्षेप येऊ देऊ नये.

**विद्यार्थ्यांना** : पैशाची फारशी अडचण भासणार नाही. पण खर्चही फार होईल.

**सिंह : मतभेद टाळा**

मनांत आणि हृदयात परमेश्वराचे अधिष्ठान असल्याखेरीज साडेसातीतून सहीसलामत पार पडणे फार अवघड असते. साडेसातीत माणसाला सहनशक्ती पाहिजे. आपण सध्या याच दिव्यातून जात आहात, याची मला कल्पना आहे. पण भाग्यस्थानी असलेला गुरू साऱ्या संकटांतून व अडचणींतून तुम्हाला निभावून नेईलच. या आठवड्यात अकराव्या मंगळाचे आर्थिक वरदान तुम्हाला लाभले आहे, त्याचा भरपूर फायदा घ्या. शेअर्समध्ये खूप नफा होईल. लॉटरी–रेसपासून चांगलेच आर्थिक बळ मिळेल. शुभ दिनांक २८ व ३१.

**महिलांना** : नोकरीत काम चिक्कार पडेल. पण आर्थिक फायदा उत्तम होईल.

**विद्यार्थ्यांना** : करमणुकीवर खर्च कमी करा. कलागुणांना प्रसिद्धी मिळेल.

**कन्या : काही चांगले घडेल**

तुम्ही सेवावृत्तीचे लोक आहात. नोकरीत मन लावून काम करणे, हे तुमचे आवडते काम आहे. दुय्यम व्यवसायाला चालना देण्याचे ठरवलेत तर काही महत्त्वाचा फायदा होईल. आगामी काळात घडणाऱ्या अनुकूल घटनांची नांदी यावेळी होईल, असे निश्चित समजा. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. पण काही मागणी करू नका. रजेवर

जाण्याची गोष्ट काढू नका. चालू नोकरीत काम मात्र भरपूर वाढणार आहे. आर्थिक लाभ होईल. लॉटरीत लाभ होऊ शकेल. गेल्या आठवड्यात तब्येतीच्या दृष्टीने जो त्रास झाला तो आता होणार नाही. पण उष्णतेपासून डोळ्यांना त्रास जाणवेल. शुभ दिनांक २७, २९ व ३०.

**महिलांना :** शारीरिक स्वास्थ्य लाभेल. मुलांबद्दलची काळजी दूर होईल.

**विद्यार्थ्यांना :** मानसिक त्रास संभवतो. शैक्षणिक प्रगतीत मात्र खंड नाही.

## तूळ : विरोधक नमतील

हा आठवडा सर्वसाधारणपणे प्रगतीचा आहे. प्रामुख्याने तुमच्या व्यवसायात अगर नोकरीत जे विरोधक आहेत ते यावेळी तुम्हाला सहकार्य देतील. रवी तुमचे याबाबतीतले सर्व प्रयत्न यशस्वी करील. नोकरीचा इंटरव्ह्यू झाला असेल तर यावेळी नेमणुकीची आज्ञा हाती पडेल. चालू नोकरीत नवीन असे काही फारसे घडणार नाही. वरिष्ठांची कृपा राहील. आर्थिकबाबतीत बचत होणे कठीण आहे. रेसच्या नादी मात्र लागू नका. तब्येत प्रसन्न राहील. लेखकांना नव्या कल्पना सुचतील. शुभ दिनांक २७, २८, २९.

**महिलांना :** स्वतःच्या नावे लघुउद्योग सुरू करायला अनुकूलता आहे..

**विद्यार्थ्यांना :** परीक्षा झाली असेल तर जीवनात नवे काही तरी घडेल.

## वृश्चिक : विचाराने वागा

बारावा राहू व त्याच्या भरीला हर्शल आहे. त्यामुळे अजून काही काळ तरी कोणतेच नवे धाडस करताना विचार करावा लागेल. शेतीचा व्यवसाय प्रगतीकडे नेता येईल. त्यात लक्ष घाला. ज्यांना जमीन हवी असेल त्यांनी प्रयत्न केल्यास ती मिळेल. इंजिनिअरिंग उद्योग, मुद्रण, किराणा मालाचा व्यापार पोटापुरता पैसा मिळवून देईल. त्यात अडचणी नाहीत. महत्त्वाचा पत्रव्यवहार व गाठीभेटी होऊ शकतील. कर्ज काढू नका. धंद्यासाठी मदत मिळेल. पण पैसा जपून वापरा नाही तर अडचणी येतील. शुभ दिनांक २९-३१

**महिलांना :** फॅशन्सच्या आहारी जाऊन पैसा उडवू नका. नोकरीत काळजी घ्या.

**विद्यार्थ्यांना :** संशोधनाच्या क्षेत्रात संधी मिळेल. पैसा कमी पडणार नाही.

## धनु : नव्या योजना आखा

तुमच्या यशाची सारी गुरुकिल्ली आता गुरूपाशी आहे. मन स्थिर ठेवून जर तुम्ही कोणतीही नवी योजना आखणार असाल तर त्याला यश मिळाल्याखेरीज राहणार नाही. नव्या गाठीभेटी घ्या. नव्या ओळखींचा लाभ घ्या. अनेक दिवस मनात घोळत असलेले विचार प्रत्यक्षात उतरतील. आध्यात्मिक यश व सामर्थ्य हाताशी येईल. नोकरीच्या बाबतीत प्रभाव वाढेल. कामाचा उरक निर्माण होईल. स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक त्या प्रयत्नाला अनुकूलता आहे. पैसा गरजेपुरता मिळेल. शुभ दिनांक २८, ३१ व १

**महिलांना :** नोकरीच्या प्रयत्नांना यश येईल. मंगल कार्यात पुढाकार राहील.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत तुमचा क्रमांक बराच वर येईल. नोकरीचा प्रयत्न करा.

## मकर : समंजस वृत्ती ठेवा

सध्या तरी रवी हाच तुमचा करता व करविता आहे. राजकारणात तुमचे डावपेच यशस्वी होतील. पण गुरू चौथा आहे. तो मनःस्वास्थ्य बिलकूल लाभू देणार नाही. जे कराल ते आत्मविश्वासाचे असणार नाही. मित्र कोण व शत्रू कोण हे कळणे कठीण होईल. नोकरीत स्तुतिपाठकांच्या मेळाव्यात रमून जाल. हाताखालची माणसे गोड गोड बोलतील. पण तुम्ही गोत्यात कसे याल याचाच व्यूह रचतील. तिसरा रवी ठीक आहे. नव्या योजना अमलात आणू शकणार नाही. शुभ दिनांक २९, ३०, ३१

**महिलांना :** कुटुंबात वरचष्मा राहील. पण आर्थिक बाजू घसरगुंडीची राहील.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासाचे फल पदरात पडेल.

## कुंभ : महत्त्व वाढेल

दुसरा रवी, तिसरा गुरू, पांचवा मंगळ असे सारेच ग्रह अनुकूल आहेत. आता कसलीच चिंता करू नका. मन मोकळे ठेवा व स्वतःच्या उद्योगाला लागा. हा आठवडा फार छान आहे. एक महत्त्वाची राजकीय व्यक्ती तुम्हाला सर्व प्रकारचे साहाय्य करणार आहे. राजकारणात प्रवेश होईल. महत्त्वाचे स्थान मिळेल. नोकरीत कायम नसल्यास कायम व्हाल. अनिश्चितपणा असल्यास तो दूर होईल. उद्योगाचे गाडे थांबले असेल तर त्याला गती मिळेल. जमिनीच्या व्यवहारात फसगत होईल. घराचा अगर जागेचा प्रश्न सुटेल. शुभ दिनांक २७, २८ व १ एप्रिल.

**महिलांना :** नोकरी नसल्यास ती मिळेल. उद्योगाला चालना मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** लॉटरीपासून फायदा होऊ शकेल अभ्यासांत निष्काळजीपणा नको.

## मीन : प्रयत्नाने यश

सुखस्थानी मंगळाने ठाण मांडल्यापासून तुमची मनःस्थिति चमत्कारिक झाली आहे. पण त्यामुळे हातपाय गाळून बसण्यात अर्थ नाही. ग्रह प्रयत्नाला साथ देत असतात. रोज गुरुचरित्र वाचा व दत्ताचे दर्शन घ्या. व्यवसायात तसे प्रतिकूल काही नाही. चालू उद्योगात नवे काही घडू शकले नाही तरी चालू स्थितीत खंड पडणार नाही. प्रकाशन व्यवसाय स्थिरावेल. पत्रकार व पत्रकारेतर यांना दिलासा मिळू शकेल. नोकरीत कामाचा ताण वाढला तरी चुका होणार नाहीत. वरिष्ठांचा ससेमिरा लागणार नाही. शुभ दिनांक २८, ३० व १ एप्रिल.

**महिलांना :** आठवडा मनोरथ पूर्ण करणारा आहे. मायेची माणसे भेटतील.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत मन स्थिर ठेवा. भलते विकार मनात येऊ देऊ नका. □


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

आमच्या इलाजाने पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्ण लाभ मिळाला असून, त्याला प्रसिद्धी मिळाली आहे. इलाजासाठी औषधीचे एक पॅकेट मोफत मागवा. इलाज सुरू झाल्याबरोबर डागाचा रंग बदलण्यास सुरुवात होते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

BHARAT AYURVEDASHRAM (P.) P. O. KATRI SARAI ( GAYA )

# घटनादुरुस्तीची समस्या : पृष्ठ ४ वरून

लोकशाहीचे संस्थात्मक (Institutionalised) स्वरूप येथे फारसे विकसित झालेले नाही. या कलमांमुळे काही सत्ताप्रिय लोक भविष्यकाळात घटनाच तोडून टाकण्याची भीती आहे.

संसदीय लोकशाहीमुळे या देशाचे प्रशासनिक संस्थात्मक स्वरूप व्यवस्थितरित्या विकसित झालेले आहे. भारतात गेली दोन हजार वर्षे कोणतीही प्रशासनिक संस्थात्मक रचना विकसित झाली नाही, म्हणूनच कोणताही आक्रमक मूठभर सैन्य घेऊन आला व राज्य स्थापन करू शकला. म्हणून सध्याच्या संस्थात्मक स्वरूपास बदलण्यापूर्वी त्याचा फार काळजीपूर्वक विचार केला गेला पाहिजे.

लोकसभेची निवडणूक पाच वर्षासाठी वयस्क मताधिकारांप्रमाणे व दरडोई एकमताप्रमाणे व्हावी. मतदान पात्रतेचे वय एकवीसवरून अठरावर आणण्यात यावे. निवडणूक पद्धती खूपच सदोष आहे. तिच्यातपण संशोधन करण्याची गरज आहे. सध्या लोकसभेच्या सभासदाची निवड एकाच मतदार संघातून होते. ज्याला जास्त मते मिळतात तो निवडून आल्याचे घोषित केले जाते. यामुळेच उमेदवारांच्या जास्त संख्येमुळे उत्तर प्रदेशात १९७४ साली काँग्रेसला फक्त ३२ टक्के मते मिळाली, पण जागा ५१ टक्क्यांपेक्षा जास्त मिळाल्या. गेल्या वर्षी गुजरातेत जनता मोर्चाला फक्त ३५ टक्केच मते मिळाली, पण जागा मात्र ४९ टक्क्यांपेक्षा जास्त मिळाल्या. यावर उपाय म्हणून सध्याच्या निवडणूक पद्धतीत थोडासा बदल करण्यात यावा. सध्याच्या पद्धतीच्या जागी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा स्वीकार करावा असे काहीजणांचे मत आहे. प्रमाणशीर प्रतिनिधित्व म्हणजे पक्षास मिळालेल्या मतांनुसार जागांची वाटणी करणे. सध्या काँग्रेसला ४४ टक्के मते मिळतात, त्याचप्रमाणात त्यास जागा मिळाव्या असे ही सूचना करणारे म्हणतात. पण भारतासारख्या देशात, जेथे विरोधी पक्ष दुर्बल व अपरिपक्व आहेत, तेथे ही पद्धत फारशी चालणार नाही, कारण त्यामुळे स्थैर्यास धोका पोहोचेल व प. जर्मनीत जसे झाले तसे संधीसाधू राजकारण सुरू होईल. भारतातील विरोधी पक्ष त्या लायकीचे नाहीत. तिसरी पद्धत यादी पद्धत. जी राष्ट्रपतीच्या निवडणुकीच्या वेळी वापरण्यात येते. यात ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळाल्याशिवाय उमेदवार निवडला जात नाही. यात क्रमवार पद्धतीने मते दिली जाऊ शकतात. यामुळे काही प्रशासकीय समस्या निर्माण होतील. मते मोजण्याचे काम किचकट होईल. शिवाय जनता निरक्षर व अशिक्षित आहे, तिलापण ही पद्धत कळणार नाही. पण त्यास दुसरा उपाय आहे असे वाटत नाही. कारण संबंधित पक्षांना यासाठी लोकशिक्षणाचा कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. त्याला दुसरा पर्याय नाही. म्हणूनच लोकसभेच्या व विधानसभेच्या निवडणुकीत यादी पद्धतीचा स्वीकार करण्यात यावा. दुसरी महत्त्वाची गोष्ट, अपक्ष सदस्यांना निवडणूक लढविण्याची परवानगी देऊ नये. अपक्ष सभासदांनी राजकीय भ्रष्टाचारास सुरुवात केली. काही क्षुद्र स्वार्थ साधण्यासाठी या मूठभर लोकांना लोकशाहीचे दफन करण्यास परवानगी दिली जाऊ नये.

लोकसभेचे मतदार संघ मोठे आहेत, म्हणून लोकसभेच्या सभासदांची निवड राज्यसभेसारखी विधानसभेच्या सदस्यांकडून व्हावी असे मत काही तज्ज्ञ व्यक्त करतात, पण ते फारसे बरोबर नाही, कारण लोकसभा ही सर्वोच्च व सार्वभौम संस्था आहे, ती संपूर्णतः जनताभिमुख व जनतेचे प्रतिनिधित्व करणारी असली पाहिजे. या निवडणुकीत पैसा जास्त खर्च होतो व पैसेवाले निवडून येतात. काही तज्ज्ञांचे असे मत आहे की, निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना सरकारने आर्थिक मदत करावी. पण निवडणुकीसारख्या अनुत्पादक गोष्टींवर चार पाचशे कोटी रुपये खर्च करावे असे विचारांती म्हणवत नाही. तारकुंडे समितीने त्यासाठी अनामतीच्या रकमेमध्ये वाढ करण्याची सूचना केली आहे. पण एखाद्या गरीब उमेदवारास पाच हजार रुपये अनामत ठेवण्यास सांगणे, लोकशाहीच्या कोणत्या तत्त्वात बसते ? याबाबत निर्णय घेणे अवघड आहे व शेवटी सर्व पक्षांनी राज्यपद्धतीच्या हितासाठी जनजागृतीस व लोकशिक्षणास महत्त्व दिले, तरच हा प्रश्न सुटणार आहे.

संसदीय राज्यपद्धतीत लोकसभा जास्त शक्तिशाली असली पाहिजे. सध्या लोकसभेच्या कार्यप्रणालीत सुधारणा करण्याबाबत विचार चाललेला आहे. लोकसभेचे अधिवेशन कमी दिवस भरवून, सर्व कामकाज तिच्या निरनिराळ्या समित्यांनी करावे अशा काही सूचना आहेत. ह्या सूचना लोकसभेचे अधिकार कमी करण्याचा एक प्रयत्न आहे. संसदेच्या कार्यप्रणालीत थोडाबहुत बदल करता येईल, पण संसदेच्या अधिवेशनाचे दिवस कमी करणे, संसदेतील लोकांच्या प्रतिनिधींचे विचार त्यांना निवडून देणाऱ्या लोकांना कळून न देणे व संसदेपेक्षा तिच्या समित्यांना महत्त्व देणे लोकशाहीच्या विरुद्ध आहे. काँग्रेसपक्षाने संसदेच्या सार्वभौमत्वाची कल्पना मान्य केलेली आहे. शिवाय संसद व कार्यकारी मंडळ यांतील एकोपा पक्षपद्धतीने जास्तच रुढ केलेला आहे त्यामुळे संसदेचे सार्वभौमत्व हे वास्तविकरित्या कार्यकारीमंडळाचे व सत्ताधारी पक्षाचे सार्वभौमत्व आहे.

आज महत्त्वाची समस्या न्यायालीन पुनरवलोकनाची (Judicial review) व्याप्ती काय असावी ही आहे. न्यायालयीन पुनरवलोकन म्हणजे, संसदेने संमत केलेले कायदे घटनात्मक आहेत की नाही, हे तपासण्याचा न्यायालयांचा अधिकार. ह्या अधिकाराशीच मूलभूत हक्कांचा प्रश्न संबंधित आहे. आपल्या घटनेत इतर अधिकारांबरोबरच संपत्तीचा अधिकारपण मान्य केलेला आहे. हा अधिकारच संसद व न्यायसंस्था ह्यांच्यातील संघर्षास कारणीभूत ठरला. याबाबत न्यायालयांची भूमिकापण फारशी स्पृहणीय नाही. कारण न्यायालयांनी नेहमीच आपले जुने निर्णय बदललेले आहेत. १९६७ पर्यंत सर्वोच्च न्यायालय संसदेचा मूलभूत अधिकारास संशोधन करण्याचा हक्क मान्य करीत होते. पण गोलकनाथ केस नंतर न्यायालयांनी आपले निर्णय फिरविले. कूळकायद्याखाली ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांना बाजार भावाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात आली नाही पण बँक राष्ट्रीयीकरणाच्या वेळी मात्र न्यायालयाने निर्णय दिला की,

बँकांच्या मालकांना बाजार भावाप्रमाणे भरपाई द्यावी. स्टे ऑर्डर्सचा उपयोग करून न्यायालयांनी बरेच प्रगतीशील कायदे अडविले आहेत. गुजरात व प. बंगाल उच्च न्यायालयांनी त्या प्रांतातील जमीन-सुधारणा विषयक कायदे अंमलात आणू दिलेले नाहीत. साध्या साध्या प्रशासनीय बाबीतपण न्यायालयांनी असहनीय हस्तक्षेप केला. सध्याची न्यायव्यवस्था बुद्धिमेदी वकील व पैसेवाले यांना चरते कुरण आहे.

संसदेचे सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठी न्यायालयीन समीक्षेचा अधिकार मर्यादित करावा लागणार आहे व तो संसदेवर सोडलेलाच बरा. संसदेने काही धोरणविषयक कायदे-उदा. कर्जमुक्ती जमीन सुधारणा, नागरी संपत्ती मर्यादा, स्मगलिंग वगैरे कायदे न्यायालयीन समीक्षेच्या कक्षेबाहेर न्यावे. त्यांची घटनात्मकता तपासण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाच्या वा सभापतीच्या नेतृत्वाखाली संसदेची एक समिती नेमली जावी. तिच्यात सर्व पक्षांचे प्रतिनिधी असावे. निर्णय बहुमताने घेतला जावा. मात्र सर्वोच्च न्यायालयाला त्याचे याविषयीचे मत व्यक्त करावयाचा अधिकार असावा. म्हणजेच त्यांनी एक विचारमंच म्हणून काम करावे. त्याचप्रमाणे कायदे सोप्या, सरळ व धाराप्रवाही भाषेत लिहिले जावे. सध्या न्यायाधीशानाही उलगडू नये अशा भाषेत कायदे लिहिण्याची पद्धत आहे तिचा त्याग करावा. न्यायालयांना संसदेने ठरवून दिलेल्या क्षेत्रात न्यायालयीन समीक्षेचा अधिकार असावा. कारण स्वतंत्र न्यायसंस्था लोकशाहीत आवश्यक आहे. केंद्र राज्य-संबंध, आचार, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तीच्या स्थानबद्धतेची कारणे तपासणे या क्षेत्रांत न्यायालयांना पूर्ण स्वातंत्र्य असावे. ज्या क्षेत्रात न्यायालयांचा पुनरवलोकनाचा अधिकार मर्यादित करण्यात आला आहे त्याबाबतपण न्यायाधीशांना त्यांची मते व्यक्त करण्याचा अधिकार असावा. केशवानंद भारती खटल्यानंतर मूलभूत हक्काच्या जागी मूलभूत साऱ्याचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. द्रमुकच्या मते सघराज्यवाद, गणराज्यवाद, लोकशाही संसदीय राज्यपद्धती, कायद्याचे राज्य, निष्पक्ष निवडणुका, धर्मनिरपेक्षता, मूलभूत अधिकार, स्वतंत्र न्यायसंस्था ही आपल्या घटनेची मूलभूत तत्त्वे आहेत. ही तत्त्वे लोकशाहीचा आत्मा आहेत. पण निश्चित कोणते तत्त्व घटनेतील मूलभूत तत्त्व ठरेल हे सांगणे अशक्य असल्याचे मागेच न्यायाधीश रे म्हणाले आहेत. पण एकदा संसदेला सर्वोच्च अधिकार दिले म्हणजे मूलभूत साऱ्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. शिवाय चार पाच न्यायाधीशांकडून त्याचे रक्षण करण्याची अपेक्षा करण्यापेक्षा संसद व जागृत जनता यांच्यावर ती जबाबदारी ठेवणे जास्त शहाणपणाचे ठरेल.

त्यासाठीच अभिव्यक्तीस्वातंत्र्यास वाव दिला पाहिजे. त्यासाठी वर्तमानपत्रांना महत्त्वाची कामगिरी बजावावी लागणार आहे. कोणतेही अधिनायक वादीसरकार प्रथम वर्तमानपत्रांचे तोंड बंद करीत असते. परंतु तसे करणे डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजरासारखे आहे. वर्तमानपत्रे नोकरशाहीविरुद्ध गाऱ्हाण्यास तोंड फोडत असतात. त्यासाठी लोकांना राजकीयदृष्टया जास्त जागृत व सुजाण बनवावे लागेल. विविध विचारमंच स्थापन करून शिक्षणपद्धती जास्तीत जास्त लोकाभिमुख बनवावी लागेल. समस्या, प्रशासनातील नोकरशाहीचे महत्त्व कमी करून व लोकप्रतिनिधींना जास्त सामर्थ्यशाली करण्याची आहे. त्यासाठी जनतेत जागृती हवी, वृत्तपत्रे निर्भीड हवीत. लोकशाही चार ध्येयवादी नेत्यांवर अवलंबून नसावी. तिला जनतेचे समर्थन असले, तरच ती टिकते. हुकुमशाहीत राजकीय जागृती होत नसते, कारण ती या हुकुमशहाविरुद्ध असते. म्हणूनच हुकुमशाहीत देशाचा विकास होत नाही. पाकिस्तान, ग्रीस, स्पेन, पोर्तुगाल, ब्रह्मदेश ही राष्ट्रे यांची जिवंत उदाहरण आहेत. प्रशासनाच्या कार्यात जनतेचा सहभाग व मार्गदर्शन राजकीयदृष्टया जागृत समाजातच अपेक्षित असते. म्हणूनच जनतेचे मूलभूत अधिकार (स्वसंरक्षण, अभिव्यक्ती, संप करणे) व लोकशिक्षणाच्या संस्था यांचे रक्षण केले पाहिजे. संप, मोर्चे, हडताल, घेराव ही लोकशाहीच्या मार्गाची अविभाज्य अंगे आहेत. उजव्या प्रतिगाम्यांना व भांडवलदारांना त्यांची भीती वाटते, पण त्यांना दुरुस्त करावयास दुसरा उपाय नाही. न्यायालयाचे अधिकार कमी केल्यानंतर वर्तमानपत्रांचे महत्त्व जास्त वाढते. तेथे मुक्त विचारांना वाव असावा. माझ्यावर टीका करणारा माझा शत्रू आहे ही भावना एक मानसिक विकृती आहे.

केंद्र शक्तिशाली असावे यात शंका नाही, पण भारतासारख्या देशात संघीय शासनप्रणालीस दुसरा पर्याय नाही, कारण भारताची एकता विविधतेत सामावलेली आहे. चौदा वेगवेगळया भाषा बोलणारे, वेगवेगळया संस्कृतींचे लोक एका साच्यात घालता येणार नाहीत. भारताची एकता या वेगवेगळया सांस्कृतिक घटकांच्या मर्यादित स्वायत्ततेमुळे दृढ होणार आहे. सध्या जी केंद्रराज्यसंबंधाबाबत तीन याद्यांची व्यवस्था आहे तीत फारसा बदल करण्याची गरज नाही. काही किचकट आर्थिक बाबीस राज्यांना जास्त स्वायत्तता दिली जाऊ शकते. शेवटी राज्यातील विधानसभा व नगरपालिका यात फरक आहे. स्वार्थासाठी काही लोकांनी स्वायत्ततेच्या मागणीचा दुरुपयोग केला असेल, पण त्यामुळे केंद्रीकृत राज्याची मागणी करणे फारसे बरोबर नाही. राज्यपालाच्या पदानेपण बरीच कटुता निर्माण केली आहे. राज्यपाल नेहमीच त्या पक्षाचे हस्तक म्हणून काम करतात. त्यामुळे या पदाची जर समाप्ती केली तर फारसे काही बिघडेल असे वाटत नाही. कारण हे काही प्रशासकीय पद नाही. राष्ट्रपतीच्या शासन काळात केंद्रसरकार एखादा कार्यकारी प्रशासक पाठवून राज्यकारभार तारू शकते व उच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश राजकीय पक्षाच्या नेत्यास मंत्रिमंडळ बनवावयास सांगून पदाची शपथ देऊ शकतो.

प्रा. रजनी कोठारींनी स्थानिक स्वराज्यसंस्था व पंचायतसंस्था यांत नवे चैतन्य ओतण्याचे आव्हान केले आहे. ह्याच संस्थांतून नवे सामाजिक व राजकीय नेतृत्व उदयास येत असते. त्यासाठी त्यामध्ये विभाजित व विकेंद्रित करून शक्तिशाली संस्थात्मक शासन निर्माण करणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्यसंस्था व पंचायतसंस्था राजकीय पक्षांना शक्ती देतात, जनतेत राजकीय जागृती निर्माण करतात व सरकारला जनतेच्या मागण्यांशी परिचीत करतात. लोकशाहीत त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.

भारतात काँग्रेसला पर्यायी असा पक्ष नाही. त्यातच पुन्हा संधीसाधू व अपरिपक्व पक्षनेत्यांनी पक्षपद्धती विकसित होऊ दिली नाही. पक्षांतराविरुद्ध सगळेच बोलतात पण ते बंद पडले नाही.

उलट आज त्यास उत्तेजन दिले जात आहे. जे सरकार पाच वर्षांसाठी निवडून दिले आहे ते सरकार जन आंदोलन करून पाडण्याचे प्रयत्न थांबवले पाहिजेत. त्याचप्रमाणे काही स्वार्थी लोकांना पैसे चारून, पक्षबदल करावयास लावून सरकार पाडणे पण थांबविले गेले पाहिजे. त्यापेक्षाही वाईट गोष्ट राज्यपालाने विरोधी पक्षांचे सरकार बरखास्त करणे ही आहे. राज्यपाल विधानसभेतील बहुमताचा निर्णय देऊ शकत नाही. विरोधी पक्षांनी काँग्रेसपक्षाला व काँग्रेस पक्षाने विरोधी पक्षांना निवडून आल्यानंतर पाच वर्षे काम करू दिले पाहिजे. ही दोन्ही बाजूंची जबाबदारी आहे.

घटनादुरुस्ती खालीलप्रमाणे करण्यात यावी– १. न्यायालयीन समीक्षेचा अधिकार विशिष्ट क्षेत्रापुरता मर्यादित करण्यात यावा, २. निवडणुकीसाठी यादीपद्धतीचा अवलंब केला जावा, ३. राज्यपालाचे पद रद्द करावे, ४. अपक्षांना निवडणूक लढविण्याचा अधिकार देऊ नये, ५. संसदेला जास्त शक्तिशाली करून तिचे सार्वभौमत्व कायम करावे, ६. संघीय शासनप्रणाली कायम ठेवून आर्थिक बाबतीत राज्यांना जास्त स्वायत्तता द्यावी. ७. घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी आवश्यक करावी, ८. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार मान्य करून वर्तमानपत्रांना मुक्त विचारस्वातंत्र्य द्यावे. शेवटी शिस्त फक्त विरोधी पक्षांनी व जनतेनेच पाळायची नसते. सत्ताधाऱ्यांवरपण तिच्या परिपालनाची जबाबदारी असते.

राज्यघटना हे, जनमनाला व जनसमूहांना जे अंतिमतः देशाचे भवितव्य घडवीत असतात, एका विशिष्ट दिशेला नेण्याचे, त्यासाठी प्रशिक्षित करण्याचे एक साधन आहे. त्यावेळी येथे व्यक्ती महत्त्वाची नसते. व्यक्ती येतात व जातात पण संस्था कायम राहतात; समाजाचे व राष्ट्राचे संधारण क[illegible]ात. कोणतीही प्रगमनशील अशी राजकीय संस्था विकसित न होणे हा या देशाला गेल्या दोन हजार वर्षांपासूनचा शाप आहे. आपण ही चूक पुन्हा करणार नाही अशी आशा वाटते म्हणूनच या लेखाचा प्रपंच. □

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |

# पॅपिलॉन पुस्तक योजना

## चवथे पुस्तक । मॅक्झिम गॉर्की । लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

पॅपिलॉन पुस्तक योजनेतील चवथे पुस्तक 'मॅक्झिम गॉर्की', लेखिका : सौ. सुमती देवस्थळे, पुढील आठवड्यात प्रसिद्ध होत आहे.

सभासदांनी दिनांक २ एप्रिल ते ११ एप्रिल या मुदतीत राजहंस प्रकाशन कार्यालयातून पुस्तक न्यायची व्यवस्था करावी. संदर्भासाठी पावती हवी.

पॅपिलॉन योजनेतील यापूर्वीची तीनही पुस्तके व्ही. पी. व पोस्टद्वारे पाठवून झालेली आहेत. ज्यांना अद्याप मिळालेली नसतील त्यांनी कार्यालयाला कृपया लवकर कळवावे. पत्रात पावती क्रमांक वगैरे लिहावा.

१ मार्चपासून पोस्टाचे दर खूपच वाढलेले आहेत. त्यामुळे पॅपिलॉन पुस्तक योजनेतील चवथे व जून ७६ मध्ये तयार होणारे पाचवे पुस्तक एकदम पाठविणे सभासदांच्या दृष्टीने सोयीचे व कमी खर्चाचे ठरणार आहे. त्यामुळे ही दोन्ही पुस्तके व्ही. पी. किंवा रजिस्टर पोस्टाने एकदम, एकाच वेळी, म्हणजे जून–जुलै ७६ मध्ये पाठविली जातील. तरीपण ज्यांना 'गॉर्की' हे योजनेतील चवथे पुस्तक प्रकाशित झाल्यावर लगेच हवे असेल त्यांनी तसे कळविल्यास पाठविण्याची व्यवस्था होऊ शकेल.

केवळ पाच रुपयात पुस्तक द्यायचे तर विनाकारण वाढत जाणारा पत्रव्यवहार व इतर खर्च यांना काट देणे अवश्यच होते. त्यामुळे काही सभासदांचा गैरसमज झाला असण्याची शक्यता आहे. पण बहुसंख्य सभासदांचे उत्तम सहकार्य लाभले हेही नमूद केले पाहिजे. या सहकार्यामुळे व परस्पर विश्वासामुळेच या योजनेतील पाचांपैकी तीन पुस्तकांचे वाटप पूर्ण होऊ शकले व उरलेल्या दोहोंचेही येत्या २–३ महिन्यांत पूर्ण होईल. दरमहा एक पुस्तक हे वेळापत्रक मात्र थोडे मागेपुढे झाले. पहिली तीन पुस्तके वेळेवर प्रकाशित झाली. समक्ष नेणाऱ्यांनी ती वेळेवर नेली. पोस्ट-पाठवणीला थोडा विलंब लागला. चवथे 'गॉर्की' निघायला एक महिना उशीर होत आहे. अनेक विक्षेप येतात व वेळापत्रक बिघडून जाते. सभासदांनी हे सर्व समजून-उमजून घ्यावे एवढीच नम्र विनंती.

व्यवस्थापक

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०